रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १८१ । पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## हापूसवर गुजरातचे अतिक्रमण

**मुंबई :** कोकणातील अस्सल हापूस आंब्यावर आता भौगोलिक मानांकनावरून मोठे संकट उभे राहिले आहे. गुजरातने या आंब्यावर दावा करत 'वलसाड हापूस' नावाने भौगोलिक मानांकन मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. त्यामुळे कोकणातील आंबा बागायतदारांची चिंता वाढली आहे. त्यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी लक्ष वेधले आहे. सरकारने यामध्ये लक्ष घालावे आणि कोकणातील आंबा उत्पादकांचे संरक्षण करावे. तसेच, कोकणातील सत्ताधारी नेत्यांनीही हा प्रश्न लावून धरावा, ही विनंती त्यांनी सोशल मिडीयावर पोस्ट शेअर करत केली आहे. पान २ वर


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹


## 'तिरडी' आंदोलन

### बायपासचे काम पूर्ण करण्याची मागणी




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गाचे वर्षानुवर्षे रखडलेले काम, निकृष्ट दर्जाचे रस्ते, वाढत जाणारे अपघात आणि प्रशासनाचे उदासीन धोरण या सर्वांचा संताप पुन्हा एकदा रस्त्यावर उसळला. जनआक्रोश समितीच्यावतीने शनिवारी (दि.६) माणगाव येथील लोणेरे पुलावरून तिरडी यात्रेची घोषणा करण्यात आली होती. शासन, प्रशासन आणि ठेकेदारांवर दबाव वाढावा यासाठी आयोजित केलेल्या या आंदोलनाला स्थानिक नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

माणगावातील पहेल-खांडपाले बायपासचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे या ठिकाणी भीषण अपघाताची शक्यता उद्भवली आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गात प्रचंड भीती निर्माण झाली आहे. खरंतर चारही दिशेने वाहतूक सुरू व्हायला हवी होती; परंतु, अद्याप एकाच बाजूचा रस्ता सुरू असून बाकी तीन बाजूंचे काम अपूर्णावस्थेत आहे. परिणामी शाळाकॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, मोटारसायकल स्वारांना, रिक्षाचालकांना महामार्ग ओलांडताना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. ग्रामस्थांनी याला 'दररोजचा मृत्यूमार्ग' असे वर्णन करत संताप व्यक्त केला.

यादरम्यान, जनआक्रोश समितीच्यावतीने पान २ वर

## वेधक

### विमान कंपन्यांच्या मनमानीला लगाम

**नवी दिल्ली :** इंडिगोच्या सध्याच्या संकटानंतर इतर विमान कंपन्यांनी विक्रमी भाडेवाढ जाहीर केली आहे. ज्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विमान भाड्यात अचानक झालेल्या वाढीबाबत नागरी उड्डाण मंत्रालयाने आता कडक भूमिका घेतली आहे असून सरकारने काही विमान कंपन्यांना वाढीव भाड्यांबाबत गंभीर सूचना दिल्या आहेत. याव्यतिरिक्त प्रवाशांना जास्त भाडे भरण्यापासून रोखण्यासाठी मंत्रालयाने भाडे मर्यादा लागू केल्या आहेत. सर्व पान २ वर

### लोणावळ्यात धडकी भरवणारा अपघात

**पुणे :** गेल्या काही दिवसांमध्ये भीषण अपघातांमुळे पुण्याचे नाव सध्या चर्चेत आहे. अशातच पुन्हा एकदा पुण्यातील लोणावळा येथे शनिवारी (दि.६) सकाळी भीषण अपघाताची घटना घडली आहे. यावेळी टेम्पो आणि कारचा धडकी भरवणारा अपघात झाला आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून हा अपघात लोणावळ्यातील लायन्स पॉइंटजवळ झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यावेळी टेम्पो आणि कार समोरासमोर धडकल्याने कारचा अक्षरशः चुराडा पान २ वर

# महामानवाला अभिवादन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन शनिवारी (दि.६) रायगड जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्यावतीने महामानवाच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. अलिबागमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.**

यावेळी शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, अलिबाग नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सागर साळुंखे, माजी नगरसेविका संजना किर, अनिल चोपडा तसेच पान २ वर



### मुंबईत वाहतुक कोंडी

**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी शनिवारी (दि.६) दुपारी दादरमधील चैत्यभूमीच्या दिशेने जाणाऱ्या काही अनुयायांना चुनाभट्टी परिसरात रोखण्यात आले होते. त्यामुळे संतप्त झालेल्या अनुयायांनी चुनाभट्टी येथील पूर्व द्रुतगती मार्गावर रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यामुळे या मार्गावर तब्बल तीन तासांहून अधिक काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. महापरिनिर्वाण दिनानिमित्त शनिवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन कण्यासाठी मोठ्या संख्येने अनुयायी दादरमधील चैत्यभूमीकडे निघाले होते. काही अनुयायी रिक्षाने चैत्यभूमीच्या दिशेने जात होते. मात्र, शीवच्या पुढे रिक्षाला परवानगी नसल्यामुळे पोलिसांनी त्या ठिकाणी रिक्षा अडवल्या. त्यामुळे संतप्त झालेल्या अनुयायांनी दुपारी दोन वाजल्यापासून पूर्व द्रुतगती मार्गावरील चुनाभट्टी परिसरात रास्ता रोको आंदोलन केले होते. यावेळी पोलीस आणि अनुयायांमध्ये शाब्दीक चकमक उडाली. या रास्ता रोको आंदोलनामुळे पूर्व द्रुतगती मार्गावर दादरच्या दिशेने जाणाऱ्या आणि येणाऱ्या मार्गावर गेल्या अडीच ते तीन तास मोठी वाहतूक कोंडी झाली होती. परिणामी, अनेक वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या.

## महाडमध्ये शिंदे गटाला धक्का

### कार्यकर्त्यांचा ठाकरे गटात प्रवेश



**। महाड । प्रतिनिधी ।**

महाडमधील विन्हेरे विभागातील कोंडमालुसरे येथील म्हसकर भावकीमधील शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदे गटाला रामराम ठोकत शिवसेना ठाकरे गटात जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे करंजाडी जिल्हा परिषद मतदार संघामध्ये ठाकरे गटाची ताकद अधिक वाढली असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. सरपंच पान २ वर

## कोलाड-रोहा मार्गावर भीषण अपघात

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

कोलाड-रोहा मार्गावरील संभे गावानजिक मोरीजवळ दोन दुचाकींचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात शुक्रवारी (दि.५) रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजाताच्या सुमारास स्कुटी चालक जावीर इब्राहिम शाह हा आपल्या सहकाऱ्यासह कोलाड ते धाटाव असा प्रवास करत होता. तो संभे

### दोघेजण जागीच ठार



गावानजिकच्या मोरीजवळ स्कुटी विरूद्ध दिशेला चालवून समोरून येणाऱ्या मोटार सायकलला जोरदार धडक दिली. या धडकेत स्कुटी चालक जावीर इब्राहिम शाह यासह मोटार सायकल चालक दिनेश भिकू पवार या दोघांनाही गंभीर दुखापती झाल्या. त्यांना तात्काळ प्राथमिक आरोग्याकेंद्र आंबेवाडी येथे दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले. त्यानंतर त्यांना लगेच रोहा उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आले. तर, दोन्ही दुचाकी चालकांचे सहकारी अशपाक मोहम्मद फारूख अली व मोहन पवहारी सिंग हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. दिनेश पवार हे माणगाव पान २ वर







# जुना खोपटा पुलाच्या कामाला सुरुवात



। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील पूर्व व पश्चिम भागाला जोडणारा खोपटा जुना पुलाच्या दुरुस्ती कामाला सुरुवात झाली आहे. वाहतुकीसाठी महत्वाच्या असलेल्या खड्डेमय खोपटे कोप्रोली मार्गाच्या व खोपटे खाडी पुलाच्या दुरुस्तीला ५ कोटींचा निधी खर्च करण्यात येणार आहे. या मार्गाच्या दुरुस्तीसाठी पुढील तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. तर, खोपटे खाडी पूल दुरुस्तीसाठी पुढील चार महिन्यासाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

उरण तालुक्यातील पूर्व आणि पश्चिम अशा दोन विभागांना जोडणाऱ्या खोपटे पुलाच्या दोन्ही मार्गिका खड्डेमय झाल्या आहेत. पुलावरील या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता वाढली होती. या पुलावरून दररोज शेकडो अवजड वाहने वाहतूक करीत आहेत. उरणच्या दोन विभागांना जोडणाऱ्या महत्वाच्या खोपटे पुलावर ये-जा करण्यासाठी दोन मार्गिका आहेत. या पुलावरील डांबरेचे थर उखडल्याने खड्डे झाले आहेत. यात जुन्या पुलावरील स्लॅब मधील लोखंडी सळ्या मोकळ्या झाल्या आहेत. त्या वाहनांचा टायर अडकून अपघात होण्याची शक्यता वाढली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत मोडणाऱ्या या पुलाची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी त्यांच्यावर आहे. या पुलावरून अवजड वाहनांबरोबरच प्रवासी वाहनेही मोठ्या प्रमाणात प्रवास करीत आहेत. या प्रवासी वाहनांना ही धोका निर्माण झाला आहे. खोपटे पूल ते कोप्रोली हा मार्ग आधीच नादुरुस्त आहे. याचा फटका येथील प्रवाशांना बसत आहे. त्यामुळे खोपटे पूल आणि मार्गाची लवकरात लवकर दुरुस्ती करा अशी मागणी प्रवाशांकडून केली जात होती.

दरम्यान, या दोन्ही ठिकाणच्या कामांच्या दुरुस्तीच्या कामाच्या निविदा जाहीर होऊनही त्याच्या कामाला सुरुवात झालेली नव्हती. त्यामुळे येथील नागरिक, प्रवासी आणि वाहतूकदार यांच्याकडून संताप व्यक्त केला जात होता. तर, उरण सामाजिक संस्थेने आंदोलनाचा इशारा दिला होता. याची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाला सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे खोपटे खाडी पुलावरील खड्डे दुरुस्तीसाठी आधुनिक पद्धतीने पुलाचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठीची निविदा मंजूर झाली असून या पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे.

> खोपटे-कोप्रोली मार्ग आणि खोपटे खाडी पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरूवात करण्यात आली असून यासाठी तीन महिने लागणार आहेत. हा एक किलोमीटरचा मार्ग दुरुस्त करण्यात येणार आहे. तर खोपटे पुलाचे काम चार महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे. अशी माहीती सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी दिली आहे.



## करिअर गाईडन्स कार्यक्रम संपन्न

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा येथील आयडियल इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी करिअर गाईडन्स कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना योग्य करिअरची दिशा, संधी आणि त्या दृष्टीने आवश्यक कौशल्यांची माहिती देणे हा होता.

यावेळी डॉ. रेहान अन्सारी यांनी अतिशय उत्कृष्ट, प्रेरणादायी आणि भविष्यनिर्मितीस उपयुक्त असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना करिअरची योग्य दिशा, जीवनातील उद्दिष्ट, तसेच आजच्या स्पर्धात्मक काळात आवश्यक कौशल्यांची महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. याप्रसंगी आयडियलस्कूलचे अध्यक्ष जमीर कादरी, सचिव नाझिम हसवेरे, अहम्मद अली पेणकर, रजाक मोमेन, रियाज घरडे, नाझिम डावरे, रफिक घरटटकर यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवड, शिक्षणातील नवे पर्याय, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षा, उद्योजकता अशा अनेक विषयांवर उपयुक्त माहिती दिली.

## हायड्रोपोनिक्स, किचन गार्डनिंग कार्यशाळा



। उरण । प्रतिनिधी ।

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयात शुक्रवारी (दि.५) जागतिक मृदा दिनानिमित्ताने हायड्रोपोनिक्स आणि किचन गार्डनिंग विषयावर एक दिवसीय कार्यशाळा व प्रत्यक्ष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्रमुख भावना घाणेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना हायड्रोपोनिक्स आणि किचन गार्डनिंग या क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी प्रोत्साहित केले. तसेच, उद्योजकता कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी अशा नवनवीन उपक्रमांचा उपयोग करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठाक्कर होते. त्यांनी शाश्वत शेती, हायड्रोपोनिक्स आणि शहरी किचन गार्डनिंग क्षेत्रातील उद्योजकतेच्या अफाट संधींवर प्रकाश टाकला. तसेच, हायड्रोपोनिक्स शेती आजच्या प्रदूषणाच्या विळख्यात कशी गरजेची आहे, आपल्या घरगुती वातावरणात आपण आपल्याला आवश्यक असलेला भाजीपाला वर्षभर कसा मिळवू शकतो, याची माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच फुंडे, जसई आणि भगुबाई ठाकूर हायस्कूल मधील विद्यार्थी आणि शिक्षक यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवून या कौशल्याधारित प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

## आळीआंबिवली येथून मुलीचे अपहरण

**रसायनी** : मोहोपाडा आळी आंबिवली येथील अल्पवयीन मुलीचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना घडली आहे. याबाबत रसायनी पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या आईने फिर्याद दाखल केली आहे. त्यांची १५ वर्षीय ५ महिने वयाची अल्पवयीन मुलगी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेली असल्याची तक्रार त्यांनी केली आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात बीएनएस १३७(२) नुसार नोंद करण्यात आली असून रसायनी पोलीस ठाण्यात पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक अनुसया ढोणे या करीत आहेत.

## बेलकडेतील मोऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे

। रायगड । प्रतिनिधी ।

अलिबाग-रोहा रस्त्यावरील बेलकडे येथे रस्त्यात असणाऱ्या मोरीचे नूतनीकरण संबंधित ठेकेदाराकडून करण्यात आले आहे. परंतु, हे काम करताना कामाची गुणवत्ता टिकवून ठेवल्याचे दिसत नाही. ठेकेदाराने त्या ठिकाणी तयार सिमेंटचा मोठा ठोकळा टाकला असून मोरी बांधून पूर्ण केल्याचा आव आणला आहे. या मोरीचे बंधकाम करताना आणलेला सिमेंटचा ठोकळा ठेवण्यासाठी सिमेंट काँक्रीटचा पाया न करताच त्या खड्ड्यात ठेवण्यात आला आहे. त्यामुळे ही मोरी कधीही जमिनीत खचून अपघात होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.



अलिबाग-रोहा रस्त्यावरील चौपदरीकरणाचे काम संथ गतीने सुरू आहे. अलिबाग ते बेलकडे या परिसरात ठेकेदाराने चार ठिकाणी खोदुन ठेवले असून काम मार्गी लावण्याकडे ठेकेदाराने दुर्लक्ष केले आहे. बेलकडे येथे रस्त्यात असणाऱ्या मोरी काँक्रीटीकरण करण्याचे काम गेल्या आठवडाभरापासून सुरू आहे. हे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे चित्र समोर आले आहे. ठेकेदाराने या मोरीचे काम करताना खोदाई करून त्यात थेट चौकोनी गाळा असणारे ठोकळटाकले आहेत. हे ठोकळे खड्ड्यात ठेवताना त्याच्या खाली काँक्रीटीकरणाचा पाया करणे

### ठेकेदारावर कारवाई करण्याची जनतेची मागणी

गरजेचे होते; परंतु, ठेकेदाराने ते सिमेंटचे ठोकळे थेट जमिनीवर ठेवले आहेत. हे ठोकळे देखील निकृष्ट दर्जाचे असून ते वजनदार असल्याने मातीत खचून अपघात घडण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. तसेच, ठेकदाराने मोरीच्या कामासाठी खोदाई करताना जल वाहिनीचे पाईप तोडल्याने या परिसरातील गावांचा पाणी पुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे कामात हलगर्जी करणाऱ्या ठेकेदारविरुद्ध कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत.

## आंबवलेले खत येथे मार्गदर्शन शिबीर



। चणेरा । प्रतिनिधी ।

रिलायन्स बायो एनर्जी, स्वाध्याय फार्मर प्रोड्युसर कंपनी आणि बळीराजा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तळाघर येथील बयोज् फार्ममध्ये द्रव्यरूप सेंद्रिय आंबवलेले खत मार्गदर्शन शिबीर उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात प्रगतशील शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.

रिलायन्स बायो एनर्जी नागोठणे यांनी विकसित केलेले पाण्यासारखे द्रव्यरूप सेंद्रिय खत शेतीसाठी अत्यंत परिणामकारक असल्याचे कंपनीचे प्रमुख अंशुल दुबे यांनी सांगितले. हे खत शेतकरी तयार करत असलेल्या जीवामृतापेक्षा तब्बल ४ पटीने अधिक गुणवत्तापूर्ण असून भातपिके, भाजीपाला, कलिंगड, नारळ, सुपारी, आंबा आणि काजू अशा सर्व पिकांवर उत्कृष्ट परिणाम दर्शविते. प्रसंगीदुबे यांनी सांगितले की, या खताच्या वापरामुळे जमिनीतील ऑर्गॅनिक कार्बनचे प्रमाण वाढते, जमिनीचा पोत सुधारतो आणि पिकांची उत्पादन क्षमता लक्षणीयरीत्या वाढते. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून हे खत शेतापर्यंत विनामूल्य पोहोचविण्यात येणार आहे, अशी खात्री त्यांनी दिली. यावेळी आशिष राख, दीपांशू मुंडे, जितेंद्र जोशी, संतोष दिवकर, कविता दोरगुडे, राजेंद्र जाधव, रेश्मा जोगदंडे, भाऊ दिके, खेळू थिटे, तुकाराम भगत, संज्योत पडवळ, श्रद्धा पवार, शेतकरी बांधव उपस्थित होते.

## गळफास घेऊन आत्महत्या

**पनवेल** : राहत्या घरात अज्ञात कारणावरून एक १७ वर्षीय तरुणाने गळफास घेऊनआत्महत्या केल्याही घटना करंजाडे येथे घडली आहे. चिराग पांचाल (वय १७ रा. करंजाडे) असे या तरुणाचे नाव असून त्याने अज्ञात कारणावरून राहत्या घरात हॉलच्या गॅलरीमधील लोखंडी अँगलला कापडली दुपट्ट्याच्या साहाय्याने आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जागतिक दिव्यांग दिन उत्साहात

। रसायनी । प्रतिनिधी ।

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा येथे जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी वासांबे सरपंच उमा मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्य, जेष्ठ दिव्यांग सदस्य सुभाष खराटे, अध्यक्ष सुनिल माळी, रमाकांत मांडे, वैभव बोरकर, तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते. याप्रसंगी सरपंच उमा मुंढे यांनी दिव्यांगाच्या समस्या समजावून घेऊन त्याचे निराकारण केले. तसेच, परिवहन अधिकारी वर्ग यांच्याशी चर्चा करून बसच्या




फेऱ्या वाढविणे आणि वासांबे परिसरातील दिव्यांग बांधवांना बस प्रवास मोफत करण्याचे आश्वासन सरपंच उमा मुंढे यांनी दिले आहे.

पान १ वरून

## महामानवाला अभिवादन

भारतीय बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत समितीचे आजी-माजी पदाधिकारी, बौद्धाचार्य, महिला, तरुण मंडळींसह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील काही गावांमध्ये मध्यरात्री मेणबत्ती प्रज्वलीत करून महामानवाला अभिवादन करण्यात आले. काही ठिकाणी शनिवारी सकाळी बुद्ध विहारांमध्ये तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्हार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी बुद्धवंदना घेण्यात आली. अलिबाग नगरपरिषदेतदेखील महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, संजना कीर, संजना किर, नगरपरिषद कर्मचारी आदी उपस्थित होते. दरम्यान, अलिबाग नगरपरिषदेच्या कार्यालयातही महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शासकीय कार्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. सायंकाळी आरसीएफ कॉलनी येथून मेणबत्ती प्रज्वलीत करून शुभ्रवस्त्र परिधान करीत पायी रॅली काढण्यात आली. ही रॅली आरसीएफ कॉलनी, पिंपळभाट, चेंढरे ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकपर्यंत काढण्यात आली. या रॅलीला अनुयायींकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

**हजारो अनुयायी चैत्यभूमीकडे**

चैत्यभूमी हे मुंबईतील दादर चौपाटीजवळ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाधी स्थळ आहे. बौद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायींसाठी एक पवित्र श्रध्दास्थान आहे. याठिकाणी लाखो जनसमुदाय ६ डिसेंबरला महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी येतात. ६ डिसेंबर १९५६ मध्ये महामानवाच्या निर्वाणानंतर बौद्ध पद्धतीने अंत्यसंस्कार या भूमीत करण्यात आले. या भूमीला चैत्यभूमी म्हणून ओळखले जात आहे. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमीमध्ये राज्यासह देशभरातील लाखो अनुयायी दाखल झाले. रायगड जिल्ह्यातील १० हजारहून अधिक अनुयायी चैत्यभूमीवर गेले. काही अनुयायी शनिवारी सकाळी तर काही अनुयायी दोन दिवस अगोदरच दादरला दाखल झाले.

## तिरडी आंदोलन

शासन, प्रशासन आणि ठेकेदारांवर दबाव वाढावा यासाठी शनिवारी माणगाव येथील लोणेरे पुलावरून तिरडी यात्रेची घोषणा करण्यात आली होती. ही तिरडी आमच्या वेदनेची निशाणी आहे, असा आक्रोश स्थानिकांमधून होत होता. या आंदोलनात पहेल व खांडपाले येथील अनेक नागरिक पुढाकाराने सहभागी झाले होते. या नागरिकांनी एकमुखाने बायपासचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.

## कोलाड-रोहा मार्गावर भीषण अपघात

तालुक्यातील असल्यामुळे घटनेची माहिती मिळताच शेकडो नागरिकांनी आंबेवाडी आरोग्यकेंद्रात मोठी गर्दी केली होती. त्यामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. अपघाताचा अधिक तपास कोलाड पोलीस करत आहेत.

## महाडमध्ये शिंदे गटाला धक्का

तथा उपजिल्हा समन्वयक सोमनाथ ओझर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत म्हसकर भावकीमधील नागरिकांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत सोमनाथ ओझर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षप्रवेश करत असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना ओझर्डे यांनी, महाडमधील विन्हेरे विभागात येत्या काळात मोठ्या जोमाने अधिकाधिक पक्षप्रवेश शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात होणार असल्याचे सांगितले. या पक्षप्रवेश सोहळ्याला सोमनाथ ओझर्डे यांच्यासह तुकाराम खेडेकर संपर्क प्रमुख विन्हेरे विभाग, महेंद्र जोगळे विभाग प्रमुख, अरुण आंग्रे उपविभाग प्रमुख, सुशील सावंत शाखा प्रमुख, गणेश आंग्रे शाखा प्रमुख, भरत मोरे उपशाखा प्रमुख आदी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## हापूसवर गुजरातचे अतिक्रमण

रोहित पवार यांनी म्हटले आहे की, कोकण शब्द उच्चारताच नकळत पुढे हापूस शब्द निघतो. कोकण हापूसला संपूर्ण जगातून मागणी आहे आणि येथील शेतकऱ्यांनी अत्यंत कष्टाने हापूसला जपले आहे. हापूस म्हणजे येथील शेतकऱ्यांचे जगण्याचे साधन आहे. कोकणातील सर्वाधिक मोठी उलाढाल ही हापूसच्या माध्यमातून होते; परंतु, गांधीनगर आणि नवसारी विद्यापीठाने २०२३ मध्ये वलसाड हापूस नावाने भौगोलिक मानांकन मिळण्यासाठी अर्ज केल्याने कोकण हापूसवर आता मानांकनाचे संकट घोंगावत आहे. सरकारने यामध्ये लक्ष घालावे आणि कोकणातील आंबा उत्पादकांचे संरक्षण करावे. तसेच, कोकणातील सत्ताधारी नेत्यांनीही हा प्रश्न लावून धरावा, अशी विनंती त्यांनी केली आहे.

## विमान कंपन्यांच्या मनमानीला लगाम

विमान कंपन्यांना नवीन भाडे मर्यादांचे पालन करणे बंधनकारक असून परिस्थिती सामान्य होईपर्यंत हे नियम लागू राहणार आहेत. या संकटकाळात, मंत्रालयाने विमान भाड्याचे रिअल-टाइम निरीक्षण करण्याचा आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विमान कंपन्यांवर तात्काळ कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरी उड्डाण मंत्रालयाच्या या पावलामुळे आकाशाला भिडणाऱ्या विमान तिकिटांच्या किमती कमी होण्याची अपेक्षा आहे.

## लोणावळ्याजवळ भीषण अपघात

झाला आहे. तर, टेम्पोच्या उजव्या बाजूचे प्रचंड नुकसान झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुळ गोव्याचे असलेल्या मयुर वेंगुर्लेकर (२४) आणि योगेश सुतार (२१) या दोघांचा या अपघातात मृत्यू झाला आहे. हे दोघेही गोव्याहून लोणावळ्यात फिरण्यासाठी आले होते. अपघातानंतर दोघांचेही मृतदेह स्थानिक रुग्णालयात हलवण्यात आले आहेत. याप्रकरणी लोणावळा पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे.

## जासई ग्रामपंचायतीतर्फे वृक्षारोपण



। उरण । प्रतिनिधी ।

ग्रुप ग्रामपंचायत जासई तर्फे मुख्यमंत्री समृद्धग्राम अभियान अंतर्गत येथील स्मशानभूमीत वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी उरण तालुक्यातील जासईचे उपसरपंच सृष्टी म्हात्रे, सदस्य आदित्य घरत, वीणा घरत, सुलोचना घरत, अश्विनी नाईक, जयश्री घरत आदी उपस्थित होते. ग्रामपंचायत जासई तर्फे केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाच्या सर्वच आदेशाचे, सूचनांचे पालन केले जाते. शासनाच्या सेवा सवलती शेवटच्या घटका पर्यंत पोहोचविले जाते. शासनाने केलेल्या आवाहनानुसार तसेच मुख्यमंत्री समृद्धग्राम अभियान अंतर्गत जासई ग्रामपंचायत तर्फे वृक्षारोपण करण्यात आले. 'झाडे लावा झाडे जगवा', 'पर्यावरण वाचवा', 'निसर्गाचे संवर्धन, संरक्षण करा' असा संदेश ग्रुप ग्रामपंचायत जासईच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

## खोपोली नगरपरिषदेला आयएसओ मानांकन

**खोपोली** : नगरपरिषदेला आंतरराष्ट्रीय दर्जा व्यवस्थापन मानांकन ९००१:२०१५ प्राप्त झाले असून नगरपरिषदेच्या सेवांच्या गुणवत्ता वृद्धीकडे हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. आरओएचएस सर्टिफिकेशन प्रा. लि.च्यावतीने हे प्रमाणपत्र शुक्रवारी (दि.५) प्रदान करण्यात आले. ही उल्लेखनीय कामगिरी साध्य करण्यामागे खापोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज पाटील यांचा पुढाकार, प्रभावी नेतृत्व व सातत्यपूर्ण पाठपुरावा यांचा मोठा वाटा आहे.



## अजिवली विद्यालयाला ट्यूब लाईटची भेट

। चिरनेर । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील अजिवली येथील जनता विद्या मंदिर शाळेचे माजी विध्यार्थी तथा माजी सरपंच परशुराम महाराज यांच्या सौजन्याने जनता विद्यालयाला ५० एल.ई.डी.ट्यूब लाईटची भेट देण्यात आली आहे.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक कांबळे, ससाणे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पायी कोकण दिंडी भाताण पाडा ते देवाची आळंदी अध्यक्ष परशुराम माळी, अजीवली सप्ताहाचे खजिनदार चंद्रकांत गोजे, सदस्य संतोष पाटील, शाळेचे शिपाई संजय कांबळे यांच्यासह शिक्षक वृंद व विध्यार्थी उपस्थित होते.

## वडगांव शाळेला राज्य समन्वयकांची भेट

। रसायनी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद वडगांव शाळेला राज्य समन्वयकांनी सदिच्छा भेट देऊन शाळेच्या प्रगतीची पाहणी केली. यावेळी शाळेच्या उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

खालापूर येथील रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे सर फाऊंडेशन महाराष्ट्राचे राज्य समन्वयक बाळासाहेब वाघ व सिद्धाराम माशाळे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिशा नवोपक्रमाची या पुस्तकाचे लेखक सिद्धाराम माशाळे यांनी शाळेत सर्वांचे योगदान व भूमिका कशी महत्त्वाची आहे, हे विद्यार्थी व शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांना समजावून सांगितले. तसेच, सर फाऊंडेशन महाराष्ट्र अंतर्गत चालणारे विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. बाळासाहेब वाघ यांनी विद्यार्थ्यांना यश, स्पर्धा व मेहनत याविषयी मार्गदर्शन करताना शाळेने अल्पकालावधीत मिळविलेल्या शैक्षणिक यशाबद्दल कौतुक करत विद्यार्थी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे अभिनंदन केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा राजश्री जांभुळकर, मुख्याध्यापक सुभाष राठोड, सहशिक्षक वैजनाथ जाधव, स्वयंसेवक संकेत काठोळे, संचिता गडगे व पालक उपस्थित होते.

# जिल्ह्यात 'जय भीम'चा गजर



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिन रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्या वतीने महामानवाच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील काही गावांमध्ये मध्यरात्री मेणबत्ती प्रज्ज्वलित करून महामानवाला अभिवादन करण्यात आले. काही ठिकाणी सकाळी बुद्ध विहारांमध्ये तथागत गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी बुद्धवंदना घेण्यात आली. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शासकीय कार्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुभ्र वस्त्र परिधान करून बाबासाहेबांच्या पुतळ्यास व प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. संपुर्ण जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात जय भीमचा गजर दिसून आला.

## पीएनपी महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन



| अलिबाग | प्रतिनिधी |

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून शनिवार ( ०६ ) डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रास्तविकात इतिहास विभागाचे प्रा. साईनाथ पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेतला, त्यानंतर महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या विद्यार्थिनी गौरी पुरोहित, श्रुती घरत, वेदांती भोईर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले.

महाविद्यालयातील प्रा. वृषाली घरत, डॉ. अमृता कुमारी, प्रा. मिलिंद घाडगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन चरित्रावर भाष्य केले. आपल्या अध्यक्षीय वक्तव्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनावर काव्यमय प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कार्यालयीन सल्लागार गबाजी गिते, प्रा. कैलास सिंह राजपूत, प्रा.स्वराली ठाकूर, प्रा. हर्षल काटे तसेच इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या प्रा. संपदा शिंदे व आभार प्रदर्शन प्रा. पूजा पाटील यांनी केले.

## उरण महापरिनिर्वाण दिन साजरा




| उरण | प्रतिनिधी |

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन अभिवादन कार्यक्रमाच्या रूपाने संपन्न करण्यात आला. डॉ. ए. के. गायकवाडांनी यानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण घेत असताना त्यांना आलेले विषमतेचे अनुभव, उच्च शिक्षण घेऊन त्यांनी जोपासलेला मानवतावाद, व संविधान निर्मितीतील त्यांचे योगदाना बद्दल मार्गदर्शन केले. तर डॉ. एम. जी. लोणे यांनी भारतातील जातीव्यवस्थेची निर्मिती, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील वैचारिक संघर्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक समतेचा लढ्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ. ए. आर. चव्हाण यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास प्रा. व्हि. एस. इंदुलकर, प्रा. ए. आर. कांबळे, डॉ. पराग कारुळकर, प्रा. रियाज पठाण, महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## ग्रुप ग्रामपंचायत वावर्लेत बाबासाहेबांना अभिवादन



| रसायनी | प्रतिनिधी |

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ वा महानिर्वाण दिनी ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले यांच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

कोटी कोटी जनतेचे भाग्यविधाता, प्रज्ञासूर्य, भारतरत्न, विश्वरत्न, भारताच्या संविधानाचे शिल्पकार, राष्ट्रनिर्माते, महामानव, थोर अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, इतिहासतज्ज्ञ, धर्मशास्त्रतज्ज्ञ, घटनातज्ज्ञ, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गाढे विद्वान, ज्ञानाचे प्रतिक, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, मुंबई विधानसभेचे आमदार, राज्यसभेतील खासदार, प्रौढ मताधिकाराचे जनक, सामाजिक लोकशाहीचे प्रणेते, स्त्री-पुरुष समानतेचे पुरस्कर्ते, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष, विविध वृत्तपत्रांचे व सामाजिक राजकीय धार्मिक संस्थांचे संस्थापक, थोर साहित्यिक, विचारवंत, आदर्श विद्यार्थी, यशस्वी प्राध्यापक, कुशल प्राचार्य, बॅरिस्टर, बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले सरपंच प्रिया प्रफुल्ल विचारे, ग्राम पंचायत सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिवादन केले.

## महाड क्रांतीभूमीत विविध संघटनांची गर्दी

| महाड | प्रतिनिधी |

ऐतिहासिक महाड क्रांतीभूमीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यात आले. शहरातील विविध संघटनांच्या वतीने चवदार तळे येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी आज सकाळपासूनच गर्दी झाली होती.

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने महाड मधील तमाम आंबेडकरी अनुयायांच्या वतीने मेणबत्त्या प्रज्वलित करून आदरांजली वाहण्यात आली. सकाळपासून चवदार तळे येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होण्यासाठी गर्दी झाली होती. शहरातील विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची आणि शहरातील नागरिकांनी तसेच तालुक्यातील आंबेडकरी अनुयायांनी पुष्पहार अर्पण करत बाबासाहेबांच्या नावाचा जयघोष केला.

प्रशासनाच्या वतीने शासनाचे सर्व विभागांचे अधिकारी यावेळी चवदार तळे येथे उपस्थित होते. राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनी देखील चवदार तळे येथे येऊन महामानवाला अभिवादन केले. महाड तालुक्यातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, बहुजन महासंघ, रिपब्लिकन सेना, भारिप बहुजन महासंघ, अशा अनेक संघटनांच्या प्रतिनिधींनी देखील या ठिकाणी अभिवादन केले. तालुक्यासह अनेक ठिकाणाहून आलेल्या भीम ज्योतींचे स्वागत देखील या ठिकाणी करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, क्रांतीस्तंभ या ठिकाणी देखील बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत आदरांजली वाहण्यात आली.



● खांदा वसाहतीतील मुलगंधकुटी विहारातून निघालेला कॅंडल मार्च.




● पनवेल महानगर पालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



● डेरवलीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी कॅंडलमार्चचे आयोजन करण्यात आले होते.



● दादर येथील चैत्यभूमी येथे दाखल झालेले भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व समता सैनिक दल.



● शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगरसेविका संजना कीर, कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, माजी नगरसेवक अनिल चोपडा महामानवाला अभिवादन करताना.

---

जयदिप राऊळचे लष्करी प्रशिक्षण पूर्ण | भव्य मिरवणूक काढत जल्लोषात स्वागत

# 'जय' हो! रायवाडीच्या सुपुत्राची गरुड झेप



| अलिबाग | संतोष राऊळ |

भारतीय लष्करात दाखल होऊन भारत मातेच्या सेवेचे स्वप्न उरात बाळगून सत्यात उतरवणाऱ्या अलिबाग तालुक्यातील आक्षी ग्रामपंचायत हद्दीतील रायवाडी गावाचा सुपुत्र जयदीप जितेंद्र राऊळ याची भारतीय लष्कराच्या तांत्रिक सहाय्यकपदी निवड झाली होती. त्यानंतर त्याने भारतीय लष्कराचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यामुळे त्याची शनिवारी (दि.६) भव्य मिरवणुक काढून स्वागत करण्यात आले. त्याच्या या यशामागे त्याच्या आई-वडीलांचा मोठा हात आहे. यावेळी जयदीपला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### देशाचे पाईक बनण्याचा निर्धार

आजची तरुणाई संगणकीय युगात फॅशनच्या दिशेने झुकलेली असताना केवळ आणि केवळ मातृभूमीच्या रक्षणासाठी निधड्या छातीने पुढे येणारे तरुणदेखील आदर्श ठरत आहेत. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांमधून पदवीधर बनण्यापेक्षा प्रथम देशाचे पाईक बनण्याचा निर्धार करणाऱ्या तरुणांची संख्या वाढताना दिसत आहे. असेच ध्येयवेड्या तरुणाने अवघ्या २०व्या वर्षी आपले आयुष्य देश सेवेसाठी वेचण्याचा निर्णय घेऊन मित्रांसह गावकऱ्यांनादेखील बुचकळ्यात पाडले. जीवन सार्थकी लावायचे असेल तर देशसेवा हा एकमेव उत्तम पर्याय आहे, असे अलिबाग तालुक्यातील रायवाडी गावाचा सुपुत्र जयदीप राऊळ याच्याकडून सांगण्यात आले.

### इतिहासात नाव कोरण्यासाठी सज्ज

जयदीपचे शालेय शिक्षण सं.मं. हायस्कुल नागांव आणि उच्च माध्यमिक शिक्षण जे.एस.एम. विद्यालय अलिबाग येथे झाले. शालेय शिक्षण पूर्ण होण्याआधीपासूनच त्याने भारतीय लष्करात सामील व्हायचा निर्धार केला होता. त्यासाठी त्याने दिवस-रात्र मेहनत घेतली होती. शिक्षण पूर्ण झाले आणि भारतीय लष्करासाठी प्रयत्न केले. काही प्रयत्न अयशस्वी झाले; मात्र, त्याने त्याची जिद्द कायम ठेवली. अखेर एप्रिल महिन्यात त्याच्या मेहनतीला यश आले आणि भारतीय लष्कराच्या तांत्रिक सहाय्यकपदी निवड झाली. त्याचे पुढील प्रशिक्षण मध्यप्रदेश येथे पार पडले. या प्रशिक्षणादरम्यान खुप जणांनी तेथून पळ काढला; मात्र, जयदिपने चिकाटी सोडली नाही. अखेर त्याने यशस्विरित्या आपले प्रशिक्षण पुर्ण केले. पुढील महिन्यात तो भारत मातेच्या सवेत रूजू होणार असून आपले नाव इतिहासात कोरण्यासाठी तो सज्ज झाला आहे.

एक सैनिक देशासाठी आपल्या प्राणासह अनेक गोष्टींचा त्याग करतो. हेच स्वप्न रायवाडी गावातील जयदिप याने उराशी बाळगले होते. शालेय शिक्षण पुर्ण होण्याआधीच सैन्यात भरती होऊन देश सेवाकरण्याचा निर्धार पक्का केला होता. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने सैन्यात दाखल होण्यासाठी तयारी सुरु केली होती. पहिल्या काही प्रयत्नांमध्ये त्याला यश आले नव्हते. मात्र, त्याने प्रयत्न सोडले नव्हते. त्याने अधिक चिकाटीने आणि जिद्दीने सैन्यात भरती होण्यासाठीचा सराव सुरुच ठेवला होता. अखेर त्याच्या प्रयत्नांना यश आले आणि त्याची भारतीय लष्कराच्या तांत्रिक सहाय्यकपदी निवड झाली. त्यानंतर त्याला प्रशिक्षणासाठी मध्यप्रदेश येथे पाठविण्यात आले होते. तेथे त्याने भारतीय लष्कराचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केले. त्यामुळे त्याची शनिवारी आक्षी स्तंभ ते रायवाडीपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणूकीदरम्यान, 'जय जवान, जय किसान', 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय' या घोषणांने परिसर दुमदुमुन गेला होता. यावेळी आक्षी गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ तसेच सर्वपक्षीय नेते, पुढारी, कार्यकर्ते, कुटुंबीय उपस्थित होते.



# संभाजीराजांच्या स्वारीचे साक्षीदार

## ● जंजिऱ्याच्या सेतूचे दगड आजही किनाऱ्यावर ● वर्षातून दोनदा मोठ्या ओहोटीदरम्यान पडताहेत नजरेस

**| मुरुड जंजिरा | सुधीर नाझरे |**

**छत्रपती संभाजीराजांच्या शौर्याने जंजिरा सहज जिंकता आला असता; परंतु महाराष्ट्रावर परकीयांची आक्रमणे चारही बाजूने झाल्याने किल्ले जंजिऱ्याची मोहीम अर्धवट सोडावी लागली. परंतु, त्या आठवणी दगड स्वरूपात आजही राजपुरी किनाऱ्यावर पर्यटकांना पाहायला मिळतात.**



मोगलांना पोर्तुगीजांनी केलेली ही मदत पोर्तुगीजांच्या आणि सिद्दीच्याही कालांतराने चांगलीच अंगाशी आली. १६८२ च्या जून-जुलैमध्ये संभाजीराजांनी चौल (चेऊल) व रेवदंड्यास वेढा दिला, बरेच दिवस तो चालला. संभाजीराजांनी उत्तर कोकणातील दोन किल्ले जिंकून घेतले (१६८३), तसेच जुनी साष्टी व बारदेस येथेही चढाई केली. त्यांनी चौलचा वेढा उठवावा, म्हणून पोर्तुगीजांनी फोंड्यावर हल्ला केला. १६८३ च्या डिसेंबरमध्ये मराठ्यांनी पोर्तुगीजांची अनेक गावे घेऊन फोंडा लढविला. सहा महिन्यांनंतर चौलचा वेढा उठविला. फोंड्याच्या लढाईत येसाजी कंक आणि त्यांचा मुलगा कृष्णाजी यांनी मोठा पराक्रम गाजविला.

१६८२ ते ८५ सालच्या सुमारास पाच हजार सैन्य असणारी गलबते नागोठणे, आणि पेण बंदरांमध्ये सज्ज होती. संभाजी महाराजांचे आरमार १२० गलबते आणि १५ गुराबांनी सज्ज होते. मराठ्यांनी सिद्दीची अनेक जहाजे उडवली व जबर नुकसान केले.

### सेतू उभारण्याचे काम हाती

संभाजी महाराजांनी जंजिरा किल्ल्याभोवती एक सेतूच उभारण्याचे काम सुरु केले. यासाठी ५००० माणसे कामाला लागली. आठशे वार रुंद आणि तीस वार खोल असणारा खंदक दगड, कापूस, गाठोडी टाकून रस्ता तयार करण्यात आला. मात्र, हसन अलिखानने मराठ्यांच्या ताब्यातले कल्याण जिंकून घेतल्याने महाराजांना ही मोहीम दादाजी प्रभु देशपांडे यांच्याकडे सोपवून रायगडी यावे लागले. जंजिऱ्याला मराठा सैन्याचा वेढा असताना सिद्दीची काही जहाजे मुंबई बंदरात आली, तेव्हा महाराजांनी आपल्या खांदेरी येथील आरमाराला लुटण्याचे आदेश दिले.

### लोकप्रतिनिधींचे होतेय दुर्लक्ष

खरं तर, हा इतिहास जंजिरा किल्ल्यात अधिकृत प्रशक्षित गाईडने पर्यटकांना सांगणे गरजेचे आहे. परंतु, पुरातत्व खात्याने किल्ल्यातील माहिती फलकदेखील काढून टाकले आहे. किल्ल्याची पार दुर्दशा झाली आहे. लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## विमानतळाला दि.बांचे नाव कधी?

**| उरण | प्रतिनिधी |**

नवी मुंबई येथे निर्माण करण्यात आलेल्या विमानतळाला येथील प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांचे नेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव विधानसभेने व विधान परिषदेने एकमुखी एकमताने ठराव घेतला व हा ठराव अंमलात आणण्यासाठीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे. मात्र, सदर प्रस्ताव पाठवून दोन वर्षे होऊन गेली, विमानतळाचे उद्घाटनही झाले आणि आत्ता २५ डिसेंबरला विमानाचे उड्डाणही होईल. पण, अजून विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील नाव देण्यात आलेले नाही. याविरोधात भूमीपुत्रांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. तरी, पनवेल, उरण मतदारसंघातून निवडून गेलेल्या खासदार, आमदार यांनी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. सरकारकडून दिशाभूल होत असल्याचा आरोप आहे.

## निवडक

### कातळपाडा येथे दत्तजयंती उत्साहात

**भाकरवड** : अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे ग्रामपंचायतची हद्दीमधील सालाबादप्रमाणे यावर्षीही दत्तजयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कीर्तनकार दिनेश महाराज डोळवी यांनी दत्त जयंतीच्या जन्माची कीर्तन सादर केले. त्यानंतर मरीआई प्रासादिक सेवा भजन मंडळ भाकरवड बुवा देवेंद्र पाटील, वैभव पाटील, मनोदय पाटील, मृदुंगाची साथ रायगड भूषण पत्रकार जीवन पाटील यांनी केली व त्यानंतर दत्त प्रासादिक महिला भजन मंडळ कातळपाडा यांनी हरिजागर केला. सकाळी पहाटे दत्तात्रय पोथी वाचन नंतर ध्वजारोहण व त्यानंतर महाआरती या कार्यक्रमाचे स्वरूप होते व त्यानंतर सायंकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी श्री दत्तात्रय यांचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.



### शिक्षणाधिकाऱ्यांची वाशी शाळेस भेट



**खांब** : रोहा तालुक्यातील प्राथमिक शाळा वाशी या शाळेस जिल्हा शिक्षणाधिकारी दहितुले यांनी सदिच्छा भेट देऊन शालेय कामकाजाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. रा.जि.प. आदर्श प्रा. शाळा वाशी जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी दहितुले यांनी रोहा तालुक्यातील शैक्षणिक कामकाजासंदर्भात आयोजित करण्यात आलेल्या दौऱ्यादरम्यान त्यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्यासमवेत विस्ताराधिकारी काकडे, तालुका गट शिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, केंद्रप्रमुख नारायण गायकर उपस्थित होते. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांची प्रगती, शाळेत संपन्न होणारे विविध उपक्रम, शाळेबद्दल आणि शिक्षकांच्या कामाबाबत समाधान व्यक्त केले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती आणि माजी विद्यार्थी संघाचे लाभत असलेल्या उत्तम सहकार्याचे कौतुक केले.

### बेलपाडा रमला हरिनामात



**चिरनेर** : बेलपाडा येथील श्रीकृष्ण वारकरी हरिपाठ मंडळाच्या वतीने तुकाराम गणा घरत यांच्या निवासस्थानी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी तुकोबाराय गाथा पारायणाचे वाचन होणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि.५) अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ झाला. हा अखंड हरिनाम सप्ताह शुक्रवार दि.१२ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. यंदाचे हे ३६ वे वर्ष म्हणजे त्रीतपपुर्ती सोहळा म्हणून साजरा करण्यात येणार आहे. अखंड सप्ताहामध्ये काकड आरती, गाथा पारायण, संगीत भजन, हरिपाठ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात खास महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नामांकित कीर्तनकारांची किर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा समाजात असलेले ताणतणाव, साक्षरता, निसर्गप्रेम, समता आणि बंधुत्व, तसेच स्त्रीभ्रूणहत्या अशा महत्त्वाच्या विषयावरती विशेष मार्गदर्शन आणि प्रबोधन होणार असल्याची माहिती हभप गजानन ठाकूर महाराज व भजनी बुवा अशोक कान्हा म्हात्रे यांनी दिली.



### प्रशिक्षितांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान

**खांब** : संपूर्ण रायगड जिल्ह्यास राज्यभरात आपत्काळात भरीव योगदान देऊन समाजाच्या हितासाठी कार्य करणाऱ्या सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था या संस्थेचा प्रशिक्षित प्रमाणपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला आहे. ४ डिसेंबर जागतिक पर्यावरण संवर्धन दिनानिमित्त सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची दखल रोहा वनविभागामार्फत घेण्यात आली. या प्रशंसनीय कार्याचा गौरव म्हणून रोहा वनविभाग कार्यालय येथे (उपवनसंरक्षक) शैलेंद्रकुमार जाधव यांच्या हस्ते संस्थेला 'प्रशिक्षित पमापत्र' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

## लोखंडी शिगा धोकादायक

**पनवेल** : पनवेल बस आगारातून रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर लोखंडी शिगा बाहेर आलेल्या असून, त्या प्रवाशांसाठी धोकादायक ठरत आहेत. सकाळ-संध्याकाळ रेल्वे गाठण्यासाठी घाई करणाऱ्या नागरिकांना या शिगांमुळे दुखापत होण्याची शक्यता असल्याने प्रवासीवर्गात मोठी नाराजी आहे. पादचारी पुलावरील वाढती गर्दी आणि मार्गावरील असुरक्षित शिगा या दोन्ही गंभीर समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन उपाययोजना कराव्या, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल महानगर सचिव प्रकाश म्हात्रे यांनी रेल्वे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## तंबाखूमुक्ती युवा अभियान

**| उरण | प्रतिनिधी |**

उरणयेथीलद्रोणागिरीऔद्योगिक प्रशिक्षण संस्था, उरण येथे इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाच्यावतीने 'तंबाखू मुक्ती युवा अभियान ३.०' अंतर्गत जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात दातांचे डॉ. संतोष झापकर यांनी विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. झापकर यांनी तंबाखूचे विविध प्रकार, त्यातील अपायकारक द्रव्ये आणि तंबाखू सेवनामुळे होणारे मुख कर्करोग, फुफ्फुसांचे विकार, हृदयविकार, दात-हाडांचे नुकसान आदी गंभीर दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. व्यसनातून मुक्त होण्यासाठी आवश्यक उपाययोजना, समुपदेशनाची गरज आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याचे महत्त्व यावरही त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

शिबिरास संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तंबाखूमुक्त समाज घडवण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. संस्थेच्या वतीने. झापकर यांचे मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी संस्थेचे प्राचार्य मा.व. पिल्ले, गट निर्देशक देशमुख, विद्यार्थी आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए.एस .पाटील यांनी केले. संस्थेच्यावतीने झापकर यांचे आभार मानले.

## 'मतदार यादीतील दुबार नावे हटवा'

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या तोंडावर एक अत्यंत गंभीर आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीत थेट १२,१४३ दुबार आणि संशयित मतदारांची नावे घुसल्याचा खळबळजनक दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी केला आहे.

सदर नावे जिल्ह्याबाहेरील, म्हणजेच नवी मुंबईतील बेलापूर आणि ऐरोली विधानसभा मतदारसंघातील असल्यामुळे आगामी निवडणुकीच्या निष्पक्षतेवरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्त/प्राधिकृत अधिकारी (मतदार यादी) यांना तातडीने निवेदन देऊन या महागोंधळावर कारवाईची मागणी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत स्थानिक मतदारच असणे कायद्याने बंधनकारक असताना, पनवेल मनपाच्या यादीत नवी मुंबईतील मतदारांचा ढीग आढळला आहे. बेलापूर मतदारसंघ (विधानसभा १५१) ते पनवेल मनपा यादीत ६,१३८ दुबार/संशयित नावे तर ऐरोली मतदारसंघ (विधानसभा १९०) ते पनवेल मनपा यादीत ६,००५ दुबार/संशयित नावे असून, या संशयित मतदारांची संख्या एकूण १२,१४३ इतकी आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, विधानसभा मतदार याद्यांची प्रभागनिहाय फोड करून स्थानिक निवडणुकांची यादी तयार केली जाते. मात्र, पनवेल मनपाच्या यादीत जिल्ह्याबाहेरील मतदार घुसल्याने मतदानाच्या वैधतेवरच थेट आक्षेप घेण्यात आला आहे. प्रारूप यादीवर हरकती घेण्याची अंतिम मुदत ३ डिसेंबर २०२५ होती. यापूर्वीच्या विधानसभा निवडणुकीतही मोठ्या प्रमाणावर दुबार नावे आढळली होती, पण त्यावेळी कोणतीही कठोर कारवाई झाली नव्हती. त्यामुळे यंदा याच बोगस मतदारांच्या जीवावर निवडणुकीचे निकाल फिरवले जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

## कृषी विभागाचा पुढाकार; श्रमदानातून बांधला वनराई बंधारा

**| नेरळ | प्रतिनिधी |**



कर्जत तालुका कृषी विभाग यांच्या माध्यमातून श्रमदानातून वनराई बांधण्याच्या कामाचा उपक्रमाला सुरुवात झाली. वनराई बंधाऱ्यांच्या माध्यमातून जमिनीमधील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी वनराई बंधारे बांधून नाले आणि नद्यांमधून वाहणारे पाणी अडवण्याचा उपक्रम सुरु केला आहे. कोषाण, ता. कर्जत येथे श्रमदानाने वनराई बंधारा बांधण्याचा कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

कर्जत कृषी विभागाच्या वतीने कर्जत तालुक्यात उन्हाळ्यात कोरड्या असलेले नदी आणि नाले याठिकाणी असलेले पाणी अडवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. हे पाणी अडवण्यासाठी कृषी विभाग यांच्याकडून दरवर्षी केला जातो. यावर्षी श्रमदानातून वनराई बंधारे बांधण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ मोहाली येथे कृषी विभागाच्या वतीने करण्यात आला.कृषी विभागाच्या आवाहनानंतर स्थानिक ग्रामस्थ राजेंद्र ठोंबरे यांनी श्रमदानात आपल्या गावातील सहकारी यांच्यासह सहभाग घेतला. कृषी विभागाचे कर्जत तालुका मंडळ कृषी अधिकारी दिनेश कुमार कोळी तसेच सहायक कृषी अधिकारी पंजकाज सोनकांबळे यांनी श्रमदान करणाऱ्या कर्मचारी आणि ग्रामस्थ यांना मार्गदर्शन केले. कर्जत तालुक्यात कृषी विभागाला वनराई बंधारे बांधण्यासाठी मिशन ग्रीन मुंबईचे डॉ. सुभाजीत मुखर्जी आणि लीप इंडिया फाऊंडेशन यांच्याकडून सहकार्य केले जात आहे. सदर वनराई बंधाऱ्यातील पाण्याचा उपयोग हा भाजीपाला व कडधान्य पिकांसाठी पाण्याचा वापर करण्यात येणार आहे.

## चोरटे गुजरातमधून गजाआड

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहरातील हॉलमार्क मोटर लिंकस् येथून १ लाख ८१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून पळून गेलेल्या दुकलीपैकी एकाला पनवेल शहर पोलिसांनी गुजरातमधून ताब्यात घेतले आहे.

पनवेल शहरातील पनवेल इंडस्ट्रीयल को.ऑ. इस्टेट लिमीटेड मधील हॉलमार्क मोटर लिंकस् एल.एल.पी., (रॉयल इनफील्ड) येथून लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप, दोन मोबाईल फोन व १ लाख ७० हजार रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना घडली होती.

याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांकडे गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण, पोहवा कुडावकर, पोना प्रविण मेथे व पोशि शशीकांत काकडे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेतला असता आरोपी मुरली उर्फ अलेक्स पवार (रा. वलसाड, गुजरात) याला गुजरात येथून ताब्यात घेतले असता त्याने त्याचा साथीदार दिनेश माहिते (रा. वलसाड, गुजरात) याच्या साथीने चोरी केल्याची माहिती दिली. त्याच्याकडून पोलिसांनी ५० हजार रुपये जप्त केले असून, त्याचा दुसरा साथीदार दिनेश माहिते याचा शोध पोलीस घेत आहेत.

## महामार्ग वेळेत पूर्ण करा: खा. तटकरे

**| माणगाव | प्रतिनिधी |**



मुंबई-गोवा महामार्गाचे काम अखेर निर्णायक टप्प्यात पोहोचावे, जनतेला दिलासा मिळावा आणि वर्षानुवर्षे सुरू असलेला त्रास कमी व्हावा, वाहतूक कोंडीतून मुक्तता व्हावी यासाठी खा. सुनील तटकरे यांनी सुतारवाडी येथील कार्यालयात त्यांनी शासकीय अधिकाऱ्यांची तातडीची आढावा बैठक घेतली. दरम्यान, अकार्यक्षमता, विलंब व वेळकाढूपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांना झापले.

महामार्गावरील कामांची प्रत्यक्ष स्थिती जाणून घेताना अधिकाऱ्यांकडून मिळालेली विलंबाची कारणे आणि वेळकाढू उत्तरे पाहून खासदार तटकरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''कामात हयगय सहन केली जाणार नाही. दिवस-रात्र काम करा. महामार्ग वेळेत पूर्ण झाला पाहिजे.'' पूल, रस्ते, उड्डाणपूल, बायपास सर्व प्रलंबित कामांना गती देण्याचे आदेश दिले. महामार्गावरील काही कामे प्रलंबित असल्यामुळे जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अर्धवट पूल, सर्व्हिस रोड उड्डाणपुलांचे अपूर्ण काम, बायपास मार्गांवरील धीम्या हालचाली, मार्गावरील खड्डे आणि निकृष्ट पॅचवर्क, या सर्वांवर खासदारांनी थेट लक्ष केंद्रित करून निर्धारित मुदतीत काम पूर्ण करण्याचे कडक आदेश दिले.

दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही हा महामार्ग २०२६ मध्ये पूर्ण होईल, असे संसदेत आश्वासन दिल्यामुळे जनतेमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे. परंतु, आता तरी दिलेले आश्वासन पूर्ण होणार का, असा सवालही नागरिकांमधून विचारला जात आहे.

## 'अटल करंडक'च्या सोहळ्याचे उद्घाटन

**| प्रतिनिधी | प्रतिनिधी |**

पनवेल रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरी सोहळ्याचे उद्घाटन पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अभिनेते गिरीश ओक, दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, अभिनेते सुनील तावडे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.५) झाले.

तीन दिवस चालणाऱ्या या महाअंतिम फेरीत राज्यभरातून १०० हून अधिक एकांकिकांमधून निवड झालेल्या उत्कृष्ट २५ एकांकिका सादर होणार आहे. नाट्य रसिकांना मोठी मेजवानी मिळाली असून, विशेष म्हणजे या सोहळ्याला युवा ते ज्येष्ठ नाट्य रसिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

महाअंतिम फेरीच्या पहिल्या दिवशी वसंतराव नाईक विज्ञान संस्था नागपूरची एकांकिका वि. प्र, मुलुंड वाणिज्य विद्यालय स्वातंत्र्य सौभाग्य, मिथक मुंबईची कारण काय, एकदम कडक नाट्य संस्था भाईंदरची बकेट लिस्ट,, वि. ग. वझे विद्यालय मुलुंडची द गर्दभ, आर्टस कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज साताराचे सोयरीक, नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरीची प्रतीक्षायान, राजाराम बापू अभियांत्रिकी महाविद्यालय इस्लामपूरची हाफ वे, कलादर्पण पनवेलची आख्यान-ए- झुरळ आणि रेवन एंटरटेनमेंट पुणेची सांग रहियो या दहा एकांकिकांचे सादरीकरण होते. उर्वरित १५ एकांकिका शनिवार व रविवारी सादर होणार आहेत.


स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि. ७ डिसेंबर रोजी होणार असून, स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रूपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध अभिनेते व निर्माता सुनील बर्वे यांचा 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

**पुण्यात उलूक महोत्सवातून जनजागृती | देशभरातून हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग**

## घुबडाच्या रक्षणासाठी 'इला'चा पुढाकार

**| चौल | प्रतिनिधी |**





घुबड या पक्ष्याबाबत असलेलया काही चुकीच्या गैरसमजुती व अंधश्रद्धा दूर करण्याचे काम पुण्याची इला फाऊंडेशन संस्था करीत आहे. घुबडाला भारतात काही ठिकाणी लक्ष्मीचे वाहन म्हणूनही पुजले जाते, तर इंग्लड युरोपियन देशांमध्ये त्याला विजयाचे, समृद्धीचे प्रतीक म्हणूनही अनन्यसाधारण महत्त्व आहे. घुबडाच्या संरक्षणासाठी 'इला' काम करीत असून, त्याचाच भाग म्हणून देशभरातील विद्यार्थ्यांसाठी पुणे येथे भारतीय घुबड अर्थात उलूक महोत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. यंदाचे हे महोत्सवाचे सहावे वर्ष होते.

इला हॅबिटॅट, पिंगोरी गाव, ता. पुरंदर, पुणे या ठिकाणी उलूक उत्सवाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. यामध्ये पिंगावरील ग्रामस्थ पुण्याचे अनेक भागांतून तसेच भारतातील नागालँड, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान आदी भागांतून अनेक शाळांनी आपला सहभाग नोंदविला. यावेळी अनेक शाळांनी नाट्यमंचावर विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरणातून घुबड संवर्धनाबद्दल जनजागृती केली.

### जगभरात २५४ प्रकारची घुबडे

जगात एकूण २५४ प्रकारची घुबडे असून, कोट्यवधी रुपयाचे शेतीचे नुकसान घुबडांमुळे वाचते. अन्नधान्य म्हणजे भारतातील धनलक्ष्मी देशाचे खरे धन याचे संरक्षण करणारे घुबड हे त्याकरिताच कलकत्त्यामध्ये लक्ष्मीचे वाहन म्हणून पुजले जाते. तर, इंग्लंड आणि काही युरोपियन देशांमध्ये त्याला विजयाचा आणि समृद्धीचे प्रतीक म्हणूनदेखील अनन्यसाधारण महत्त्व आहे. इला फाउंडेशन संस्था गेली अनेक वर्षे उलूक महोत्सवाचे आयोजन करते.

### प्रेमसागर मेस्त्रींचा गौरव

महाड रायगड जिल्ह्यातील लुप्त होत जाणाऱ्या लांब चोचीचे गिधाड आणि पांढऱ्या पाठीचे गिधाड यांचे संवर्धन करणाऱ्या 'सिस्केप महाड' संस्थेचे अध्यक्ष प्रेमसागर मेस्त्री यांना सन्मानित करण्यात आले. नेपाळ देशांमधून घुबड या प्रजातींवर देशभर काम करणारे आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये आपल्या संवर्धन कार्याचे संशोधन प्रबंध सादर करणारे शास्त्रज्ञ राजू आचार्य शर्मा यांना त्यांच्या कार्याबद्दल गौरवण्यात आले. पुणे येथील आणि सध्या राजस्थान येथे बिबट्या आणि मानव यांच्या संघर्षावर संशोधन करणारे स्वप्निल कुंभोजकर यांनादेखील सन्मानित करण्यात आले. तसेच गेली दहा वर्षे जास्त पर्यावरण संवर्धनाचे काम करणारी संस्था म्हणून 'निसर्गप्रेमी मित्र मंडळ' पेठ वडगाव कोल्हापूर या संस्थेला सन्मानित करण्यात आले.

### तस्करी चिंतेची बाब

वन्यजीव संरक्षण कायदे अंतर्गत संरक्षण असतानाही घुबडांची भारतभर तस्करी सुरू आहे. 'ट्राफिक इंडिया' या संस्थेच्या अहवालानुसार, दिवाळीदरम्यान भारतात किमान ७५ हजार घुबडांची जादूटोणा आणि अंधश्रद्धा, पाळण्यासाठी किंवा परप्रांतात अवैध व्यापारासाठी तस्करी केली जात आहे. याबाबतची माहिती उलूक महोत्सवाच्या निमित्ताने इला फाऊंडेशन या संस्थेचे अध्यक्ष पक्षी तज्ज्ञ डॉ. सतीश पांडे यांनी व्यक्त केले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**७ डिसेंबर**

१)श्री.दिगंबर रामचंद्र वारंगे
बाजारपेठ, अलिबाग
७/१२/१९४२
२)श्री.मच्छिंद्रनाथ शिमगा झिटे,
कोळीवाडा, अलिबाग
७/१२/१९४८
३)श्री.अशोक नागू भगत
कोळीवाडा, अलिबाग
७/१२/१९५३
४) श्रीमती रंजना रामचंद कडवे
मु.मुक्काम पोस्ट, सारळ अलिबाग



## रखडलेला रस्ता अखेर मार्गी

**नवीन पनवेल :** खारघर, सेक्टर १० मधील ज्वेल हाईट इमारतीसमोरील सुमारे १०० ते १५० मीटरचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून डांबरीकरणाविना रखडलेला होता. सुरुवातीला सिडकोच्या ताब्यात असताना हा रस्ता तयार झाला; मात्र नंतर पनवेल महानगरपालिकेच्या अखत्यारीत आल्यानंतरही या रस्त्याची कोणतीही दुरुस्ती अथवा डांबरीकरणाचे काम झाले नव्हते. परिणामी, येथील रहिवासी मोठ्या गैरसोयीला सामोरे जात होते. ज्वेल हाईट्स सोसायटीचे चेअरमन प्रशांत शिंगाडे, अशोक भोसले, विनोद वावरे, देवेंद्र शर्मा, वीरेंदर शर्मा, हिना सिंग यांनी सर्व कमिटी सदस्यांसह खारघर भाजप शहर मंडलाचे उपाध्यक्ष अजित अडसुळे यांना बोलावून नुकतीच भेट घेतली. रखडलेल्या रस्त्याच्या प्रश्नाबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. अडसुळे यांनी तात्काळ पालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधत संबंधित विभागाला निर्देश दिले. त्यानंतर पुढील तीन दिवसांत रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम प्रत्यक्ष सुरू करण्यात आले. काम सुरू होताच काही आजी-माजी समाजसेवकांनी घटनास्थळी येऊन फोटोसेशन करत श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा स्थानिकांमध्ये रंगली.

# अंडरपास रोडसाठी जनआक्रोश

## आंबेवाडी वरसगाव येथील नागरिक आक्रमक



**| कोलाड | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गांवरील आंबेवाडी वरसगांव बाजारपेठेत उड्डाण पुलाचे काम सुरु असुन या बाजारपेठेत येजा करण्यासाठी कोणताही मार्ग ठेवला नाही यामुळे बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी शुक्रवार, दि.५ डिसेंबर रोजी दोन अंडरपास रोड बनविण्यात यावा यासाठी दोन तास बाजारपेठेत बंद करून जनआक्रोश आंदोलन करण्यात आला. मंत्री भरत गोगावले यांच्या मध्यस्थीने आंदोलन थांबाविण्यात आले.

यावेळी पर्यायी मार्ग काढण्यासाठी मंत्री भरत गोगावले हे उपस्थित होते. यावेळी एन.एच. आयचा अधिकारी निखिल कुमार यांच्याशी चर्चा करून सांगितले की, आम्ही तुमचे काम थांबावत नाही. परंतु तुम्ही आंबेवाडी बाजारपेठेतील व्यापाऱ्यांची समस्या जाणून घ्या, त्यासाठी त्यांना दोन अंडरपास रस्ते गरजेचे आहेत. यामुळे तुम्ही ज्या ठिकाणी अंडरपास रस्ता पाहिजे ती जागा शिल्लक ठेवून पुढील काम सुरु ठेवा.

यावेळी संजय कुर्ले, गणेश शिंदे, महेंद्र वाचकवडे, चंद्रकांत लोखंडे, चंद्रकांत जाधव, उदय खामकर, प्रमोद लोखंडे, कुमार लोखंडे, भरत सातांबेकर, जगदीश प्रभू, श्रीकांत चव्हाण, मनोज जवके, जापारा राठोड, मयूर जैन, भावेश जैन, असंख्य व्यापारी, रहिवासी नागरिक, रिक्षा, अपेरिक्षा, मिनिडोअर, टेम्पो, संघटनेचे असंख्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

आंबेवाडी वरसगांव बाजारपेठेत उड्डाण पुलाचे काम सुरु असून, या बाजारपेठेत प्राथमिक आरोग्य केंद्र, आंबेवाडी ग्रामपंचायत कार्यलय, ज्येष्ठ नागरिक सभागृह, अंबरसावंत मंदिर, अंगणवाडी असल्यामुळे या मार्गाकडे जाण्यासाठी अंडरपास रस्ता नसल्यामुळे या नागरिकांना हेलपाटे मारावे लागणार आहे. तसेच पलीकडे स्मशानभूमी, व्यावसायिकांच्या दुकानात, तसेच इतर ठिकाणी जाण्यासाठी अंडरपास रस्ता पाहिजे होता. यासाठी संबंधित हायवेच्या अधिकारी यांनी येथील नागरिकांना विश्वासात घेऊन जनसुनावणी घ्यायला पाहिजे होती. यासाठी येथील नागरिकांनी निवेदन दिले. परंतु, यासाठी कोणीच उपस्थित राहिले नाहीत. यासंदर्भात मुंबई-गोवा महामार्गाचे काम एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण होईल अशी नवीन डेडलाईन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. तरी तूर्तास जनआंदोलन थांबविले असले तरी आंबेवाडी बाजारपेठेतील दोन अंडरपास रस्त्याच्या कामाची समस्या येत्या पंधरा दिवसांत पूर्ण झाली नाही, तर तीव्र आंदोलन करू, असा इशारा आंबेवाडी बाजारपेठेतील नागरिकांकडून देण्यात आला आहे.

# पुष्पक नगरसाठी एनएमएमटी बससेवा

**| नवी पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळबाधितांसाठी देण्यात आलेल्या भूखंडावर पुष्पक नगर ही नवी वसाहत तयार होत आहे. पुष्पक नगर हे नियोजित शहर आकार घेत असताना या ठिकाणी नागरिकांना समस्या भेडसावत आहे ती सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची. विमानतळानजीक असलेल्या शहराचे भविष्य उज्ज्वल आहे. त्यामुळे भविष्यात येथील नागरिकीकरण झपाट्याने वाढणार आहे. त्यामुळे येथे एमएमएमटीची बससेवा सुरु करण्यासाठी दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेमार्फत एनएमएमटी बस सेवा पुष्पक नगरसाठी सुरु करावी, असे निवेदन संस्थेचे अध्यक्ष सुनील कटेकर यांनी मंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात दिले. ते वाचल्यावर लगेचच त्यावर सकारात्मक भूमिका घेत त्यांनी येथे उपस्थित असलेल्या एनएमएमटीच्या पदाधिकाऱ्यांना त्यावर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले.

यावेळी एनएमएटीचे अधिकाऱ्यांनीहीयावेळीसकारात्मक प्रतिसाद लवकरच याबाबत पाऊले उचलण्याचे आश्वासित केले. नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सुरु असलेल्या एनएमएमटीच्या बससेवेचा लाभ बहुसंख्य पनवेलकरांना होत आहे. ही सेवा पनवेलकरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. दापोली, श्रीरामनगर परिसरात आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधितांना विमानतळ प्राधिकरण पुष्पकनगर नोड विकसित करीत आहे. येथील नागरिकीकरण झपाटयाने वाढणार आहे. मात्र या ठिकाणाहून रहिवाशांना येण्याजाण्यासाठी कोणतीही सार्वजनिक सेवा उपलब्ध नसल्याने या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या नागरिकांना नाहक भुर्दंड पडत आहे.

# ‘नशेडींसाठी पुनर्वसन केंद्र उभारा’

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या अंमली पदार्थांच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. शहरातील पोलिस प्रशासन सातत्याने कारवाई करत असले तरी व्यसनाधीन तरुणांना योग्य वैद्यकीय उपचार, मानसिक समुपदेशन आणि दीर्घकालीन पुनर्वसन सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांचे समाजात पुनर्वसन करणे अत्यंत कठीण ठरत आहे.

सध्या पनवेल परिसरात उपलब्ध असलेली पुनर्वसन केंद्रे पूर्णपणे खासगी स्वरूपात चालवली जात असून त्यांचे शुल्क अत्यंत जास्त आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मध्यमवर्गीय तसेच सामाजिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या अनेक पालकांना त्यांच्या मुलांचे उपचार करणे परवडत नाही. अशा परिस्थितीत पालक मानसिक, आर्थिक आणि सामाजिक संकटात सापडतात. व्यसनाधीन तरुणांना योग्य उपचार मिळाल्यास ते पुन्हा एकदा सन्मानाने समाजात प्रविष्ट होऊ शकतात. त्यांच्या कुटुंबांचे आयुष्य पुन्हा स्थिर आणि सुखकर होऊ शकते.

त्यामुळे पनवेल महानगरपालिकेने पुढाकार घेऊन पनवेल शहरात शासनमान्य, प्रशिक्षित तज्ञ, डॉक्टर, मानसोपचार तज्ज्ञ, समुपदेशक आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध असलेले सरकारी पुनर्वसन केंद्र सुरू करणे अत्यावश्यक असल्याचे तसेच लवकरात लवकर सदर पुनर्वसन सुरू करण्याच्या मागणीच पत्र नुकतीच युवासेना पनवेल महानगर समन्वयक जय कुष्टे यांनी जिल्हा अधिकारी पराग मोहिते यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेशजी चितळे यांची भेट घेऊन दिले.

## शाहिद मुल्ला सहसचिवपदी

**पनवेल :** काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते अल्पसंख्यांक समाजाचे निराधारांचे सामाजिक कार्यकर्ते शाहिद मुल्ला यांची भारतीय राष्ट्रीय मजदूर युवा काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सहसचिवपदी नियुक्ती करण्यात आली. प्रदेश अध्यक्ष संजय तायडे यांच्या मान्यतेने नाशिक कांबळे उपाध्यक्ष यांच्या सहीने पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सुदाम पाटील हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. याप्रसंगी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आर.सी. घरत, जी.आर. पाटील, शशिकांत बांदोडकर, निर्मला म्हात्रे, हेमराज म्हात्रे, लतीफ शेख, सुधीर मोरे, गोविंद लोंढे, अभिजीत पाटील यांच्यासह अन्य मान्यवरांनी शाहिद मुल्ला यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पालिका हद्दीत स्वच्छतेचे तीनतेरा

## आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**| नवी पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महापालिका हद्दीत तापाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असताना पनवेल महापालिकाचे आरोग्य विभागाचे अधिकारी नागरिकांना स्वच्छताचे नियम पाळण्याबाबत सूचना करताना दिसत आहेत. तसेच ताप, सर्दी, खोकला टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे आवाहन करीत आहेत. मात्र, शहरात उघड्यावर खाद्यपदार्थ बनवून विक्री केली जात आहे. तसेच उघड्यावर मांस विक्री केली जात आहे. तसेच शहरातील बेकायदेशीर खाऊगल्ल्यांची घाण फेरीवाले रस्त्यावर, गटारी टाकतात. याबाबत पालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष दिसत आहे.

नवीन पनवेल शहरात रेल्वे स्थानक परिसरात स्वच्छतेचे तीनतेरा वाजले आहेत. वर्दळीच्या ठिकाणी बेकायदेशीर टपरीधारक महानगरपालिकेची कुठलाही व्यवसाय परवाना न घेता टपरीमध्ये हॉटेल सुरू केले असून, फूटपाथवर रात्री भांडी धुवून सर्व घाण रस्त्यावर व आजूबाजूच्या गटारात टाकली जात असल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य आहे. गेंड्याची कातडी असलेल्या पालिका अधिकाऱ्यांनी निर्लज्जपणाचा कळस गाठला आहे. पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील अनधिकृत धंद्याबाबत नागरिकांना अतोनात होणारा त्रास आणि त्या विरोधात असलेल्या अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. असे असताना पनवेल महानगर पालिकेची कामगिरी जैसे थे आहे. या परिसरात अनधिकृत बांधकामांवर पालिकेचे नियंत्रण नसल्याने त्यात वाढ होत आहे. बेकायदेशीर टपरीधारकांकडून अतिक्रमण विभागातील कर्मचारी हप्ते घेत असल्याचे बोलले जात आहे. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांना हप्ते मिळत असल्याचे येथील ज्येष्ठ नागरिक बोलत आहेत. यामुळे येथे कुठलीही कारवाई होत नाही. याचा त्रास सकाळी कामधंद्यासाठी जाणाऱ्या चाकरमानी, आजूबाजूच्या सोसायटीच्या रहिवासीना तसेच मॉर्निंग वॉकसाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई होत नाही. येथील करदात्यांकडून महापालिकेच्या मनमानी कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत आहेत.


## ‘झूम’मध्ये ईट प्ले रीड

**नवीन पनवेल :** आय एम फिट या इन्स्टिट्यूटद्वारे उलवे भूमीपुत्र भवन ऑडिटोरिम येथे झूम कार्यक्रम पार पडला. यामध्ये ईट प्ले रीडने आनंददायी सहभाग नोंदवला. आय एम फिट इन्स्टिस्ट्यूटद्वारा झूम कार्यक्रम डेंनीप्रीत सिंग यांच्याकडून आयोजित करण्यात आला. या ठिकाणी अनेक कलाकारांची उपस्थिती होती. हे औचित्य साधून ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत ईट प्ले रीडच्या राजदूतांनी या गौरव सोहळ्यात सहभागी होऊन या अभियानाचा आवाज सर्वसामान्यांपर्यंत आणि विशेष अतिथींनाही दिला. या कार्यक्रमांत कलाकारांची विशेष हजेरी लाभली. या ठिकाणी अनेक नृत्याविष्कार सादर झाले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ७ ते १४ डिसेंबर २०२५


ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## नोकरदारांना दिलासा



**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे व त्यातून मार्ग काढा. आठवड्याच्या पूर्वार्धात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे; पण त्यानंतर मात्र कामे मनासारखी होऊ लागतील. कौटुंबिक वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. घरातील व्यक्तींकडे जास्त लक्ष द्या. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. प्रकृतीस्वास्थ्य जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आठवड्याच्या मध्यावर आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरेल. प्रवासात सावध राहा. स्थावर-जंगम बाबतीतील प्रश्नांना चालना मिळेल. कलाकार व्यक्तींना बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल व व्यापारी व्यक्तींना उद्योगधंद्याला चालना मिळेल. आप्तेष्ट मंडळींच्या संपर्कात राहाल. सामाजिक कार्यात अग्रेसर राहाल. **महिलांना–** धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. प्रत्येक बाबतीत जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. जोडीदाराची साथ मिळेल. अचानक एखादी भेटवस्तू मिळेल. घरातील लहान मुलांवर लक्ष ठेवा. **शुभदिनांक–** ०७,०८.

## उत्तम धनलाभ प्राप्त होईल



**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कौटुंबिक स्थिती सुरुवातीमध्ये बरीच चांगली राहील; परंतु, मध्यात कुठल्या जमिनीच्या गोष्टीला घेऊन घरातील मोठ्या लोकांसोबत वाद होऊ शकतो. करिअरच्या दृष्टीने तुम्हाला यावेळी चांगली संधी प्राप्त होईल. ज्यामुळे तुमच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधार होईल. या कालावधीत कुणासोबत देवाणघेवाण करू नका. कुठल्या यात्रेवर गेले तर आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. आपल्यासोबत यात्रेच्या वेळात दुर्घटना होण्याची शक्यता आहे. संतानकडून या कालावधीत चांगली बातमी ऐकायला मिळेल. तुम्ही आपल्या घरात काही मंगलकार्य संपन्न करवून घेऊ शकतात. तुम्हाला आपल्या कार्यात यश मिळेल आणि उत्तम धनलाभ प्राप्ती होईल. तुम्हाला तुमच्या प्रियजन, मित्र आणि जवळच्या लोकांसोबत भेटण्याची संधी मिळेल. **महिलांना–** जे काम तुम्ही करतात त्यात तुमचे श्रेष्ठ प्रदर्शन सुरु ठेवा, कारण तुम्हाला त्या मेहनतीचे पूर्ण परिणाम प्राप्त होतील आणि काही संधी तुम्हाला मिळू शकतात. तुम्ही तुमच्या संवेदनशीलपणामुळे चांगल्या प्रकारे आव्हानांवर विजय प्राप्त कराल. **शुभदिनांक–** ०९,१०.

## आयुष्याला कलाटणी मिळेल




**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवात जरी चांगली नसेल; परंतु, शेवट बराच चांगला असेल. सुरुवातीमध्ये तुम्ही तणावात येऊ शकतात. ज्यामुळे तुमची कौटुंबिक स्थिती बिघडू शकते. महिन्यात तुम्हाला एक अशा नोकरीची ऑफर येईल जे तुमचे आयुष्य बदलू शकते. या कालावधीत तुम्ही कामाच्या निमित्ताने परदेशात जाऊ शकतात. निःसंतान दांपत्याला या कालावधीत संतान सुख मिळण्याचे पूर्ण योग आहेत. हा कालावधी तुमच्यासाठी थोडा आव्हानात्मक राहील. या काळात कुठेही गुंतवणूक करू नका आणि कुठलीही नवीन गोष्ट खरेदी करू नका. वैवाहिक जीवन आनंदी राहील आणि कुठलीही मोठी समस्या येणार नाही. सासरच्या पक्षात तुमचा मान-सन्मान वाढेल आणि प्रत्येक मोठ्या कामात तुमचा सल्ला घेतला जाईल. समाजाच्या सन्मानित आणि मोठ्या व्यक्तींचा आशीर्वाद तुम्हाला प्राप्त होईल, ज्यामुळे तुम्हाला कामामध्ये यश मिळेल. **महिलांना–** अधिक व्यस्ततेने तुम्हाला थकवा येऊ शकतो आणि याचा प्रभाव तुमचे काम आणि शरीरावर पडू शकतो. तुमची अधिकांश इच्छा या कालावधीत पूर्ण होईल. **शुभदिनांक–** ११,१२.

## सप्ताहात आनंदीआनंद राहील



**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात नवीन आनंद घेऊन येईल. या कालावधीत तुमची आर्थिक स्थिती खूप मजबूत राहील. व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींसाठी या कालावधीत खूप शुभ आहे. करिअरमध्ये तुम्हाला बऱ्याच चढ-उतारांचा सामना करावा लागू शकतो. याच्या व्यतिरिक्त तुमच्या नोकरीला वर्षभर काही खतरा नाही. शिक्षणाच्या क्षेत्राने जोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी या कालावधीत खूप चांगले राहील. या कालावधीपासून डिसेंबरपर्यंतचा वेळ तुम्ही आपल्या धैयाकडे पोहोचू शकतात. लहान भाऊ-बहिणींकडून प्रेम मिळण्यासोबतच मोठ्या भाऊ बहीण आणि आईवडिलांचा आशीर्वाद मिळेल. या कालावधीत तुमचे वडील व्यवसायात पैसा गुंतवणूक करतील. सप्ताहाच्या मध्यात आरोग्यामध्ये कमतरता येऊ शकते; परंतु शेवटी तुम्ही स्वतःला फीट फील कराल. **महिलांना–** समाजात तुमच्या मान-सन्मानात वृद्धी होईल. या कालावधीत तुमच्या प्रवासयात्रा कमी होतील आणि तुम्ही आर्थिक रूपात उन्नत व्हाल. व्यापारात विस्तार होण्याने तुम्हाला उत्तम यशाची प्राप्ती होईल. घरात गोड बातमी मिळेल. आपल्याला भेटवस्तू मिळू शकते. **शुभदिनांक–** ०७,०९.

## नोकरीच्या नवीन संधी



**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जर व्यस्त राहण्याची इच्छा ठेवत असाल, तर या कालावधीत सुरुवातीपासूनच संतुलित भोजन करा. खराब खाण्या-पिण्याने तुम्हाला आरोग्यासंबंधित समस्या होऊ शकतात. या कालावधीत मध्यात तुम्हाला पित्त संबंधित शारीरिक समस्या होण्याची शक्यता आहे. या कालावधीत तुमचे प्रेम जीवन खूप चांगले राहील. रखडलेले विवाह होण्याचे योग आहेत. तुम्हाला जवळच्या मित्राकडून खतरा आहे. जर नोकरीची गोष्ट केली, तर तुम्हाला बऱ्याच चढ-उतारांचा सामना करावा लागेल. बऱ्याच वेळा तुम्हाला आपली नोकरीत अडचणी पाहायला मिळतील; परंतु सोबतच तुम्हाला नवीन ऑफर ही मिळतील. या कालावधीमध्ये आईच्या स्वास्थ्याविषयी सावध राहा. **महिलांना–** कौटुंबिक जीवन ठीकठाक राहील. या कालावधीत काही समस्यांचा सामना करावा लागेल आणि तुम्हाला मिश्रित परिणामांची प्राप्ती होईल. यावेळी तुम्हाला आपल्या स्वास्थ्यावर विशेष रूपात लक्ष द्यावे लागेल. कारण, स्वास्थ्यासंबंधित समस्या तुम्हाला त्रास देऊ शकते. **शुभदिनांक–** १०,१३.

## आर्थिक उन्नती उत्तरोत्तर वाढेल



**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात या राशीच्या जातकांसाठी सुरुवात खूप चांगली राहील. यावेळी तुम्हाला विदेशात नोकरी करण्याची संधी चालून येईल. जाणे न जाणे तुमच्यावर राहील. आर्थिक स्थितीचा ग्राफ ही तुमचा खूप चांगला राहील. या कालावधीच्या मध्यात तुम्ही नवीन घर किंवा ऑफिस खरेदी करू शकतात. तथापि, नंतरचा वेळ थोडा निराशाजनक राहील. या काळात तुमची गाडी किंवा तुमची काही किमती वस्तू हरवू शकते. मुलांच्या आरोग्याविषयी कुठल्या ही प्रकारचा निष्काळजीपणा करू नका. कौटुंबिक स्थिती खराब होण्याच्या कारणाने तुम्ही घरात पूजा करु शकतात. विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी बरेच यश देणारे असेल. सरकारी नोकरीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही यावेळी अनुकूल परिणाम मिळतील. शेवटी आर्थिक स्थिती गडबडू शकते. या काळात तुम्हाला धनलाभासाठी अधिकात अधिक प्रयत्न करावे लागतील. **महिलांना–** यावेळी तुमचा बराच ठिकाणी प्रवास होईल, ज्यामध्ये काही ठिकाणी तुम्हाला मनासारखे परिणाम मिळतील. तथापि, तुमची कमाई चांगली राहील; परंतु अत्याधिक खर्चांमुळे वित्तीय समस्या उत्पन्न होऊ शकतात. **शुभदिनांक–** ०९,११.

## भाग्याची साथ, पदोन्नतीची संधी




**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात यावेळी स्वास्थ्याच्या बाबतीत भाग्य तुमच्या सोबत राहील. पूर्ण आठवडा तुम्हाला ऊर्जावान वाटेल. या कालावधीत तुमचे प्रेम जीवन खूप चांगला राहण्याची शक्यता आहे. कारण शक्यता आहे क,ी तुमच्या प्रियकराची बढती होणार आहे. तुम्ही मात्र त्याच्याशी इमानदार राहाल. या कालावधीत तुमच्या पार्टनरला त्याच्या कार्यक्षेत्रात पदोन्नती मिळू शकते, ज्यामुळे घरात आनंद येईल. तुमची मुलेही या कालावधीत अभ्यासात चांगले प्रदर्शन करतील. विद्यार्थ्यांना या कालावधीत काही संधी मिळण्याची शक्यता आहे. आर्थिक दृष्टीने ही तुम्हाला यावेळी लाभ मिळण्याची पूर्ण शक्यता आहे. या कालावधीमध्ये तुमचे मित्र ही बऱ्याच कामांमध्ये तुमचा साथ निभावतील. परदेशात जाण्याची लोकांची इच्छा या कालावधीत पूर्ण होऊ शकते. **महिलांना–** तुमचे वर्तमान उत्तमरित्या परिवर्तन होऊ शकते. वेळोवेळी आपल्या जवळच्या लोकांची काळजी घ्या आणि त्यांना गरज असल्यास मदत करा किंवा त्यांना काही भेटवस्तू द्या, म्हणजे नात्यामध्ये कुठल्या प्रकारचा तणाव येणार नाही. **शुभदिनांक–** १०,१२.

## परदेशागमनाची संधी चालून येईल



**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता ही राशी स्वास्थ्याच्या दृष्टीने मजबूत असते; परंतु या कालावधीत तुमचे स्वास्थ्य कमकुवत राहण्याची शक्यता आहे. पोट आणि मानसिक रोग तुम्हाला या कालावधीत खूप त्रास देईल. कुटुंबात या कालावधीत आरोप-प्रत्यारोप होतील. ज्यामुळे महिलामंडळ काही दिवसासाठी माहेरी जाईल. भागीदारीत व्यवसाय करणारे लोक अलर्ट व्हा. कारण, पार्टनरकडून धोका मिळण्याची शक्यता आहे. वैवाहिक लोकांची सुरुवात बरीच नाजूक राहील, यानंतर सर्व ठीक होऊन जाईल. मध्ये तुमच्या संतानला जीवनात यश प्राप्तीसाठी अधिक परिश्रम करावे लागेल आणि यासाठी त्यावर बराच पैसा ही खर्च कराल. शिक्षणाच्या क्षेत्राने जोडलेले व्यक्ती या कालावधीत विदेशात जाऊ शकतात. या कालावधीत शेवटच्या दिवसांत तुमची आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना या कालावधीत अधिक मेहनत करण्याची आवश्यकता आहे. **महिलांना–** तुमचे कौटुंबिक आयुष्य चढ-उताराने भरलेले असेल. तसेच दुसरीकडे दाम्पत्य जीवनात कभी खुशी, कभी गम असे वातावरण असेल. आपल्या जीवनसाथीसोबत चांगला ताळमेळ बनवून ठेवा. तुम्ही आपल्या मुलांवर बराच खर्च कराल. **शुभदिनांक–** ०७,०८.

## विवाहेच्छुकांचे लग्न जुळेल



**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जातकांसाठी सुरुवात चांगली राहील; परंतु मध्य थोडे कठीण राहील. सुरुवातीमध्ये तुमची सॅलरी वाढू शकते किंवा तुम्हाला परदेशात जाण्याची संधी मिळू शकते. आर्थिक स्थिती मध्यात थोडी खराब होऊ शकते. परंतु, नंतर सर्व ठीक होऊन जाईल. वैवाहिक लोकांचे जीवन चांगले राहील. जीवनसाथीसोबत तुम्ही चांगली वेळ घालवाल. जे लोक अविवाहित आहेत, त्यांचे या कालावधीत लग्न होण्याचे योग आहे. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना यावेळी मनासारखे रिजल्ट मिळतील आणि मनासारख्या कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळेल. तथापि, आपल्या देशात जे शिक्षण प्राप्त करत आहेत, त्यांची इच्छा बाहेर जाण्याची आहे ती पूर्ण होऊ शकते. प्रेमजीवनासाठी वेळ थोडी प्रतिकूल आहे, म्हणून परिस्थितीला ध्यानात घेऊन आचरण करा. मेहनतीचे फळ या काळात आपल्याला मिळणार आहे. **महिलांना–**तुमच्या कुटुंबात कुठल्यातरी गोष्टीला घेऊन ताणाताणी किंवा भांडण होऊ शकतात. तुमची कटू वाणी याचे सर्वात मोठे कारण बनेल, म्हणून तुम्हाला वाटत असेल तर नाते टिकून राहावे तर, धैर्याने काम घ्या आणि आपल्या भाषेला मधुर करा. **शुभदिनांक–** ०९,१०.

## आजारापासून मुक्ती मिळेल



**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात करिअरसाठी बरीच मेहनत करण्याची आवश्यकता असेल. सुरुवातीमध्ये नोकरीला खतरा होऊ शकतो; परंतु, नंतर स्थिती योग्य होऊन जाईल. यावेळी कुटुंबातील सदस्यांसोबत तुमचा खास वाद होऊ शकतो. तथापि, जीवनसाथीसोबत चांगला वेळ घालवाल. आर्थिक स्थिती आठवड्याच्या सुरुवातीमध्ये थोडी आव्हानात्मक राहील; परंतु मध्यात पैसा येईल. तथापि, तुमच्याजवळ पैशांची काहीच कमतरता नसेल; परंतु दुर्भाग्याची गोष्ट ही आहे की, तुमच्या हातात पैसा टिकत नाही. शिक्षणाच्या क्षेत्राने जोडलेल्या विद्यार्थ्यांना आठवड्यात मध्ये निराशा होऊ शकते. सरकारी नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी चांगले गुण मिळतील. आरोग्याच्या दृष्टीने या राशीतील व्यक्ती स्वतःला खूप लकी मानतील. लांब आजारापासून मुक्ती मिळेल. **महिलांना–** दांपत्य जीवन बरेच मधुर राहील आणि तुमचा तुमच्या जीवनसाथीसोबत ताळमेळ चांगले असण्याने तुम्ही वैवाहिक जीवनाचा आनंद घ्याल. तथापि, तुम्हाला आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. ज्यांना अपत्य नाही, त्यांना या कालावधीत संतानप्राप्ती होऊ शकते. **शुभदिनांक–** ११,१२.

## कुटुंबात मान-सन्मान वाढेल



**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात राशीच्या जातकाचे करिअर सुरुवातीमध्ये बरेच चांगले राहील. नोकरीची नवीन संधी तुम्हाला मिळेल. नवीन प्रोजेक्टच्या बाबतीत तुम्ही आपल्या बॉससोबत विदेश यात्रेवर जाऊ शकतात. पैशाची कमी या आठवड्यात तुम्हाला अजिबात वाटणार नाही. कुटुंबात तुमचा मान वाढण्यासोबतच जबाबदारी ही वाढेल. तुमचे स्वास्थ्य उत्तम असेल. तुम्हाला जीवनात जोडलेल्या बऱ्याच गोष्टींवर मेहनत करावी लागेल. प्रेमजीवन अनुकूल राहील आणि जे लोक अविवाहित आहेत त्यांचे या कालावधीत लग्न होऊ शकते. मुलांकडून तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. कौटुंबिक जीवन बऱ्यापैकी चांगले राहील आणि तुम्हाला मान तसेच सन्मान प्राप्ती होईल. शेवटी आर्थिक स्थिती कमजोर राहील. **महिलांना–** ज्यांना मुले आहेत त्यांची प्रगती होईल. यावेळी तुम्हाला प्रॉपर्टीच्या संबंधित बरेच चांगले लाभ मिळू शकतात आणि तुमचे कौटुंबिक जीवन ही बऱ्यापैकी आरामात पूर्ण होईल. घरात नवीन सदस्याचे आगमन होऊ शकते. तुमच्या कामासाठी तुमचे कौतुक होईल. **शुभदिनांक–** १२,१३.

## प्रतिष्ठेत वृद्धी होईल



**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल, ज्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल तसेच तुमचा समाजात ही मानसन्मान ही वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. प्रेम जीवनासाठी या कालावधीत बरेच अनुकूल राहील आणि तुमच्यातील काही लोकांना विवाहाची वार्ता ऐकण्याची संधी मिळेल आणि तुम्ही तुमच्या प्रियतमला आपले बनवण्यास यशस्वी राहाल. तथापि, विवाहित लोकांच्या दाम्पत्य जीवनात चढ-उताराची स्थिती राहू शकते. तुम्हाला काळजी घ्यावी लागेल की, तुम्ही तुमच्या कामाव्यतिरिक्त जीवनसाथीला पर्याप्त वेळ द्या. तुम्हाला मान-सन्मानाची प्राप्ती होईल. शिक्षणाच्या क्षेत्रात तुम्हाला कठीण परिश्रम करावे लागेल, तेव्हाच तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. आर्थिक दृष्टीकोनाने या कालावधीत थोडे कमजोर राहू शकते, म्हणून, पैशाचा हिशोब चांगल्या पद्धतीने ठेवा. **महिलांना–** भाऊ-बहिणीची काळजी घेणे उत्तम राहील. संतानसाठी या कालावधीत अधिक अनुकूल नाही म्हणून वेळोवेळी त्यांची काळजी घ्या आणि त्यांना प्रोत्साहित करा. आठवड्यात चांगली बातमी मिळेल. **शुभदिनांक –** ०९,१२.

# चौल यात्रेवर सीसीटीव्हीची नजर

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

दत्त जयंती निमित्त अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळे येथे यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. लाखो भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रेवदंडा पोलिसांकडून बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यात्रेमध्ये संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी चार ठिकाणी सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून एक टेहळणी कक्ष आणि पोलिस मदत केंद्र उभारण्यात आले आहे. या माध्यमातून भाविकांच्या सुरक्षेकडे लक्ष देण्याचे काम केले जात आहे.

रेवदंडा परिसरातील चौल-भोवाळे येथे दत्तजयंती निमित्त ४ डिसेंबरपासून यात्रेला सुरुवात झाली आहे. . या यात्रेमध्ये भाविकांसह पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. प्रचंड गर्दी पहावायस मिळत आहे. खाद्य पदार्थांपासून घरगुती, खेळाच्या साहित्यांची दुकाने या यात्रेत उभारण्यात आली आहेत. आठ डिसेंबरपर्यंत ही यात्रा राहणार आहे.त्यामुळे या कालावधीत लाखो पर्यटक व भाविक दर्शनासाठी येणार आहेत. मागील तीन वर्षापुर्वी दत्तमंदिरात चांदीचा प्रभावळ चोरीला गेली होती. त्याचा तपास अद्याप लागला नाही. त्यामुळे यंदा यात्रेमध्ये पोलिसांनी अधिक सर्तकता राखण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुरु केल्या आहेत. चोरट्यांवर नजर ठेवण्यासाठी एक टेहळणी कक्ष व एक पोलीस मदत कक्ष बांधण्यात आले आहे. २१ ठिकाणी पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. रोज ४० हून अधिक पोलीस त्याठिकाणी नेमण्यात आले आहेत. त्यात ३० अंमलदार सहा वाहतूक पोलिसांचा समावेश आहे. यात्रेमध्ये येणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठीदेखील पोलिसांनी लक्ष दिले आहे. महिला छेडछाड विरोधी पथक नेमण्यात आले आहे. महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. २४ तास ही यंत्रणा तैनात राहणार असल्याची माहिती रेवदंडा पोलिसांनी दिली.

## दर पाऊण तासाने एसटी बस

चौल- भोवाळेमधील यात्रेला सुरुवात झाली आहे. भाविकांना यात्रेबरोबरच दर्शनासाठी वेळेवर निश्चित पोहचता यावे यासाठी अलिबाग एसटी बस आगारामार्फत ज्यादा एसटी बस फेरीची व्यवस्था करण्यात आली आहे. चौल यात्रा स्पेशल या बसेस आहेत. दर पाऊस तासाने बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रेमध्ये एसटी महामंडळाचे कक्ष असून त्या ठिकाणी कर्मचारी तैनात केले आहेत. शेवटची बस रात्री आठ वाजता असणार असल्याचे आगाराकडून सांगण्यात आले आहे.

# वाहनांच्या वेगावर बसणार नियंत्रण

**। खोपोली । प्रतिनिधी।**

हाळफाटा मार्गे डोळवली, पलसदरी, कर्जत मार्गाच्या नुतनीकरणाचे काम गेल्या काही वर्षापूर्वी झाले असता यामध्ये काही अंतराचे काम पुर्णत्वास गेल्याने अनेकांचा प्रवास सुखकर होत असताना याच मार्गावरील काही ठिकाणी रस्त्याचे काम अपूर्ण असून हा रस्ता जीवघेणा ठरत आहे. त्यातच रस्त्याचे काम पूर्ण झालेल्या अंतरावर वाहन चालक बेभान पद्धतीने सुसाट वाहने चालवत असताना काही ठिकाणी गतिरोधक नसल्याने हा मार्ग अपघाताला आमंत्रण देत असल्याचे हाल, अजरुंण, डोळवली याठिकाणी पाहायला मिळत असताना याठिकाणी गतिरोधक टाकण्यात यावे अशी मागणी वाहन चालक, प्रवासी व पादचारी नागरिक करीत होते. ४ डिसेंबर रोजी रात्री गतिरोधक टाकण्यात आल्याने या ठिकाणच्या सुसाट वाहनांना ब्रेक लागणार असून अपघातावर नियंत्रण मिळणार आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही खाली परिशिष्टात नमुद केलल्या मिळकतींच्या मालकांचे, ज्यांनी असे निवेदीत केले आहे की, 'सदर मिळकती' ज्या आजचेमितीस पिरामल फायनान्स लिमिटेड (पुर्वीची पिरामल कॅपिटल अॅण्ड हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांचेकडे गहाण ठेवलेल्या आहेत, त्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत, त्या मिळकतींचे मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

तरी ज्या इसमांचा पिरामल फायनान्स लिमिटेड (पुर्वीची पिरामल कॅपिटल अॅण्ड हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) या कंपनी व्यतिरिक्त, त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतींच्या मालकांचे मालकी हक्क निर्वेध असल्याचे गृहीत धरले जाईल व नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

**मिळकतींचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका अलिबाग जिल्हा निबंधक रायगड दुय्यम निबंधक अलिबाग यांचे अधिकार क्षेत्रातील जिल्हा परिषद रायगड पंचायत समिती अलिबाग स्थानिक ग्रुपग्रामपंचायत मापगांवचे हद्दीतील मौजे सोगांव येथील खालील वर्णनाच्या एकजिनसी व खुद्द बिनशेती मिळकती.

१) हुस्नाबानू मंहमद जाफर खान यांच्या मालकीची गट नं. २६५/१/१, क्षेत्र २०.८०.०० आर.चौ.मि.(२०८० चौरस मिटर), आकार रु. २०८.००

२) अखतर मोहम्मद जाफर खान व मजहर मोहम्मद जाफर खान यांच्या मालकीची गट नं.२६५/१/२, क्षेत्र २०.७०.०० आर.चौ.मि. (२०७० चौरस मिटर), आकार रु.२०७.००.

अलिबाग
तारीख : ८/१२/२०२५

सही /-
**अॅड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग'को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

# वाहतूक पोलिसांचा दणका

**रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

वाहतूकीचे नियम मोडणाऱ्यांविरोधात जिल्हा वाहतूक शाखेने दोन दिवस कारवाई केली. या कारवाईत सुमारे साडेपाच लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या कारवाईतून ५००हून अधिक चालकांना दणका देण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात वाहनांची संख्याही वाढली आहे.दुचाकी वाहनांसह वेगवेगळ्या प्रकारची तीन,चारचाकी व अवजड वाहने रस्त्यावरून धावतात. वाहन वेगाने चालविणे, वाहन चालविण्याचा परवाना नसणे, टीबल शीट असणे, अशा अनेक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांविरोधात वाहतूक पोलीसांनी गुरुवारी आणि शुक्रवारी या दोन दिवसांच्या कालावधीत कारवाई केली. या कारवाईतून पाच लाख ४८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक तुकाराम लक्ष्मण माळी यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे - अंत्राट तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर. | आकारणी रु.-पै |
|---|---|---|---|
| ६४ | ८ | ०-१३-२०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकुण ०-१४-५० क्षेत्र<br>मिळकतीचे खरेदीखत | १-५५ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४(चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : ०७/१२/२०२५

**अॅड. मोनाली रामदास हजारे**
एम. कॉम. एल. एल. बी.
पत्ता: दहिवली, ए.व्ही.एफ.रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## जाहीर निविदा

**इमारतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविणेबाबत नोटीस**

पूजा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. सर्व्हे क्रमांक २७, हिस्सा क्रमांक २, अंतिम भूखंड क्रमांक ६४, पूजा नगर जुना पोस्टाचा मार्ग, पेण. ता.पेण जिल्हा रायगड, या गृहनिर्माण सहकारी संस्थेने आपल्या इमारतीचा पुनर्विकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी/ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यानी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रकल्प अहवालाची संस्थेने चेअरमन/ सेक्रेटरी यांचेकडे दिनांक ०७/१२/२०२५ ते दिनांक १०/१२/२०२५ या कालावधीत सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० या वेळेत या इमारतीच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांना पाहणी करता येईल, व त्याआधारे पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक १०/१२/२०२५ ते दिनांक १३/१२/२०२५ या कालावधीत सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात. तसेच निविदा हया कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदांना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेचा निवड सर्वसाधारण सभेत करण्यात येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल, त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

सही
**चेअरमन**

सही
**सेक्रेटरी**

**पूजा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.**

चेअरमन पत्ता
**श्री.वसंत देवजी पाटील**
श्री स्नेह बंगलो,अभिनव बंगलो सोसायटी,
आर टी.आय कॉलेज जवळ,
पेण.जि.रायगड-४०२१०७
मो.९९७५५९५२०८

सेक्रेटरी पत्ता
**श्री.दत्तात्रेय किसन पाटील**
ब्लॉक नं.१०४, बि. विंग, पहिला मजला,
बालाजी सुपर मार्केट, फेज-२,
ता.पेण.जि.रायगड
मो.९९७००६३००५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक यांचे मालकीची हक्काची मिळकत असून सदर जमीन मिळकत बाबत विद्यमान मालक हरेश आर दुहलानी यांनी आमचे अशिलाना पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असून सदर मिळकतीची विक्री करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार त्यांना असल्याची खात्री व भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे त्या अनुषंगाने विद्यमान मालकांचे आमचे अशिलांशी व्यवहाराची बोलणी सुरू असुन सदर मिळकतीबाबत टायटल निर्वेध असलेबाबत व कोणाचाही कसल्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, करारमदार, कोर्टवाद, गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, पोटगी, चोळी, बांगडी, वगैरे असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर समक्ष येऊन अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. येणे प्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही तक्रार आली नाही तर सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे व कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल. त्या नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन :-तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका सुधागड, मे. दुय्यम निबंधक सुधागड यांचे अधिकार क्षेत्रातील, तसेच पंचायत समिती सुधागड यांचे कक्षेतील गाव महागाव चे हद्दीतील गाव मौजे महागाव ता सुधागड जि रायगड येथिल जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| अ. क्र | मिळकत नं / गट नं | क्षेत्र हेक्टर-आर | एकुण क्षेत्र | आकार रू.-पैसे |
|---|---|---|---|---|
| १. | ४६६/१ | क्षेत्र ०० हे. ४० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे. १२ आर | ०० हे.५२ | ०० रू. ०७ पैसे |
| २. | ४७२ | क्षेत्र ०० हे. २६.९० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे. ०४.४० आर | ०० हे.३१.३० | ०२ रू.२९ पैसे |
| ३. | ४७६ | क्षेत्र ०० हे. ४० आर | ०० हे.४० | ०४ रू.९७ पैसे |
| ४. | ४७७ | क्षेत्र ०० हे. ४६.१० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे. ०७.५० आर | ०० हे. ५३.६० | ०३ रू.९७ पैसे |
| ५. | ५६२/१ | क्षेत्र ०० हे. ३४.२० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे.०६.८० आर | ०० हे. ४१ | ०३ रू.०९ पैसे |

लोणावळा
दिनांक ०५/१२/२०२५

**राजू शांताराम शिंदे**
अॅडव्होकेट
२६ व २७, यशवंतराव चव्हाण संकुल
स्टेट बॅक ऑफ इंडिया समोर, लोणावळा
ता.मावळ जि.पुणे ४१० ४०१.
मो नं ९३७०७९२१२१
advraju11@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की,

आमचे अशिल बशीर इमामसायब सय्यद यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक १. श्री. काशिनाथ मोतीराम घारे, २. श्रीम. जानकीबाई मोतीराम घारे, ३.श्री. संतोष मोतीराम घारे यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले होते व तसा रितसर साठेकरार सुद्धा त्यांचेबरोबर दि.२२/०९/२०१६ रोजी केला आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन मौजे. उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९ | ४ | ५-४०-०० | १-६८ |

यापैकी २-६८-०० हे. आर विकत देणेचे ठरले होते.

आमचे अशिलांनी १. श्री. काशिनाथ मोतीराम घारे, २. श्रीम. जानकीबाई मोतीराम घारे, ३. श्री. संतोष मोतीराम घारे यांचे बरोबर दि.२२/०९/२०१६ रोजी केलेले साठेकरार नुसार आमचे अशिलांचा सदर वर नमुद मिळकतीत दिवाणी हक्क निर्माण झालेला आहे, तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत आमचे अशिलांचे लेखी संमती घेतलेशिवाय भविष्यात कोणीही १.श्री.काशिनाथ मोतीराम घारे, २. श्रीम.संजीवनी संतोष घारे, ३. कु. संकेत संतोष घारे, ४. कु.ऋषीकेश संतोष घारे यांचे बरोबर साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा दस्त अथवा व्यवहार करू नये. आमचे अशिलांची हरकत असतांना असा केलेला व्यवहार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशिलाचे लेखी संमतीशिवाय केलेले व्यवहाराबाबत भविष्यात जी कोर्ट कारवाई होईल त्यास संभावित खरेदीदार/मालक हेच जबाबदार रहातील याची नोंद घ्यावी. कळावे

दि. ०७/१२/२०२५.

**अॅड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता- शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी,
नेरळ ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१.
मो. ९३२५०६००३७.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) हरिश्चंद्र गोपीनाथ पाटील, २) संजय गोपीनाथ पाटील, ३) सुलभा भालचंद्र पाटील, ४) शारदाबाई गोपीनाथ पाटील, ५) प्रमिला नामदेव पाटील, ६) नलिनी निलेश म्हात्रे आणि ७) अक्षय नामदेव पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतिचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-शहाबाज, तालुका -अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १६६, एकूण क्षेत्र ००.३१.०० (हे.आर.चौ.मी.) आकार ४ रु. ३७ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः

उत्तरेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १६७
दक्षिणेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १११
पूर्वेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ११४ आणि १६५
पश्चिमेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ११० आणि १६९
ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०६/१२/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

नि.८/ड
अर्जदारातर्फे अॅड.अजित वि.मंडलिक
नि.नं.
पुढील तारीख ७ /०१/२०२६

## जाहीर नोटीस

दिवाणी संकीर्ण अर्ज १७७/२०२५

**कर्जत येथील मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

श्रीमती. संगीता मनोहर कारखानीस
वय : ६२ वर्षे, व्यवसाय: निवृत्त,
रा. सदनिका नं.०१, संगीता-संकुल, को.
ऑ.हौ.सो.लि.हॉटेल सन्मानच्या बाजुला, ... अर्जदार
नेरळ-कर्जत हायवेरोडसमोर, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१
कायमचा पत्ता रा. बी/५०१, पनामा प्लॅनेट,
गोखले रोड, नौपाडा, ठाणे पश्चिम. ४००६०२
मो. ०९००४५८३४८३

विरूद्ध

सामनेवाला कोणीही नाही.

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की :-

१. अर्जदार यांची आई कै.सुनीता मनोहर कारखानीस व वडील कै.मनोहर रामचंद्र कारखानीस यांची खाली नमुद केलेली मिळकत आहे.

२. कै. सुनीता मनोहर कारखानीस व वडील कै. मनोहर रामचंद्र कारखानीस यांनी खरेदी केलेली मौजे नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जुना सर्व्हे नंबर १६३, १६४, १०२अ व १६५ वरील भुखंड क्रमांक ११ असुन नवीन सर्व्हे नंबर ४२६/१ असा असुन क्षेत्रफळ ४ गुंठे ७० चौ.मी. आहे. सदर भुखंडावरील संगीतासंकुल को. ऑ.हौ.सो.लि. मधील सदनिका नं.०१ क्षेत्रफळ ५४० चौ. फु.बिल्टअप येथे राहत होते. कै.सुनीता मनोहर कारखानीस व वडील कै. मनोहर रामचंद्र कारखानीस यांची नेरळ येथील फ्लॅट हा स्वकष्टार्जीत मिळकत होती.

३. सदरील अर्जदार या कै. सुनीता मनोहर कारखानीस व वडील कै. मनोहर रामचंद्र कारखानीस यांच्या एकुलती एक मुलगी आहे. कै. सुनीता मनोहर कारखानीस यांचा मृत्यु दि.०९/०३/२०१८ व वडील कै.मनोहर रामचंद्र कारखानीस यांचा मृत्यु २८/०२/२०१९ रोजी झाला आहे.

सबब अर्जदार हे कै. सुनीता मनोहर कारखानीस व वडील कै. मनोहर रामचंद्र कारखानीस यांचे कादेशीर वारस आहेत असे ठरविण्यात येऊन त्यांचे नावे लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळावे याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

४.कै.सुनीता मनोहर कारखानीस व वडील कै. मनोहर रामचंद्र कारखानीस यांस सदरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मिळण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेऊन योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि. ५/१२/२०२५ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय-कर्जत**

**कोर्टाचा**
**शिक्का**

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी, न्यायालय-कर्जत**

Allied Faculty (Nursing)
(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

## Sau. Vandana Tasgaonkar College of Nursing

At- Chandhai, Near Bhivpuri Road Railway Station, Post-Nasarapur, Tal-Karjat, Dist-Raigad, MH-410 201,
Mail ID – principal.vtcn@tasgaonkartech.com Webside-www.vtnursing.in
Fax No. 02224318823 Ph- 9987353061

**WANTED**

A) Applications are invited for filling up the following posts in the above said College/ Institute

| SN | Designation | Subject | Total Posts | Reservation | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | SC | ST | VJ-A | NT-C | NT-D | OBC | EWS | OPEN |
| 2 | Professor cum Vice Principal | Any one of subject | 1 | | | | | | | | 1 |
| 3 | Professor | Any one of subject | 1 | | | | | | | | 1 |
| 4 | Asso.Prof | OBGY Nursing | 1 | | | | | | | | 1 |
| 5 | Assistant Professor | Community Health Nursing / Medical Surgical Nursing | 2 | | | | | | | | 2 |
| 4 | Tutor/ Clinical Instructor | Nursing | 13 | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 3 | 1 | 3 |

**B) General Notes:**

1) Horizontal Reservation for Ladies / Sports etc. as per the state government circular / regulations and the differently abled persons reservation as per the government regulations / circular issued from time to time (Ref: Government letter GAD/1118/CR417/16 dated 28/12/2018, for differently abled persons GR dated 27/04/2011, 04/08/2011, 28/07/2014, 29/05/2019 and MEDD letter dated 30/06/2015)(if applicable).
The vertical reservation allotments vide Government Resolution and circular dated 29/05/2017, 25/07/2018, 05/12/2018, 19/12/2018, 07/01/2019, 12/02/2019, 16/02/2019, 18/02/2019, 04/07/2019, 05/03/2020, 11/03/2020 etc. (if applicable).

2) Candidates applying for reserve category post(s) should submit caste certificate & caste validity certificate and also recent non-creamy layer certificate, wherever applicable.

3) The benefits of reservation shall be admissible to the backward class / category candidates who are domiciled in the state of Maharashtra only (if applicable).

4) Age Limit & Educational Qualifications shall be considered up to last date of the application & experience shall be considered up to earlier day of the interview.

5) The decision taken by MUHS authorities regarding essential qualifications and experience shall be applicable, from time to time.

6) Qualified teachers above the age of 64 years will be considered for appointment of one – one year, as per respective Council's norms.

7) Pay Scale is as per rules.

8) Application along with attested copies of all relevant certificates must reach to the College on or before: **15/12/2025** (Exact date is to be specified). (Minimum 07 days (as per Direction No. 01/2017) from the date of publication of advertisement in newspaper).

**C) Other Notes: (College Level)**

Apply to the **President / Secretary / Principal,** at **Sau. Vandana Tasgaonkar College of Nursing**, At- Chandhai, Near Bhivpuri Road Railway Station, Post-Nasarapur, Tal-Karjat, Dist-Raigad, MH-410 201 on plain paper / prescribed format along with attested copies of certificates and experience certificates.

**Sd/-**
**Principals**
**(Signature & College Seal)**

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- विकणे आहे - अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९
- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- सासवणे येथील वाडीमध्ये कामासाठी कायमस्वरूपी जोडपे पाहिजे आहेत. संपर्क : ८००७८९३२३२/८८०६६८३२३२
- बोअरवेल, विहीरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- शुभमूर्हुत विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवंराची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- ऑफिसमध्ये कामाला मुलगी पाहिजे पात्रता- Bsc/Bcom, व Computer ची माहिती वेळ - सकाळी ९-सायं-६:३० ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-१०,०००महिना, रविवार-सुट्टी. Contact- 9823585321
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजे शिक्षणाची अट नाही ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-१२,००० महिना, रविवार-सुट्टी. संर्पक - ९८२३५८५३२१
- प्रथम, पुर्नविवाह सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- SALE OF BAGAYATI WADI. 13 GUNTHE, @26 Lakh per Guntha, 200 Mtr. (meter) from. sea Beach. Village-THAL, Gunjal Ali, Alibag, M. 8779805353
- Job opportunity - Office staff required for office in Alibag. Fresh graduate and post graduate candidates can call 9923750549 For interview
- सर्वप्रकारचे आजार/विवाह (१८-८०) घरबसल्या पिढ्यांपिढ्या उत्पन्नासाठी गुंतवणुकीनुसार वेळ ठरवूनच डॉ.नथुराम शिहु (पोयनाड-नागोठणा) रायगड ४०२१०६/ ७५०७१६६०१५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक फसवणूक संभवते. मुलांच्या प्रश्नांबाबत चिंता राहील. स्थावर प्रश्नाकडे विशेष लक्ष द्यावं.
- **वृषभ** : उगाच भलत्या गोष्टींची चिंता करू नका. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील. चिंता करू नये.
- **मिथुन** : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्यावेत. अडचणींवर मात कराल.
- **कर्क** : मनाप्रमाणे साऱ्या गोष्टी घडत जातील. नव्या कल्पनांना वाव मिळेल. वाढत्या खर्चाला आवर घाला.
- **सिंह** : प्रलंबित कामांबाबत महत्त्वाचा दिलासा मिळेल. धनलाभाचे योग आहेत. जोडीदाराची काळजी घ्या.
- **कन्या** : यंत्र, वाहन यांचा वापर काळजीपूर्वक करावा. डोळ्यांचे विकार संभवतात. आर्थिक ताण राहील.
- **तूळ** : अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील. मान-सन्मान वाढीस लागेल.
- **वृश्चिक** : चैनीवर अधिक खर्च होईल. किंमती वस्तुंच्या खरेदीकडे ओढा राहील. जुनी दुखणी उद्‌भवतील.
- **धनु** : आर्थिक आमिषांना भुलू नका. कोर्टाची कामं मार्गी लागतील. धार्मिक स्थळाची यात्रा घडणार आहे.
- **मकर** : अपेक्षित ध्येय साध्य करता येईल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. व्यवसायात उत्कर्ष होईल.
- **कुंभ** : मनाविरूध्द घटना संभवतात. आपलंच म्हणणं खरं असा आग्रह धरू नका. विचारानं रहायला हवं.
- **मीन** : रखडलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक करार लाभदायक ठरतील. प्रकृतीस त्रास संभवतो.

सौंदर्यसाधना

## निवड ब्लश ऑनची

* लंबगोल चेहरा असेल तर बदामाच्या चेहऱ्याच्या अगदी उलट पद्धतीने म्हणजे चिकबोन्सपासून कानाच्या कोपऱ्यापर्यंत ब्लश ऑन लावा. यासोबत हातांवर थोडा दाब देऊन गालांच्या मध्यभागी ब्रशने ब्लश ऑन लावा.

* विविध प्रकारचे ब्लशऑन उपलब्ध आहेत. त्वचेच्या प्रकारानुसार निवड करावी. क्रीम तसंच पावडर बेस्ड ब्लश ऑन, शिमर ब्लश ऑन मिळतात. यापैकी शिमर ब्लशमुळे त्वचेला मुलायम टच मिळतो. गाल चमकदार दिसतात. ब्लश ऑनमुळे त्वचेला नैसर्गिक लूक मिळतो. त्यामुळे ब्रो बोन, नाकाच्या वरचं स्ट्रेट बोन तसंच हनुवटीवरही थोडं ब्लशऑन लावा. मेकअप करताना चेहऱ्याच्या प्रत्येक बोनला हायलाईट करायला विसरू नका.

## ७ डिसेंबर

दिनविशेष

१९४१ : जपानच्या नौदलाने अमेरिकेच्या पॅसिफिक फ्लीटवर पर्ल हार्बर येथे हल्ला केला.
१९८३ : स्पेनची राजधानी माद्रिदच्या बराहास आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन विमानं एकमेकांवर आदळली. ९३ ठार.
२००४ : अफगाणिस्तानच्या राष्ट्राध्यक्षपदी हमीद करझाई यांची निवड.
२०१३ : चतुरस्त्र अभिनेते विनय आपटे यांचं निधन.
२०१५ : भारत-पाक सुरक्षा सल्लागारांची बँकाकमध्ये भेट.

स्टडी टिप्स

## प्रवेश परीक्षा का बोर्डाची परीक्षा

दहावी आणि बारावीच्या परीक्षांनंतर अनेक विद्यार्थी पुढच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा देतात. बरेचदा बोर्डाच्या परीक्षेतल्या गुणांपेक्षा या परीक्षांमधील गुण महत्त्वाचे ठरतात. अशा परिस्थितीत बोर्डाची तयारी करायची की या प्रवेश परीक्षांना महत्त्व द्यायचं असा प्रश्न पडतो.

* उच्च शिक्षणाच्या दृष्टीने बोर्डाच्या परीक्षांना खूप महत्त्व असतं. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या परीक्षेला महत्त्व द्यायलाच हवं. बऱ्याच प्रवेश परीक्षांमध्ये बोर्डाच्या परीक्षेचाच अभ्यासक्रम असतो. त्यामुळे बोर्डाच्या परीक्षेची नीट तयारी करताना प्रवेश परीक्षांचीही तयारी होते. * पहाटेच्या वेळी किंवा सकाळी लवकर उठून वाचलेलं नीट लक्षात रहात असल्याचं बऱ्याच संशोधनांमधून समोर आलं आहे. त्यामुळे मुलांनी जागरण करण्यापेक्षा सकाळी लवकर उठून अभ्यास करावा. * वेळ कमी असल्याने विद्यार्थी सलग अभ्यास करत बसतात. पण विद्यार्थ्यांनी अधूनमधून विश्रांती घ्यायला हवी. मेंदूला आराम मिळणंही गरजेचं असतं. * परीक्षा काळात मुलांना खूप ताण येतो. पण अकारण ताण घेऊ नये. सलग अभ्यास केल्यावर थोडी झोप घ्यावी. यामुळे ताण कमी होईल.

### पंचांग

**रविवार, ७ डिसेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष कृ ३, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : पुनर्वसु, योग : शुक्ल, सूर्योदय ७.०१, सूर्यास्त १७.५९

### फॉरवर्डस

**ताल्लुकात क़ी क़ीमत चुकातें रहतें हैं...**

**उनकें झूठ पर भीं मुस्कुरातें रहतें हैं...!**

आरोग्यमंत्र

## मेंदू थकतोय?

थकल्यासारखे वाटणे, काहीही लक्षात न राहणे किंवा शक्य तेवढे प्रयत्न करूनही एकाग्रता न साधणे ही मेंदूसंबंधी धोक्याचे संकेत देणारी लक्षणे असू शकतात. सततचा ताण, पुरेशी झोप न लागणे किंवा हार्मोन्समधील बदलांमुळेही ही स्थिती उद्भवू शकते. विशेषत: कोविड-१९ च्या संसर्गातून बरे झालेल्या लोकांमध्ये ही समस्या अधिक दिसून येते. हा संसर्ग सुरुवातीपासून उपचारापर्यंत आणि त्यानंतरही मेंदूच्या क्षमतेवर परिणाम करतो. खरे तर ते कोणत्याही आजाराचे नाव नाही. मेंदू आपल्याला विचार करण्यास, बोलण्यास, पाहण्यास, समजण्यास मदत करतो. पण ही सर्व कार्ये बिघडू लागतात, तेव्हा त्या स्थितीला धोकादायक समजण्यात येतं. कोविड-१९ संसर्गामुळे काही रुग्णांच्या मेंदूचे कार्य अनेक महिने सामान्य नव्हतं. त्यांना लक्ष केंद्रित करता येत नव्हतं. अजूनही अनेकांना स्मरणशक्तीवर परिणाम होत असल्याची तक्रार आहे. मेंदूचा थकवा म्हणजे मेंदू बराच काळ काम करू शकत नाही. त्यामुळे थकवा येऊ लागतो आणि मेंदू महत्त्वाचे निर्णय घेऊ शकत नाही. अशी लक्षणे दीर्घकाळ राहिल्याने नैराश्य, तणाव यांसारख्या समस्याही उद्भवू लागतात. याचा सामान्य दिनचर्येवर परिणाम होतो, कामकाजात अडचणी येतात आणि नातेसंबंधांवरही त्याचा वाईट परिणाम होतो. म्हणूनच संयम राखण्यात अडचण, संभाषणात अडचण, बोलताना एखादा शब्द अडकणं अशी परिस्थिती असेल तर सतर्क व्हायला हवं.



### फॅशन पॅशन

* तुम्ही चिकनकारी वर्कवाला कुर्ताही घेऊ शकता. पँटसोबत कॅरी करू शकता.
* कुर्त्याला उठाव देणारं स्टेटमेंट नेहरू जॅकेट अवश्य घ्या. या जॅकेटमुळे तुम्ही वेगवेगळी कॉम्बिनेशन्स करू शकता. गडद रंगाचा कुर्ता निवडा. व्हाईट पँटवर तो कॅरी करा. त्याला मॅचिंग अथवा कॉन्ट्रास्ट कुर्ता पेहरावाची नजाकत वाढवेल याची खात्री बाळगा.

## प्रशिक्षणातून कारकिर्द

करिअरवाटा

आजकाल नोकरी मिळवणं कठीण ठरत असलं तरी दुसऱ्या बाजुस योग्य उमेदवार न मिळाल्यामुळे बऱ्याचशा आस्थापनांमधील रिक्त पदं बराच काळ रिकामी राहतात. आस्थापनांना आवश्यक कर्मचारी संख्या मिळत नाही. नोकरीसाठी जाहिरात दिल्यावर येणारे अर्ज संख्येने बरेच असतात. मात्र प्रत्यक्षात पदाच्या गरजेनुसार पात्रता असणारे उमेदवार कमी आढळतात. यामुळे अनेक आस्थापनांना योग्य कर्मचाऱ्यांची चणचण भासते. धंदा आहे, भांडवल आहे, जागा आहे, मागणी आहे. पण माणसे मिळत नाहीत म्हणून विस्ताराची योजना मागे ठेवावी लागते. यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने मुलाखतींना आलेल्या तरूण-तरूणींमध्ये दोष आढळले तरीही नोकरीवर घेतणं आणि त्यांच्यावर खर्च करून नोकरी करण्यास योग्य बनवणं हा पर्याय अवलंबला जात आहे. मध्यंतरी एका कंपनीने अशी एक प्रशिक्षण संस्था सुरू केली होती. तिथे प्रशिक्षणार्थींना सॉफ्ट स्किल्स तर शिकवले गेलंच. शिवाय नोकरीसाठी आवश्यक तांत्रिक ज्ञानही दिलं गेलं. याच धर्तीवर आता काही संस्था काम करत आहेत. हे ठराविक काळाचं प्रशिक्षण संपल्याबरोबर विद्यार्थी नोकरी करण्यास पात्र ठरतात आणि त्यांची नोकरी सुरू होते. या विद्यार्थ्यांना चांगला पगार मिळतो. काही कंपन्यांमध्ये असे १५ दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जातात. असंच चित्र आय. टी. कंपन्यामध्येही दिसून येतं. या संधीचा लाभ घ्यायला हवा.



खेचाखेची

### मोह माया

ढीगभर सेल्फी काढल्यानंतर त्यातले जे फोटो तुम्ही डिलिट करता ना...
.
.
.
तेच तुमचे खरे रुप आहे.
.
.
.
बाकी सगळी मोह माया आहे...

### वेगळं काही

माणसाने बारा हजार वर्षांपूर्वीपासून मांजर पाळायला सुरू केल्याचे पुरावे आढळले आहेत. टोकियो विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनानुसार मांजर माणसाला आवाजावरून ओळखते. मांजराची ओळख पटवण्यासाठी त्यांच्या नाकाचे ठसे घेतले जातात. मनीमाऊ माणसांप्रमाणे स्वप्नंही बघतात. मांजरांच्या शरीरात अनेक परजीवींचा वास असतो. हे परजीवी माणसाचा मेंदू आणि व्यवहारावर प्रभाव टाकतात, असं संशोधन सांगतं. मांजरं नावडत्या पदार्थांना तोंडही लावत नाहीत. आवडीचे पदार्थ मात्र मिटक्या मारत खातात. त्यांचे दुधाचे दात खूपच टोकदार असतात. जन्मल्यानंतर सहा महिन्यात ते पडतात आणि नवे दात येतात. त्यांचे डोळे जन्माच्या वेळी निळे असतात. पण नंतर त्यांचा रंग बदलत जातो.

## मनी मॅनेजमेंटसाठी...

जाणून घ्या

सद्यस्थितीत वाढत्या गरजा आणि वाढती महागाई या चक्रात उत्पन्न आणि खर्चाचा मेळ घालणं कठीण ठरत आहे. महिना अखेरीस हिशेब करायला गेल्यावर पैसे कुठे गेले हेच कळत नाही. मग घर कसं चालवायचं असा प्रश्न अनेक महिलांसमोर उभा असतो. अशा वेळी मनी मॅनेजमेंट ॲप्स उपयुक्त ठरु शकतात.

* हनी ड्यू नावाचं ॲप युजरच्या बँकखात्याशी लिंक करता येतं. यामुळे बँकखात्याशी संबधित व्यवहारांवर लक्ष ठेवणं सोपं जातं. हनी ड्यूमध्ये तुम्ही खर्चाची विभागणी करू शकता. विविध बिल्स, हप्त्यांचे रिमाइंडर्सही लावता येतात. घरखर्चाचा हिशेब ठेवण्याची यात विशेष सोय आहे. खर्च बजेटच्या बाहेर गेला तर नोटिफिकेशन्स येतात. त्यामुळे मोबाईलमध्ये हे ॲप हवंच.



* यू नीड अ बजेट (व्हायएनएबी) हे ॲप उत्पन्नाप्रमाणे तुमच्या खर्चाची विभागणी करतं. आर्थिक व्यवहार तसंच खर्च ट्रॅक करण्याचं कामही हे ॲप करतं.
* हनीफाय ॲपमध्ये तुम्ही सर्व खर्चाची नोंद करू शकता. यात बँक खातं, क्रेडिट कार्ड, कर्ज आणि गुंतवणुकीची सगळी माहिती साठवता येते. यासोबत आधीच्या महिन्यातल्या खर्चानुसार नव्या महिन्याचा खर्च ॲडजस्ट करण्याची मुभा मिळते.

## सुडोकू ३८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ६ | | | | ८ | १ | ३ | |
| | | २ | १ | | ७ | | | ८ |
| | ८ | | ३ | | ६ | ५ | २ | ९ |
| ७ | | | ५ | | ९ | ४ | १ | ६ |
| ५ | | | | ८ | | | | २ |
| ६ | ९ | १ | ४ | | २ | | | ३ |
| २ | ३ | ६ | ७ | | ४ | | ८ | |
| ४ | | | ८ | | ५ | ३ | | |
| ८ | १ | ५ | ९ | | | | ७ | |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ८ | ६ | ४ | १ | ७ | ९ | ३ | ५ |
| ४ | ७ | ९ | ५ | २ | ३ | ८ | ६ | १ |
| ३ | १ | ५ | ८ | ६ | ९ | २ | ७ | ४ |
| ७ | २ | ३ | ९ | ८ | ५ | ४ | १ | ६ |
| ५ | ४ | ६ | १ | ३ | ६ | ७ | ९ | २ |
| ६ | ९ | १ | २ | ७ | ४ | ३ | ५ | ८ |
| ९ | ६ | ४ | ३ | ५ | २ | १ | ८ | ७ |
| ८ | ५ | २ | ७ | ९ | १ | ६ | ४ | ३ |
| १ | ३ | ७ | ६ | ४ | ८ | ५ | २ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ३८

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | ६ | ■ | ७ | ८ | | |
| ९ | | ■ | १० | ११ | | ■ | १२ | | | | | ■ | ■ |
| | ■ | १३ | | | ■ | १४ | | | ■ | | ■ | १५ | |
| १६ | १७ | | ■ | १८ | | | ■ | १९ | | | | | ■ |
| ■ | २० | | २१ | | ■ | २२ | २३ | | ■ | | ■ | २४ | २५ |
| २६ | | ■ | | ■ | २७ | ■ | २८ | | २९ | ■ | ३० | | |
| | ■ | ३१ | | ३२ | | ३३ | | ■ | ३४ | | | | ■ |
| ३५ | ३६ | | ■ | | ■ | | ■ | ३७ | | ■ | | ■ | ३८ |
| ■ | ३९ | | ४० | ■ | ४१ | ■ | ४२ | | | ४३ | ■ | ४४ | |
| ४५ | ■ | ४६ | | ४७ | | ४८ | ■ | | ■ | ४९ | ५० | | ■ |
| ५१ | ५२ | ■ | ५३ | | ■ | ५४ | | | | ■ | | ■ | ५५घ |
| ५६ | | | | ■ | ५७ | | ■ | | ■ | ५८ | | ५९ | |
| ■ | | ■ | ■ | ६० | | ■ | ६१ | ■ | ६२ | | ■ | ६३ | |
| ६४ | | | | | ■ | ६५ | | | | | | | ■ |

**आडवे शब्द :-**
१) मोठा उत्सव
४) नशिबवान
७) आर्जव
९) सरळ लांब वासा
१०) जिव्हा
१२) चंद्र
१३) हुक्की, लहर
१४) बैलाच्या गळ्यात बांधण्याची रस्सी
१५) लाकूड
१६) घोड्याचे घर
१८) बुटका, बटु
१९) पोलिस
२०) कामचुकार (हिं)
२२) मनाचा झालेला ग्रह
२४) हात
२६) लांडोरचा पती
२८) नड
३०) गांधारीचे शतपुत्र
३१) किरकोळ सामान
३४) आसक्त, रमणारा
३५) कमळ
३७) सापाने सोडलेली त्वचा
३९) वर्तुळ, गोलाकार
४२) जमीन भाजण्याचे टहाळे (डहाळी)
४४) शरीर
४६) जळफळाट, अरेरावी
४९) प्रजा, जनता
५१) फोडातील द्रव
५३) संताप, क्रोध
५४) च्या सह, च्या बरोबर
५६) सम्राट, मोठा राजा
५७) भाजी
५८) घोंगड्या विणणारी जमात
६०) मोठी बहीण
६२) नारळाचे झाड
६३) माराची तात्पुरती उमटलेली खूण
६४) हुबेहूब सोंगे वठविणारा
६५) जाणता अजाणता

**उभे शब्द :-**
१) चर्चा
२) अंदाज, अटकळ
३) बिना फोडणीची आमटी
४) दुर्दशा
५) उत्तराधिकारी
६) दृष्टीभेट
७)उगाच
८) नाकावरील मोत्याचा दागिना
११) सुकुमार, एक प्रकारचा स्वादिष्ट तांदूळ
१३) नमस्काराचा एक प्रकार
१४) लोखंड घासण्याचे एक हत्यार
१५) वेळ घालविणे
१७) निरुपयोगी, नोकरी नसलेला
२१) चांगले
२३) नक्र, सुसर
२५) च्या साठी
२६) सुगंधी पांढरे फूल
२७) स्वच्छ
२९) अटीची भाषा
३०) तारुण्यापूर्वीची अवस्था
३१) सूट
३२) धपाटा
३३) टिंगल, चेष्टा
३६) प्राण
३७) संध्याकाळ
३८)उपवन
४०) कालपुरुष
४१) फिकीर,काळजी
४३) पोपट
४४) शेवट, नाश
४५) लेखणी
४७) टिकून राहणे
४८) दंडकर्ता, नियमकर्ता
५०) संगीतातील एक राग
५२) मदतनीस
५५) नदीवर घातलेला बांध
५७) लेखणीतील रंगीत द्रव पदार्थ
५८) रस्ता, पथ
५९) तृण
६०) धातूचा धागा
६१) ताकद
६२) समाजातील प्रतिष्ठा.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पो | क | ळ | ■ | प | त | न | ■ | म | ■ | ना | शि | क | ■ |
| र | ■ | ■ | ह | र | ह | र | म | हा | दे | व | ■ | स | रा |
| गा | ठो | डे | ■ | त | ह | ■ | र | ग | ■ | र | ख | र | ख |
| ■ | क | रा | ल | ■ | या | त्री | क | ■ | वा | स | र | ■ | ■ |
| ग | र | ■ | प | र्व | त | ■ | त | क्ष | क | ■ | व | ■ | स |
| जा | णे | ये | णे | ■ | ■ | कं | ■ | मा | डी | ■ | स | द | रा |
| न | ■ | न | ■ | ■ | प | ड | छा | या | ■ | हो | ■ | वा | ई |
| न | वा | ■ | न | ग | र | ■ | प | च | न | ■ | स | ■ | त |
| ■ | स | न | ग | र | ■ | यं | ■ | क | व | डी | मो | ल | ■ |
| प | ■ | ऊ | ■ | म | जे | दा | र | ■ | नी | ■ | रा | व | ण |
| रा | ज | वा | डा | ■ | म | ■ | ख | ■ | त | पा | स | ■ | ■ |
| त | ■ | री | स | ■ | ते | ल | वा | त | ■ | ■ | मो | का | ट |
| ■ | पा | ■ | ■ | वा | म | ■ | ली | ट | र | ■ | र | व | ण |
| उ | पा | स | मा | र | ■ | वा | ■ | ■ | म | न | ■ | ■ | क |

## एक उद्योजक आणि एक कम्युनिस्ट

# जांभेकरांची कहाणी

राजेंद्र साठे

**जी आपुलकी टाटा उद्योगसमुहाबाबत सर्व देशाला वाटते तीच किर्लोस्कर समुहाबद्दल मराठी लोकांना वाटत असते. सचोटीचा व्यवहार, दर्जाबाबत अत्यंत काटेकोर असणे हे त्यांचे ठळक गुणविशेष होत. याखेरीज या दोहोंमध्ये आणखीही एक गोष्ट समान आहे. टाटांप्रमाणेच किर्लोस्कर समुहातही कुटुंबाबाहेरच्या अनेक व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वाने मोठी उंची गाठली. टाटांकडे जसे मुळगावकर, दरबारी सेठ, रुसी मोदी असे कर्तृत्ववान लोक होते तसेच किर्लोस्करांकडे अनंतराव फळणीकर, नानासाहेब गुर्जर, शंभोअण्णा जांभेकर अशी मंडळी होती. अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन या दोन्ही क्षेत्रांवर त्यांची उत्तम पकड होती व नवनवी उत्पादने घडवण्याचा त्यांचा ध्यास थक्क करणारा होता. आधी लक्ष्मणराव व नंतर शंतनुराव यांच्या समवेत यांच्यापैकी अनेकांचे कर्तृत्व फुलले. हे सर्व जण किर्लोस्करांच्या विस्तारीत कुटुंबाचा हिस्सा होते. टाटा व किर्लोस्कर यांच्यातले आणखी एक ठळक साम्य म्हणजे टाटांनी जमशेदपूरचा जसा विकास केला तसाच किर्लोस्करांमुळे किर्लोस्करवाडी उद्यम व सांस्कृतिक अशा अनेक अंगांनी बहरली. विशेष म्हणजे किर्लोस्कर व त्यांचे सोबती यांच्या कुटुंबातल्या बायका, मुले, माणसे यांच्या व्यक्तिमत्वांचाही चहू अंगांनी विकास या वाडीत झाला.**




यांत्रिकाच्या सावल्या हे प्रज्ञा जांभेकर यांनी लिहिलेले पुस्तक आपल्याला किर्लोस्कर नावाशी जोडलेल्या या संपन्न व समृद्ध परंपरेचे दर्शन घडवते. लक्ष्मणराव यांच्या मोठ्या बहिणीचे चिरंजीव शंभोराव जांभेकर आणि त्यांच्या पत्नी गंगाबाई, या दोहोंचे चिरंजीव रामकृष्ण व त्यांच्या पत्नी सुहासिनी यांना मध्यवर्ती धरून ही कहाणी सांगितली गेली आहे. शेतकऱ्यांसाठी लोखंडी नांगर तयार करून किर्लोस्कर समुहाचा पाया घालणारे लक्ष्मणराव आणि त्यांचे सहकारी यांच्या अचाट धडपडीच्या, चिकाटीच्या कहाण्या आपण काही वेळेला वाचलेल्या असतात. शंभोराव यांच्यासारखे तितकेच बुध्दिमान व हरहुन्नरी सहकारी हे लक्ष्मणराव व शंतनुरावांचे खरे वैभव होते. अनेक अवघड प्रसंगावर मात करण्याच्या शंभोरावांच्या या पुस्तकातील कहाण्या थक्क करणाऱ्या आहेत.

शंभोरावांनी व्हीजेटीआय या नामांकित संस्थेतून इंजिनिअरिंगची पदवी घेतली होती. किर्लोस्कर समुहातील ते पहिले इंजिनिअर. शिवाय, व्यवसायाच्या वाढीसाठी विमानाने प्रवास करणारेही ते या समुहातील पहिलेच वरिष्ठ. म्हैसूरला जेव्हा समुहाच्या कारखान्यांचा विस्तार करण्याची वेळ आली तेव्हा ती जबाबदारी शंभोरावांच्या खांद्यावर टाकण्यात आली व त्यांनीही ती समर्थपणे पेलली.

किर्लोस्करवाडीतील मोकळे वातावरण आणि प्रागतिक विचार यामुळे मालकांपासून कामगारांपर्यंत सर्वांच्याच घरांमधील महिलांनी विविध क्षेत्रात चमकदार कामगिरी केलेली दिसते. जांभेकरांचे कुटुंबही त्याला अपवाद नव्हते. त्यांच्या पत्नी गंगाबाई या आरंभी फारशा शिकलेल्या नव्हत्या. पण नंतर वाडी व परिसरातील स्त्रियांची गरज ओळखून नर्सिंगचे शिक्षण घेतले व त्या सर्व महिलांच्या जणू आई झाल्या. त्यांनी अतिशय कुशलतेने सुमारे साडेतीन हजार बाळंतपणे केली. त्यात एकही मूल वा स्त्री दगावली नाही.

शंभोराव व गंगाबाई यांची उद्यमशीलता तसेच माणसांबद्दलची आस्था यांचे संस्कार त्यांचे चिरंजीव रामकृष्ण यांच्यावर झाले व ते त्या काळात चळवळीकडे ओढले गेले. आरंभी ते गांधीवादी झाले. पण नंतर लवकरच ते कम्युनिझमकडे ओढले गेले. एका उद्योगसमुहाच्या सानिध्यात व त्यातील एका बड्या अधिकाऱ्याच्या घरात जन्माला येऊनही त्यांनी आपल्या मनाला पटले तेच विचार अंगिकारले व ही निष्ठा आयुष्याच्या अखेरपर्यंत निभावली. ब्रिटिशांच्या राजवटीत त्यांना आठ वर्षे तुरुंगवास पत्करावा लागला.

इथे एका योगायोगाचा उल्लेख करायला हवा. जमशेटजी टाटांच्या बहिणीचा मुलगा शापूरजी सकलतवाला हा इंग्लंडमधील टाटांचा कारभार पाहता पाहता डाव्या विचारांकडे ओढला गेला व ब्रिटीश कम्युनिस्ट पक्षाचा व नंतर ब्रिटीश संसदेत खासदार झाला. विशेष म्हणजे इतके होऊनही टाटांनीदेखील त्याच्याशी आपले नाते तोडले नव्हते. असा तो काळ होता. रामकृष्ण यांचेदेखील किर्लोस्करांशी सौहार्दाचे संबंध होते. शंतनुरावांच्या लग्नात रामकृष्णांनी एक मजेदार अंतरपाट विवाहपत्रिका काढली होती.

सुहासिनी या त्यांच्या पत्नी म्हणजे काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सरोजिनी नायडू यांच्या धाकट्या भगिनी होत. त्याही डाव्या चळवळीतील प्रमुख कार्यकर्त्या होत्या. जांभेकरांच्या घराचे वैशिष्ट्य हे की, दोन टोकाचे हे विचार एका घरात राहूनही कलह माजला नाही. प्रत्येकाच्या स्वातंत्र्याचा सन्मान व एकदुसऱ्याबद्दल आदरच बाळगला गेला. एका औद्योगिक विवादाच्या वेळी मालकाकडून बोलणी करण्यास शंभोराव तर कामगारांतर्फे रामकृष्ण जांभेकर परस्परांविरुध्द उभे ठाकले. पण त्यांच्यात कटुता आली नाही. उलट रामकृष्णांनी बजावलेल्या कामगिरीची शंभोरावांनी तारीफच केली अशी आठवण प्रज्ञा यांनी सांगितली आहे. रामकृष्ण आणि सुहासिनी यांचे रशिया व हंगेरीतील वास्तव्य तसेच चीनमध्ये जाऊन माओ व चौ एन लायची घेतलेली भेट असे प्रसंग चकित करणारे आहेत.

या जुन्या काळाविषयी मराठीत फारसे लिहिले गेलेले नाही. डाव्या चळवळींविषयी इतके साहित्य आहे, पण त्यात रामकृष्ण यांची व्यक्ती व कार्यकर्ता म्हणून विशेषत्वाने नोंद घेतल्याचे दिसलेले नाही. हा काळ पाहिलेले लोक आता काळाच्या पडद्याआड गेले आहेत. त्यांच्या मुलांकडे बहुतांशी केवळ आठवणी व काही फोटो शिल्लक आहेत. अशा स्थितीत हे पुस्तक लिहिणे हे सोपे नव्हते. पण प्रज्ञा याही जांभेकरांच्या घरातीलच असल्याने त्यांच्याच चिकाटीने व आत्मीयतेने त्यांनी हे चरित्र जुळवले आहे. खरे तर यावर अधिक संशोधन झाले तर हा एखाद्या नाटकाचा वा चित्रपटाचा ऐवज होऊ शकतो.

लक्ष्मणरावांचे चिरंजीव व किर्लोस्कर मासिकांचे संस्थापक संपादक शंकरराव किर्लोस्कर यांनी यांत्रिकाची यात्रा नावाने वडिलांची जीवनकथा सांगितली. शंभोराव हे त्यांच्या सावलीप्रमाणे वावरले. त्यांच्या पत्नी, मुले व इतर सहकाऱ्यांचे जीवनही याच यांत्रिकाच्या सावलीमध्ये बहरून आले. त्यामुळे यांत्रिकाच्या सावल्या हे पुस्तकाचे शीर्षक अतिशय समर्पक आहे. मराठी उद्योजगता, त्याच्या विरोधी असलेला कम्युनिस्ट विचार, स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी जीवन यांच्या इतिहासाचे मनोज्ञ तपशील देणारे हे महत्वाचे पुस्तक आहे.

**यांत्रिकाच्या सावल्या**
**ले. प्रज्ञा जांभेकर, सदामंगल पब्लिकेशन्स**

# गोवा बदलतोय!

मोक्षदा घाणेकर

गोव्यासह संपूर्ण कोकण भूमीची ओळख परशुराम भूमी अशीही करण्यात येते. असे म्हणतात भगवान परशुरामांनी समुद्रात बाण मारून गोव्याची निर्मिती केली. इ.स.वी सन पूर्व तिसऱ्या शतकापासून गोवा मौर्य साम्राज्याचा भाग बनला होता. मौर्य साम्राज्यानंतर, विविध राजवंशांनी गोव्यावर राज्य केले. ख्रिस्ताब्द १५१० मध्ये पोर्तुगीजानी गोवा जिंकले आणि पुढे ४५० वर्षे गोव्यावर राज्य केले. गोव्यावर प्रदीर्घ काळ पोर्तुगीजांची सत्ता असल्याने गोव्याच्या संस्कृतीवर आणि येथील राहणीमानावर पोर्तुगीजांचा मोठा प्रभाव जाणवतो.

पोर्तुगीजांनी आपल्या सत्ताकाळात गोव्यातील हिंदूंचा अनन्वित छळ केला. तलवारीच्या बळावर मोठ्या प्रमाणात धर्मांतरे घडवून आणली. त्यांनी केलेल्या छळाच्या आणि अत्याचाराच्या खुणा आजही गोव्यात आढळतात. हिंदूंचे मोठ्या प्रमाणात धर्मांतर झाल्याने गोव्यात जागोजागी चर्च आणि ख्रिती वस्त्या पाहायला मिळतात. गोव्यात अनेक प्राचिन जागृत मंदिरे आहेत. मात्र, पर्यटक गोव्यात येतात ते मौजमजेसाठी, येथील समुद्र किनाऱ्यांवर बागडण्यासाठी, मद्य रिचवण्यासाठी आणि येथील कॅसिनोमध्ये जुगार खेळण्यासाठी. या सर्वांतून राज्याला भरपूर महसूल मिळत असल्याने सरकारनेही या गोष्टींना नेहमीच बळ दिले आहे. परिणामी, मुळात अध्यात्मिक भूमी असलेल्या गोव्याची ओळख भोगभूमी अशी होऊ लागली.

गेल्या काही महिन्यांत गोव्यात घडलेल्या काही कार्यक्रमामुळे गोव्याची अनेक वर्षांत निर्माण झालेली ओळख पुसली जाऊन ती पुन्हा एकदा योगभूमी होण्याच्या मार्गावर आहे. सनातन संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने गोव्यात मे महिन्यात भव्यदिव्य असा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव संपन्न झाला. यानिमित्ताने अनेक साधु संतांसह देशभरातून साधकगण गोव्यात एकवटले होते. श्रीराम जन्मभूमी अयोध्यानगरीतील प्रभू श्रीराम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्यावर मंदिरावर ध्वजारोहणाचा नेत्रदीपक सोहळा नुकताच संपन्न झाला. त्यानंतर लगेचच गोव्यातील काणकोण तालुक्यातील श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या ५५० व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांच्या ७७ फुटी पूर्णाकृती मूर्तीचे अनावरण करण्यात आले. प्रभू श्रीरामचंद्रांची ही जगातील सर्वात उंच मूर्ती आहे. यानिमित्ताने मठात सिद्ध करण्यात आलेल्या रामायण थीम पार्कचेही उद्घाटन करण्यात आले. गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या पुतळ्याचे डिजाईन करणारे शिल्पकार राम सुतार यांनीच प्रभू श्रीरामांच्या या कांस्य मूर्तीची निर्मिती केल्याने भविष्यात ही भव्य दिव्य मूर्ती पाहण्यासाठी पर्यटक गोव्याला नक्कीच भेट देतील.

**निवडणूक आयोगाला महसूल आणि शिक्षण विभागाकडून मदत घेऊन मतदार नोंदणी, दुरुस्ती, पुनरीक्षण, मतदान आदी कामे करावी लागतात; ही कामे नियोजित वेळेत आणि पध्दतीने होते का, हे पाहिले जात नाही. त्यातच कामाचा ताण सहन न झाल्याने ब्लॉक लेव्हल दर्जाचे कर्मचारी आत्महत्या किंवा हृदयविकारासारख्या आपत्तीला सामोरे जातात. लोकशाहीत पारदर्शकता आणण्याचे काम करणाऱ्यांनाच अपारदर्शकतेचे बळी व्हावे लागते.**

# 'एसआयआर'ची दहशत

अजय तिवारी

'बीएलओ' (बूथ लेव्हल ऑफिसर) चे मृत्यू आणि आत्महत्यांनी आगीत तेल ओतले आहे. विरोधी पक्षांनी या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून निवडणूक आयोग तसेच केंद्रातील सत्ताधारी भाजपला लक्ष्य केले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्यासह अनेक विरोधी नेत्यांनी या मुद्द्यावर निवडणूक आयोगावर टीका केली आहे. अशक्य मतदार पडताळणी लक्ष्ये पूर्ण करण्यासाठी आयोगाने 'बीएलओं'वर जास्त दबाव आणल्याचा त्यांचा आरोप आहे. राजकीय पक्षांच्या दबावामुळे 'बीएलओं'वर दररोज किमान मतदार पडताळणी पूर्ण करण्याचा दबाव वाढला आहे. या 'अमानवी' कामामुळे 'एसआयआर' प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली. अर्थात 'एसआयआर' प्रक्रिया थांबवणे हा त्यावरचा उपाय नाही. जादा पैसे, जादा मानधनासाठी कुणी निवडणूक आयोगाचे काम करत असल्यास त्यांनी हा भ्रम प्रथम दूर केला पाहिजे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये आतापर्यंत २५ 'बीएलओं'चा बळी गेला आहे. दोन राज्ये भाजपशासित आणि एक राज्य तृणमूल काँग्रेसचे असले, तरी 'बीएलओं'मध्ये सारखाच रोष आहे. निवडणूक आयोग सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या हातचे बाहुले बनला आहे. निवडणूक आयोगावरची टीका भाजपला का झोंबते, हा प्रश्न अनुत्तरीत आहे. 'बीएलओं'चे मृत्यू अधिक चिंताजनक आहेत. कारण पुढील वर्षी देशभर जनगणना सुरू होणार असून या महत्त्वाच्या कामाचा भार पुन्हा एकदा शिक्षकांवर पडणार आहे. वस्तुत: 'बीएलओ' घरोघरी जाऊन कागदपत्रे गोळा करत आहेत आणि मतदार यादी अद्ययावत आहे का, याची खात्री करत आहेत. त्यांना लोकशाहीचे खरे सैनिक म्हणता येईल.

ममता बॅनर्जी यांच्या सरकारने बंगालमध्ये 'एसआयआर'दरम्यान मोठे प्रशासकीय फेरबदल केले आहेत. दहा जिल्ह्यांचे पोलिस अधीक्षक बदलले आहेत. अनेकांनी अनेक निवडणुका पाहिल्या आहेत आणि कोणत्याही प्रश्नाशिवाय सरकारी आदेशांचे पालन केले आहे; परंतु या वेळी जमिनीवरील गैरव्यवस्थापन इतके आहे, की ही मंडळीही त्रस्त आहेत.



एकीकडे, 'एसआयआर' प्रक्रियेला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे, तर दुसरीकडे, अधिकारी त्यांच्यावर 'एसआयआर' प्रक्रिया वेळेवर पूर्ण करण्यासाठी दबाव आणत आहेत. निर्धारित लक्ष्य पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यास 'बीएलओं'वर फिर्याद दाखल करण्याची धमकी देण्यात येते. उत्तर प्रदेशमधील एक प्रकरण तर फारच गंभीर आहे. एका 'बीएलओ'चे लग्न होते. त्याने लग्नाच्या अगोदरच्या दिवसापर्यंत काम करून लग्नासाठी सुट्टी मागितली, तर वरिष्ठ अधिकाऱ्याने त्याला निलंबित केले. लग्न एक दिवसावर आले असताना निलंबित केल्याने 'बीएलओ'ने आत्महत्या केली. एखादी व्यक्ती आवश्यक कागदपत्रे गोळा करू शकत नसली, तरी 'बीएलओ'ला दोष दिला जातो. कोणी आपल्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत समाविष्ट करू इच्छित नसले, तरी 'बीएलओ'ला प्रश्न विचारले जातात. या दुर्दैवी कथा कोणत्याही एका राज्यापुरत्या मर्यादित नाहीत. राज्ये बदलत आहेत; पण या 'बीएलओं'ना भेडसावणाऱ्या समस्या सारख्याच आहेत.

मध्य प्रदेशमध्ये दोन 'बीएलओ' हृदयविकाराने मरण पावले. पश्चिम बंगालमध्ये एका महिला 'बीएलओ'ने आत्महत्या केली. पश्चिम बंगालमधील नादिया येथेही एका 'बीएलओ'चा मृतदेह घराच्या छताला लटकलेल्या अवस्थेत आढळला. जयपूरमध्ये एका 'बीएलओ'ने ट्रेनसमोर उडी मारून आपला जीव गमावला. गुजरातमध्येही चार बीएलओंचे निधन झाले आहे. या मृत्यूंबद्दल सरकारकडे कोणतेही स्पष्टीकरण नाही. त्यांचा मृत्यू दीर्घकालीन आजारामुळे झाला, असे म्हणणे सोपे आहे; परंतु या 'बीएलओं'ची कुटुंबे 'एसआयआर'च्या तणावाने आणि अधिकाऱ्यांच्या धमक्यांमुळे ग्रस्त होते, असे कुटुंबीय सांगतात. या वादाबद्दल एक महिला 'बीएलओ' सांगते, मी वैयक्तिकरित्या 'एसआयआर' प्रक्रियेत सहभागी झाली आहे आणि अनेक लोकांच्या घरी भेट दिली आहे. मला अनेक अडचणी येत आहेत. मी भेट देत असलेल्या भागामध्ये अनेक लोकांनी फॉर्मही भरलेले नाहीत आणि आपली कोणतीही माहिती शेअर करू इच्छित नाहीत. सरकार हे सर्व का करत आहे हे मला त्यांना समजावून सांगावे लागते. शिवाय आपण हा सर्व डेटा ऑनलाइन ॲपमध्ये प्रविष्ट करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ते काम करत नाही. आता ॲप काम करत नसेल, तर ती आमची चूक नाही; परंतु आमच्या कामापुढे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या कामासाठी एक अंतिम मुदत देण्यात आली असून हे काम कोणत्याही किंमतीत पूर्ण केले पाहिजे, असा अधिकाऱ्यांचा आग्रह आहे.

अधिकाऱ्यांच्या या वृत्तीमुळे नाराज झालेले आणखी एक 'बीएलओ' म्हणतात, आम्ही सध्या संकलन प्रक्रियेवर काम करत आहोत, गावोगावी जाऊन डेटा गोळा करत आहोत; पण लोक अजिबात सहकार्य करत नाहीत. या 'एसआयआर'बद्दल इतका गोंधळ आहे की तो समजणे कठीण आहे; पण तरीही आम्ही आमचे शंभर टक्के योगदान देत आहोत. मतदार यादीत विवाहित महिलांचा समावेश करणे हे एक वेगळे आव्हान ठरत आहे. एका घरातून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या महिलांचा डेटा समाविष्ट करण्याकामी एक समस्या आहे. 'एसआयआर' प्रक्रियेदरम्यान लग्न करून दुसऱ्या नगर पंचायतीत स्थलांतरित झालेल्या महिलांचे कॉलम भरले जात नाहीत. काही प्रमाणात शिक्षित महिला ऑनलाइन नोंदणी करतात; परंतु सर्वांना हे माहीत नसते. 'एसआयआर'बद्दल जागरूकतेच्या अभावामुळे 'बीएलओ' चिंतित आहेत; परंतु मतदार मदतीसाठी पुढे येत नाहीत याची त्यांना अधिक चिंता आहे. हिंदू मतदार 'एसआयआर' प्रक्रियेचे पालन करत नाहीत. त्यांना त्यांच्या मतदानाची जाणीव नाही. दुसरीकडे, मुस्लिम मतदार पुढे येत आहेत आणि स्वतःसाठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी फॉर्म भरत आहेत, हा 'बीएलओं' चा अनुभव विचारात घेण्यासारखा आहे. येथील समस्या मतदार पातळीवर आहेत; परंतु तरीही 'बीएलओं'ना प्रश्न विचारले जात आहेत. 'बीएलओ' संथ गतीने काम करतात, असा आक्षेप घेऊन उपजिल्हाधिकारी दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देतात. केवळ अंतिम मुदत दिली जात नाही, तर अपशब्ददेखील वापरले जात आहेत, असे बहुतांश 'बीएलओं' सांगतात.


एका महिला 'बीएलओं' चा अनुभव थोडा वेगळा आहे. कोणत्याही अधिकाऱ्याने तिच्याशी गैरवर्तन केलेले नाही आणि तिला कोणत्याही धमक्या मिळालेल्या नाहीत; परंतु मतदार हलगर्जीपणा करत आहेत. ते 'एसआयआर' प्रक्रियेचे महत्त्व समजून घेत नाहीत. या महिला बीएलओला मतदारांच्या घरी वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. काम पुढे ढकलले जात आहे. कमी वेळेत ठराविक फॉर्म भरण्याचा अतिरिक्त दबाव आहे; परंतु एखाद्याच्या जीवापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही, असे त्या सांगतात. या महिला बीएलओने सरकारच्या ॲपवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. सर्व्हर डाऊन आहे आणि ॲप काम करत नाही असा संताप व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीमध्ये फॉर्म कसे भरता येतील, असा तिचा सवाल आहे. बीएलओ 'एसआयआर'च्या विरोधात नाहीत; आपले कर्तव्य बजावू इच्छितात. त्यांना फक्त प्रशासनाकडून काही पाठिंबा आणि आदर हवा आहे. धमक्या मिळू नयेत, आपल्या वेदना आणि समस्या समजून घ्याव्यात, एवढीच त्यांची अपेक्षा आहे. निवडणूक आयोग हे समजून घेणार का, हा खरा प्रश्न आहे. •

## अजरामर कवयत्री

# बहिणाबाई चौधरी

श्याम ठाणेदार

मराठी साहित्यातील अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी यांचा ३ डिसेंबर रोजी ७४ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरुवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण, त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले.



बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या, मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्यविश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत, तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र, आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेव्हा कविता म्हणत, तेव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उद्गारले, 'अहो, हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे!' आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला.

१९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्यप्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी-अहिराणी-खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर-माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण-उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्त्वज्ञान ही त्यांच्या काव्यप्रतिभेची वैशिष्ट्ये होती.

शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. 'अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेव्हा (मियते) मिळते भाकर...,
खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला,
देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला....,
मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती
हाकला हाकला तरी येतं पिकांवर.... धरित्रीले दंडवत...' यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत.

बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्यविश्वातील त्यांचे स्थान ध्रुव ताऱ्यासारखे अढळ आहे, म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही, त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्यप्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. त्यांचा ७४ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन! •

# शीतल (थंडी) बरं झालं तू परत आलीस!



वरुण राजाची तुफान बॅटिंग ऑक्टोबर संपला तरी चालूच होती. ती थांबता थांबत नव्हती. समाज माध्यमांवर कॉमेंट्स येऊ लागले ह्या दसऱ्याला रावण जाळायचा की डुबवयाचा. एरव्ही भारतात मान्सून जून ते सप्टेंबर असतो. पण, ऑक्टोबर संपूनसुद्धा पाऊस थांबायचे नावच घेत नव्हता. अगदी दिवाळीतसुद्धा पाऊस होता. आता हे मात्र नक्की झाले होते की पाऊस जास्त झाल्यामुळे ह्या वर्षी थंडी पडणार. जास्त पाऊस पडल्यामुळे सर्व धरणे तुडुंब भरलेत आणि आपल्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला.

शीतल (थंडी) तू आली आणि सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सर्वत्र आनंदच आनंद निर्माण झाला. तुझ्या गारव्याचा प्रत्येकजण आनंद घेऊ लागला. पण, शीतल (थंडी) तू अचानकच कोणालाही न सांगता निघून गेलीस, आम्हा सर्वांना एकदम धक्का बसला. आम्ही आजूबाजूच्या गावात, शहरात चौकशी केली; पण तू कुठेही आढळली नाहीस. कदाचित तुला राग आला असेल आमचा, जो की आम्ही वृक्षतोडीबाबत चर्चा करीत होतो. त्यामुळे तू नाराज झाली असशील. आमच्यावर रुसली आणि कोणालाही न सांगता निघून गेलीस. इकडे गहू, हरभरा तुझी खूपच आठवण करीत होते. त्यांच्या चेहऱ्यावरचं तेजच निघून गेलं होत. ते दोघेही हिरमुसले होते आणि परके झाले होते.

हल्ली सकाळी-सकाळी मस्त गारवा असतो. सर्वत्र थंडी पडलेली असते. अगदी वातावरण आनंदी आणि आल्हाददायक असत. कोवळ्या उन्हात जावंसं वाटत. ऊन खावंसं वाटत. डी जीवनसत्वे घ्यावेसे वाटत. काही भागात तर जबरदस्त थंडी पडते. स्वेटर, ब्लँकेट, रजई, गोदडीची ऊब घ्यावीशी वाटते. अंथुरणात पडून राहावेसे वाटते. बाहेर निघूच वाटत नाही. दुपारची काही ठिकाणी थंडी हवी-हवीशी वाटते. जेवण झाल्यावर थंडी जाणवते, ती उन्हात बसून जी ऊब घ्यावयाशी वाटते, तिची मजा काही औरच असते.

**अरविंद मोरे**

एकंदरीत हिवाळ्यातील थंडी सर्वांना हवी-हवीशी वाटते. एरव्ही आपण ह्याच थंडीसाठी लोणावळा, खंडाळा, पाचगणी, महाबळेश्वर, माथेरान, चिखलदरा, पंचमढी, कुलू-मनाली, नैनिताल ह्या दूर दूरच्या हिल स्टेशनला भेट देतो.

खूप मोठे पैसे मोजतो, तो आनंद आता आपल्याला आपल्या घरी मिळत आहे. या गारव्याचा मनसोक्त विनातक्रार आनंद घ्यायला पाहिजे. याच थंडीसाठी आपल्याला विजेचे दाम दुप्पट पैसे एरव्ही उन्हाळ्यात मोजावे लागतात. या नैसर्गिक, निरोगी थंडीचा आनंद मनसोक्तपणे मोफत घेऊ या. हिवाळा म्हटलं की, खाण्यापिण्याची मनसोक्त, मनमुराद मज्जाच असते. सगळीकडे हिरवा हिरवागार भाजीपाला उपलब्ध असतो. सोबतीला हरा हरबरा, विविध फळे, सीताफळ, पेरू, मेथीची भाजी, आवळा, गाजर आदी फळांची रेलचेल असते.

बाजारात गेलो तर बाजार फळभाज्या, हिरव्यागार भाजीपाल्याने तुडुंब भरलेला असतो. भाजीपाला विक्रेतेसुद्धा गाडी भरभरून भाजीपाला आपल्या दारोदारी घेऊन येत असतात. मेथीची भाजी, पातीचा कांदा आणि मुळा जेवणात खाण्याची मजा काही औरच असते. त्यात भरीत भर वांग्याचे भरीत त्यावर निंबू पिळल्यावर त्याची चव काही औरच असते. असे म्हटले जाते आणि डॉक्टरसुद्धा म्हणत असतात की हिवाळा म्हणजे हेल्दी सिझन आहे. यात भूक अधिक लागते. अधिक खावेसे वाटते. गरम चहा, पोहे, अगदी गरम-गरम जेवण हे अधिक चांगला आनंद देऊन जातात.

याच थंडीच्या मोसमात आपल्या महाराष्ट्र राज्यात जत्रा भरत असतात. कारण की जत्रा भरण्यासाठी हा आल्हाददायक ऋतू असतो. आपल्या विदर्भात बहिरमची जत्रा महिना भर भरते. याच जत्रेत यात्री मोठ्या चवीने हंडीतलं, चुलीवरच मटण, चिकन मोठ्या स्वादाने मांडे, भाकरीसोबत खात असतात. मांसाहार खाणारी मंडळी चांगलाच ताव मारून मजा घेत असतात. काही मंडळी तर रात्री शेकोटी पेटवून थंडीची मजा घेत असतात. काही यात्रेकरू तर थंडीची मजा घेण्यासाठी राहोटी टाकून काही दिवस जत्रेमध्ये वस्तीला असतात. ते संपूर्ण ह्या थंडीची मजा घेत असतात.


शीतल (थंडी) आम्ही तुझ्या आगमनाची जणू वर्षभर वाट बघत असतो. तुझ्या आगमनाने आम्हाला खूपच आनंद झाला. आम्ही तुला आश्वासन देतो की, आम्ही जंगले तोडणार नाही. तुझे वास्तव असले की भास्कर राजासुद्धा शांत असतो. तू गेली की तो आमच्यावर डोळे वटारतो आणि मग आमची पळताभुई थोडी होते. याकाळात आम्हाला तुझी खूपच आठवण येते. तू जितक्या वेळ वास्तव्याला असशील तितक्या वेळ भास्कर राजाचा पण मूड शांतच असतो. तू असली की दिवससुद्धा लहान असतो आणि आनंदात जातो. बरं झालं शीतल (थंडी) तू परत आलीस. चला गारव्याचा आनंद घेऊया आणि मराठी गीत गुण गुणुया " गारवा, गारवा, गारवा, वाऱ्यावर भिर भिर भिर पारवा, नवा नवा नभातही चांदवा नवा नवा गारवा ! (मो. ९४२३१२५२५१)

## श्रेष्ठ नाटककाराची सार्थ ओळख

# शेक्सपिअर आणि त्याचा नाट्यसंसार

मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

शेक्सपिअर आणि त्याचा नाट्यसंसार, हे प्रदीप कुलकर्णी लिखित पुस्तक, मुंबईच्या मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांची वेधक आणि सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. त्यांच्या मते, शेक्सपिअरचे महत्त्व जगातील तमाम सुसंस्कृत समाजाने अतिशय प्रगल्भपणे स्वीकारले आहे. शेक्सपिअरची अनेक वचने, सुभाषिते झाली आहेत. जगातील जवळजवळ सर्व भाषांमध्ये शेक्सपिअरची नाटके भाषांतरित झाली आहेत. कुमार केतकर यांनी शेक्सपिअरचा जीवनकाळ आणि भारतातील त्यावेळची आणि नंतरची सामाजिक परिस्थिती यांची तुलना केली आहे. त्यांच्या मते, प्रदीपने सर्व महत्त्वाच्या व गाजलेल्या नाटकांचे कथानक, त्यांचे वैशिष्ट्य आणि त्यातील नाट्य अतिशय चित्तवेधक पद्धतीने मांडले आहे. या ग्रंथाने मराठी साहित्यविश्वाला समृद्ध केले आहे. 'मनोगत'मध्ये प्रदीप कुलकर्णी यांनी, अकरावीच्या वर्गात असताना शेक्सपिअरच्या अभ्यासाची जिज्ञासा कशी निर्माण झाली, हे स्पष्ट केले आहे. शेक्सपिअरने एकूण ३७ नाटके लिहिली. मात्र, त्याच्या काव्यलेखनाचा या पुस्तकात विचार केलेला नाही. सुमारे तीन वर्ष शेक्सपिअरचा अभ्यास करून, हे पुस्तक साकारल्याचे लेखकाने स्पष्ट केले आहे. या पुस्तकात एकूण आठ प्रकरणे आहेत. पुस्तकाचे रंगीत, समर्पक मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे.




ज्ञानाचा प्रबोधन काळ (रेनेसान्स), या प्रकरणात शेक्सपिअरच्या उदयापूर्वीची, युरोपमधील सामाजिक परिस्थिती स्पष्ट केली आहे. या काळात ज्ञानप्रसारामुळे, धर्माचा पगडा कमी होऊन मानवतावादी दृष्टिकोन वृद्धिंगत झाला. इंग्लंडमध्ये सोळाव्या शतकात वाङ्मयाच्या विविध शाखा बहरल्या. नाट्यवाङ्मयाचा नेत्रदीपक विकास झाला. शेक्सपिअर सारखा अलौकिक प्रतिभावंत इंग्लंडमध्ये जन्माला आला. शेक्सपिअरची जीवनयात्रा, या प्रकरणात विल्यम शेक्सपिअर याच्या जन्मापूर्वीची आणि नंतरची, त्याच्या कुटुंबाची सविस्तर माहिती दिली आहे. त्यामुळे विल्यम शेक्सपिअरच्या समग्र कौटुंबिक जीवनाची वाचकाला कल्पना येते. त्याच्या हयातीत त्याला प्रसिद्धीचे मर्यादित वलय प्राप्त झाले होते. मात्र कालांतराने, विविध भाषांमध्ये त्याच्या नाटकांचे अनुवाद झाल्यामुळे, जगभरातील रसिकांना तो परिचित झाला. लंडनने शेक्सपिअरला अजरामर केले. तर शेक्सपिअरने इंग्लंडला जागतिक साहित्यक्षेत्रात उज्ज्वल नाव मिळवून दिले. नंतरच्या प्रकरणात शेक्सपिअर काळातील रंगभूमीचे सविस्तर वर्णन केले आहे. सोळाव्या शतकात वीज नसल्यामुळे लंडनला नाटकांचे प्रयोग दुपारी दोन वाजता सुरू होऊन,संध्याकाळी पाच-साडेपाचच्या सुमारास संपत. त्या वेळचे लंडन आणि तेथील रंगभूमी या दोन्ही आजच्या तुलनेत किती प्राथमिक अवस्थेत होत्या, याची वाचकाला कल्पना येते. नाट्यलेखक होण्यापूर्वी शेक्सपिअरला रंगभूमीवर, लहानमोठी, विविध कामे करावी लागली होती. शोकांतिका आणि सुखांतिका म्हणजे काय, याचेही स्पष्टीकरण प्रदीप यांनी दिले आहे.

शेक्सपिअरने लंडनमधील, वीस वर्षांच्या कालावधीत, एकूण सदतीस नाटके लिहिली. त्यापैकी बावीस नाटकांचा परिचय, प्रदीप कुलकर्णी यांनी, अत्यंत मेहनत घेऊन, सविस्तरपणे करून दिला आहे. प्रत्येक नाटकातील मध्यवर्ती कल्पना, विविध पात्रे आणि नाटकाचे कथानक देऊन, शेवटी त्या नाटकाचे महत्त्व विशद केले आहे. शेक्सपिअरचं माहात्म्य, या प्रकरणात, चारशे वर्षे उलटूनही शेक्सपिअरच्या आयुष्याविषयी आणि त्याच्या साहित्याविषयी संशोधकांचा अभ्यास अजूनही चालूच असल्याचे वाचकाला समजते आणि यामुळेच शेक्सपिअरला जगातील सर्वश्रेष्ठ नाटककार असा सन्मान मिळाला आहे. ग्रीक नाट्यकला आणि शेक्सपिअरची नाट्यकला यामधील फरक प्रदीप यांनी स्पष्ट केला आहे. ग्रीक नाट्यकलेत नियती माणसाचे व्यक्तिमत्त्व घडवते, हा विचार आढळतो. तर शेक्सपिअरच्या नाट्यकलेत, माणसाचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या स्वभावातील गुणदोष, त्याचे भविष्य घडवते, हा सारासार विवेकाला पटणारा विचार दिसून येतो. शेक्सपिअरने आपल्या नाटकांमधून निर्माण केलेली, नानाविध पात्रे मानवातील विविध स्वभाववैशिष्ट्ये दर्शवितात. शेक्सपिअरने परंपरागत धार्मिक संकल्पनांना आपल्या नाटकातून स्थान दिले नाही. मानवी स्वभावदोष आणि त्यामधून निर्माण झा-लेली सदोष विचारपद्धती, हीच माणसाच्या अधःपतनाला आणि विनाशाला कारणीभूत ठरते, हे शेक्सपिअरला आपल्या विविध नाटकांतून दर्शवायचे आहे. लॉर्ड माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या (१७७९- १८५९) भारता-तील कार्यकाळात, भारतात इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. नंतरच्या काळात इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे, शेक्सपिअरचा प्रभाव भारतीय साहित्यावर पडला. शेक्सपिअरच्या नाटकांचे विविध अनुवाद मराठीत केले गेले. त्याची माहिती शेवटच्या प्रकरणात प्रदीप यांनी दिली आहे. शेवटी शेक्सपिअर अभ्यासकांसाठी उपयुक्त माहिती, चार परिशिष्टांतून दिली आहे. प्रदीप कुलकर्णी यांनी पुस्तक लेखनासाठी अभ्यासलेल्या विविध संदर्भ ग्रंथांचा उल्लेख शेवटी करण्यात आला आहे. लेखकाचा सविस्तर परिचय शेवटी दिला आहे. या पुस्तकात निवडक कृष्णधवल आणि रंगीत छायाचित्रांचाही, सुयोग्य समावेश करण्यात आला आहे. ज्ञानाचा प्रबोधनकाळ, हे या पुस्तकातील पहिले प्रकरण, सर्वांनाच अंतर्मुख करते आणि चिंतनप्रवृत्तही!

विल्यम शेक्सपिअर, (२३.४.१५६४-२३.४.१६१६) यांच्या ५२ वर्षांच्या आयुष्याची आणि त्यांनी लिहिलेल्या महान नाट्यकृतींची, उत्तम ओळख, या पुस्तकाद्वारे प्रदीप कुलकर्णी यांनी, सुजाण मराठी वाचकांना करून दिली आहे. ●●

**पुस्तकाचे नाव : शेक्सपिअर आणि त्याचा नाट्यसंसार**
**लेखक : प्रदीप कुलकर्णी, प्रकाशक : मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस गिरगाव, मुंबई-४, (०२२) २०८३०२०७, २३८७३५०२ प्रथम आवृत्ती : २३ एप्रिल २०२५,पृष्ठे : ३९३ मूल्य : रु. ७५०/-_**

# अतिभावनिकता घातकच!

**फोक आख्यानाने महाराष्ट्राच्या मातीत लोककलेचा नव्या कलेने, दमाने आणि प्रचंड आत्मिक ऊर्जेने जागर मांडला आहे. त्यांनी सांस्कृतिक वारसा आणि नव्या पिढीचा नको तिथं घुटमळणारा जीव यांची सांगड घालण्याचे उतोमोत्तम प्रयास चालविले आहेत, त्याबद्दल त्यांचे प्रथेप्रमाणे कौतुक झालेच पाहिजे. परंतु, इतिहासाची मोडतोड त्यांनी आख्यानातून थांबवली पाहिजे, हे सुद्धा मुद्दामहून त्यांना कुणी तरी कान पकडून सांगितले पाहिजे. कारण, नव्या दमाच्या देखण्या चेहऱ्याच्या कलावंताना अद्याप तितकी समज आली असेलच असे नाही.**







कधी कधी प्रगल्भता येण्यापूर्वी मिळालेली प्रसिद्धी अतिभावनिकतेमुळे स्वतःबरोबर समाजाला वैचारिक प्रवाहाच्या नावाखाली खड्ड्यात घेऊन जाऊ शकते, म्हणून त्यांना योग्य वळणावर सावध करणे गरजेचे वाटते. यात त्यांचे खच्चीकरण करण्याचा मुळीच आगाऊपणा केलेला नाही, हेसुद्धा ध्यानात घेतले पाहिजे.

एक मात्र खरे आहे. महाराष्ट्र ही संतांची, सज्जन, शौर्य, कलावंत, गिरणी कामगार, शोषित, श्रमिकांची, प्रबोधनकार, कीर्तनकार, साहित्यिक, गायक, राजकारणी, भोंदू, बाबा, दांभिकांचीही भूमी आहे. इथल्या सुपिक, कसदार जमिनीत पेराल ते उगवते. कसदार बियाणं पेरण्याची आपली परंपरा आहे. जमीन भाजण्याची, मशागत करण्याची रूढी आहे. भाजलेली बियाणं कधीच पेरली जात नाही. ती अंकुरत नाहीत. कलेच्या प्रांतातही भाजलेली बियाणं पेरली तर ती कधीच अंकुरली नाहीत, हे अल्पावधीत प्रसिद्धीच्या शिखरावर मायबाप प्रेषकांनी नेलेल्या फोक आख्यान चमुने त्यांच्या मनोपटलावर कोरायलाच हवं. त्यांचं उभं आयुष्य पडलं आहे. त्यांना यश, कीर्ती मिळत जावो. पण इतिहास, पुराणाची मोडतोड नको. आधीच महाराष्ट्रात इतिहासाची मोडतोड केल्याने जातीय दंगली पेटल्यात त्या विझायला तयार नाहीत. राजकीय दंगे तर एखाद्या गुन्हेगारीच्या टोळीतून आदेश यावेत आणि रक्तपात घडावा, तसे रोजच शाब्दिक तोफांतून आणि प्रत्यक्षात शस्त्रांच्या मदतीने घडत आहे. अशा वेळी समाज घडविण्याच्या ऐवजी किमान तो न बिघडवण्याचा केलेला प्रयत्नसुद्धा माणूस घडवतो. मग तो रुख्मिणी स्वयंवराच्या आख्यानातून केलेला संत एकनाथांचा कृतीशील प्रयत्न असेल किंवा अलीकडच्या काळातील विठ्ठल उमप यांचे जांभूळ आख्यान असेल. अगदी प्रल्हाद शिंदेंच्या आवाजातील भूपाळी असेल किंवा अशोक हांडे यांचा मराठी बाणा ते थेट आजच्या फोक आख्यानातून समाजातील संवेदना, सृजनशीलता जपू पाहणारी फोक लोककला असेल. समाजमनाची संवेदना जपताना, तिचे पावित्र्य राखताना इतरांचा मानमरातब राखला गेला पाहिजे. किमान महाराष्ट्राच्या भूमीला विविध प्रकारच्या कलेतून आकार देताना चंदनासारखे झिजलेल्या, योगदानातून वात होऊन स्वतः जळून अभिनयातून प्रकाश, चैतन्य निर्माण केलेल्या कलाकारांवर विनोद जरूर करावेत. त्यांची विटंबना टाळावी. विनोदाची पातळी घसरली की, असुया जन्माला येते.

**कांतीलाल कडू**

'सुंभ जळला तरी पिळगावकर जात नाही', ही टिपण्णी करताना फोक आख्यानकारांनी त्यांचे कलेचे योगदान पाहिले तर आज ज्यांना मुसरूड फुटली नाही, अशा नवख्या कलाकारांनी कोणतं आख्यान महाराष्ट्रापुढे मांडलं आहे, याचा वैचारिक गुंता डोक्याची दही करतो. अलका कुबल-आठल्ये, उषा नाडकर्णी यांच्यावरील फिशपाँडसुद्धा टीकात्मकेतून द्वेष उत्पन्न करणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

तरुण वय, कोवळीक फुटण्याचे वय, कोवळ्या वयाच्या उन्हाच्या कलाकारांना फोक आख्यानातून बहिणाबाई चौधरी संत होत्या आणि त्या तुका, ज्ञानोबांच्या समकालीन होत्या, हा शोध लावला आहे. त्यांना ज्या बहिणबाई अभिप्रेत आहेत, तुकोबांच्या शिष्य होत्या. त्या वेगळ्या आणि बहिणाबाई चौधरी या जळगावच्या असोदे गावातील कवयित्री वेगळ्या. याचा अभ्यास करून सत्य मांडता आले तर पुढची पिढी घडली नाही तरी चालेल, पण किमान बिघडू नये आणि इतिहासाची ज्यांनी आधी मोडतोड केली ते पातक आपल्या तरी माथी लागू नये. त्यांनी दुसरा एक शोध लावला आहे की, पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवल्याने भागीरथांनी गंगा पृथ्वीवर आणली. आता आली का, पंचाईत!

भागीरथ जाणण्याकरिता ईक्षाक्यू कुळाचा अभ्यास करावा लागेल. होय, जय श्री राम म्हणून बेबींच्या देठापासून जे ओरडतात ना, त्या रामाच्या कुळातील पौराणिक कथा जाणून घेत त्यावर अधिकार वाणीने बोलता आले पाहिजे. अशा काही थोड्या जरी असल्या तरी डोळ्याआड न करता येणाऱ्या त्रुटी दुरुस्ती करता आल्या पाहिजेत.

अभिजात मराठी भाषा आणि त्यावरील राजकीय विडंबन टाळ्या वाजवण्यापुरते छान आहे. हा मुद्दासुद्धा अस्तित्वाचा आहे. दुर्दैव असं आहे की, कोणतीही गोष्ट विनोदावर नेण्याची इतकी मोठी किंमत महाराष्ट्र मोजत आहे, त्याचे कुणालाच काही पडलेले दिसत नाही. आता सगळ्यात महत्वाचा मुद्दा शौर्याचा, अभिमानाचा, तत्वाचा, स्त्रीच्या संरक्षणाचा आणि तिला मान-सन्मान देणाऱ्या राजांचा!

राजे होते, म्हणून मोघल पळून गेले. काही छाटले गेले. काहींचा कोथळा काढला, बोटं छाटली, मुंडकी उडवली, काही देवांची मंदिरं वाचली, आया बहिणींची अब्रू वाचली. त्यासाठी नरवीर तानाजी, बाजी, संभाजी असे लाखो मावळे, सरदारांना शहीद व्हावे लागले आहे. स्वराज्य असेच वाण्याच्या दुकानात मिळाले नाही. ते अबाधित ठेवण्याचा कोण किती प्रयत्न करतो हा अतिशय गहन विषय आहे. छत्रपती राजकारणासाठी जितक्या सहजतेने वापरले जातात, यासारखे महाराष्ट्राचे आणि एकूणच राष्ट्राचे दुसरे दुर्दैव नाही. फोक आख्यान कथेचा जागर पुढे नेताना जेव्हा राजांचा पराक्रम सांगतात, तेव्हा मात्र कलाकारांच्या ऊर्जेला केवळ पोकळ दाद देऊन चालणार नाही. तर त्यांच्यातील कलेची, ऊर्जेची टिपेला पोहोचलेल्या शिखराची प्रशंसा केलीच पाहिजे... मात्र, संगीतातील टिपेची मर्यादा ओलांडून ओसंडून वाहत जाणारा ऱ्हिदम कानठिल्या बसवतो. त्यात गाण्याचे शब्द हरवून जातात. विशेष म्हणजे, प्रेषक ठेका धरतो, तेव्हा त्यातील महाराष्ट्राची सात्विकता आणि शौर्य धिंगाणा घालतो, असेच वर्णन नाईलाजाने करावे लागेल. इथे दिग्दर्शक, लेखकाची कसोटी लागते आणि पुढच्याच क्षणाला त्यांचे आत्मभान जागृत होतं. तेव्हा धिंगाणा घालणाऱ्या तरुण पोरं, पोरींना ते आख्यानाचं सत्व, सार सांगून जातात...! महाराजांचे गडकिल्ले आणि विचार आपण कधी आत्मसात करणार आहोत. ही ऊर्जा तिथं कामी आली पाहिजे, असे सांगताच सभागृहात एक विलक्षण शांतता पसरते. ती असते फोक आख्यानाच्या जात्यावरची खरी ओवी, असंच म्हटलं पाहिजे.

नृत्याच्या जागा वेगळ्या आहेत. धिंगाणा घालणारी स्थळं वेगळी आहेत. हे नम्रता सुंभेराव, प्रसाद खांडेकर यांनी लक्षात घेतले पाहिजे. आपल्या वयाच्या कलाकारांना प्रोत्साहन देणे म्हणजे होळीच्या सणाला भांग पिवून नाचणं नव्हे. प्रोत्साहन दिले पाहिजे. त्याच्या जागा वेगळ्या आहेत. हातवारे करून देहाला नाहक पिळवटून टाकणाऱ्या जागा वेगळ्या आहेत. सध्या आध्यत्मिक केंद्रात नाचणं सुरु आहे, त्यांची ती देहभान हरपणारी शुद्ध भक्ती आहे असे नाही. तर ती तात्पुरती ऊर्जा देणारी आणि लोकेशा वशिकरणाचा प्रयत्न आहे. फोक आख्यान हे समाज प्रबोधनाचे माध्यम आहे. ती लोककला जिवंत ठेवताना अतिघातक ठरणारी भावनिकता जपावी लागेल. समाज असा कधीच घडत नसतो, त्यासाठी नामदेवांपासून, ज्ञानोबा, तुकोबा, एकनाथ आणि साऱ्या संतांना जन्माला यावे लागते. ते वारंवार जन्म घेत नाहीत. तेव्हा त्यांनी दिलेली शिकवण आणि रयतेच्या राजाचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी अशी ठेका धरून धिंगाणा घालून पार पाडता येणार नाही. बाकी कलाकार आणि त्यातही नव्या कृतिशील प्रयत्नांना सलाम! ●●

# निवडक

## पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सृष्टीची सुवर्ण कामगिरी

**कल्याण :** डोंबिवलीकर सृष्टी पाटील हिने श्रीलंका येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत पाच सुवर्णपदकांची कमाई केली. सृष्टी हिने या स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात ज्युनियर बेंचप्रेस, ओपन बेंचप्रेस, ओपन डेडलिफ्ट आणि ज्युनियर डेडलिफ्ट या पाच प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले आहे. सृष्टी ही डोंबिवली पूर्वे येथील पाथर्ली गावातील एका सर्वसाधारण कुटुंबातून असून तिने आणि तिच्या आई-वडिलांनी मोठ्या कष्टाने तिची ही आवड जोपासली आहे. त्याचे चांगले फलित ह्या यशातून सृष्टीने मिळविले. सृष्टीच्या या यशाबद्दल शिवसेनेतर्फे व कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे यांच्या उपस्थितीत तिचे कौतुक करण्यात आले. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, संतोष चव्हाण, अमोल पाटील उपस्थित होते.

## भारताचा नामिबियाचा १३-0 असा विजय



**मुंबई :** भारताने ज्युनियर महिला हॉकी वर्ल्ड कपच्या सलामीच्या लढतीत नामिबियाचा १३-० गोल फरकाने धुव्वा उडविला. भारताकडून हीना बानो आणि कनिका सिवाच यांनी गोलची हॅट्रिक साजरी केली. हीनाने ३५ व्या व ४५ व्या मिनिटाला गोल केले, तर कनिकाने १२ व्या, ३० व्या व ४५ व्या मिनिटाला गोल केले. तसेच साक्षी राणा (१०व्या, २३ व्या मिनिटाला) हिने दोन गोल केले, तर बिनीमा धन (१४ व्या), सोनम (१४ व्या), साक्षी शुक्ला (२७ व्या), इशिका (३६ व्या) आणि मनीषा (६० व्या) यांनी प्रत्येकी एक गोल करून हिंदुस्थानच्या धडाकेबाज विजयात आपला वाटा उचलला. या दणदणीत विजयासह हिंदुस्थानने गुणतक्त्यात अव्वल स्थान मिळवले. सामन्याच्या पहिल्याच क्वार्टरमध्ये भारताने केवळ चार मिनिटांत चार गोल करून दणक्यात सुरुवात केली. साक्षीने रिव्हर्स फ्लिकवर शानदार सुरुवात केली.

## बालगोपालने पीटीएमला झुंजवले



**कोल्हापूर :** शेवटच्या क्षणापर्यंत चुरशीने झालेल्या लढतीत पाटाकडील तालीम मंडळ 'अ' संघाने बालगोपाल तालीम मंडळावर एकमेव गोलने निसटता विजय संपादन केला. केएसए शाहू छत्रपती फुटबॉल लीग स्पर्धेतील या सामन्यात तुलनेने बलवान असलेल्या पाटाकडील संघाविरुद्ध बालगोपालने दिलेली कडवी झुंज उपस्थित फुटबॉलप्रेमींच्या टाळ्या घेऊन गेली. त्याआधीच्या लढतीत सुभाषनगर फुटबॉल क्लबने संध्यामठ तरुण मंडळावर २-१ अशी मात करून आपली घोडदौड कायम राखली. सामन्याच्या प्रारंभापासूनच दोन्ही संघांनी आक्रमक पवित्रा घेत वेगवान खेळ सुरू केला. आघाडीसाठी योजनाबद्ध चढायांचा अवलंब केला. पाटाकडीलकडून प्रथमेश, ओंकार, रोहित पवार, नबी खान, महंमद सवाद, यश देवणे यांनी केलेले जोरदार प्रयत्न अपयशी ठरले. उत्तरार्धात प्रथमेशचा जोरदार फटका बालगोपालचा गोलरक्षक अहमदने उत्कृष्टरीत्या रोखला, तर प्रतीक बदामेच्या पासवर ओंकार मोरेची सोपी संधी वाया गेली. ४७ व्या मिनिटाला झालेल्या चढाईत बालगोपालच्या गोलक्षेत्रात गोलरक्षक माजी अहमद याने ओंकार मोरे याला अवैधरीत्या रोखले. यामुळे मुख्य पंचांनी पेनल्टीचा निर्णय दिला. यावर पेंढारीने बिनचूक गोल नोंदवत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. बालगोपालकडून अभिनव साळोखे, रुद्रेश धुमाळ, सुजित आर., प्रतीक पोवार, देवराज मंडलिक, सनवीर सिंग यांनी गोल फेडण्यासाठी केलेल्या चढाया पाटाकडीलच्या बचावफळीने फोल ठरविल्या.

## कर्जत इंग्लिश मिडीयम स्कूलच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा सुरु



**नेरळ :** कर्जत शहरातील कर्जत एज्युकेशन सोसायटीचे कर्जत इंग्लिश मिडीयम स्कूल चे वार्षिक क्रीडा स्पर्धेला सुरुवात करण्यात आली आहे. क्रीडा ज्योत प्रज्वलित करून या स्पर्धेला सुरुवात झाली असून नगरपरिषदेच्या मैदानावर ही स्पर्धा खेळविले जात आहे. कर्जत इंग्लिश मिडीयम स्कूलचे वार्षिक क्रीडा स्पर्धा शहरातील आमराई भागातील नगरपरिषद मैदानावर भरवल्या आहेत. या वार्षिक क्रीडा स्पर्धेत मैदानी खेळ खेळविले जात असून त्यात कब्बडी, खोखो,लांब उडी, उंच उडी, धावण्याच्या स्पर्धा, चमचा लिंबू स्पर्धा, लंगडी, व्हालीबॉल या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे चार ग्रुप तयार करण्यात आले असून गट निहाय स्पर्धा खेळवल्या जात आहेत. शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळीं प्रवीण गांगल, मदन परमार, सतिश पिंपरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या मुख्याध्यापिका अनुपमा चौधरी तसेच सुनील बोरसे, क्रीडा स्पर्धा शिक्षिका प्रीती म्हात्रे आणि सर्व शिक्षकांनी क्रीडा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी नियोजन केले होते.

# आफ्रिकेचे भारतासमोर २७१ धावांचे लक्ष्य

## ■ भारताची सावध सुरुवात ■ प्रसिध्द-कुलदिपचे प्रत्येकी चार बळी



**| विशाखापट्टणम | वृत्तसंस्था |**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील शेवटचा आणि तिसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यात भारताने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तर दक्षिण आफ्रिका संघ प्रथम फलंदाजीला मैदानात उतरला होता. प्रथम फलंदाजी करत दक्षिण आफ्रिकेने क्विंटन डी कॉकच्या शतकाच्या जोरावर २७० धावा उभ्या केल्या आहेत. भारताला विजयासाठी २७१ धावा कराव्या लागणार आहेत. विशाखापट्टणम येथील डॉ. वाय. एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर खेळवण्यात येत असलेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तर दक्षिण आफ्रिका संघ प्रथम फलंदाजी करण्यास मैदानात उतरला. दक्षिण आफ्रिका संघाची सुरुवात चांगली झाली नाही. दक्षिण आफ्रिकेने आपला पहिल गडी १ धावा असताना गमावला.

रायन रिकेल्टनला शर्दीप सिंगने भोपळा ही फोडू दिला नाही. त्यानंतर मात्र सलामीवीर क्विंटन डी कॉक आणि तिसऱ्या क्रमांकावर खेळायला आलेला कर्णधार टेम्बा बावुमा यांनी डाव सांभाळला. या दोघांनी संघासाठी ११० धावांची भागीदारी रचली.

या सामन्यात क्विंटन डी कॉक याने शतक केले. मात्र असले तरी कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांच्या चांगल्या कामगिरीमुळे भारताने आफ्रिकेला २७० धावांच्या आतच रोखण्यात यश मिळवले आहे. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. आफ्रिकेकडून डी-कॉक आणि रिकल्टन यांनी डावाची सुरुवात केली. पण पहिल्याच षटकात रिकल्टनला अर्शदीप सिंगचने यष्टीरक्षक केएल राहुलच्या हातून शून्यावर झेलबाद केले. पण त्यानंतर डी कॉकला कर्णधार तेंबा बावुमाने साथ दिली. एकिकडे मार्करम आक्रमक खेळत असताना दुसरीकडे बावुमा त्याला चांगली साथ देत होता. यांच्यात ११३ धावांची भागादारीही झाली. अखेर बावुमाला जडेजाने विराट कोहलीच्या हातून झेलबाद करत भारताला ब्रेकथ्रू मिळवून दिला. बावुमा ६७ चेंडूत ४८ धावा करून बाद झाला. बावुमा बाद झाल्यानंतरही फॉर्ममध्ये असलेल्या मॅथ्यू ब्रिट्झके याने क्विंटन डी कॉकला साथ देत अर्धशतकी भागीदारी करत संघाला १५० धावांचा टप्पा पार करून दिला. पण या सामन्यात ब्रिट्झके याला फार काळ प्रसिद्ध कृष्णाने टिकू दिले नाही. २९ व्या षटकात त्याला २३ चेंडूत २४ धावांवर प्रसिद्धने पायचीत केले. याच षटकात मागील सामन्यात शतक करणाऱ्या एडेन मार्करमचा अडथळाही प्रसिद्धने दूर केला. त्याने मार्करमला १ धावेवर विराट कोहलीच्या हातून झेलबाद केले.

यावेळी डी-कॉक शतकाच्या जवळ होता. अखेर त्याने ३० व्या षटकात हर्षित राणाच्या गोलंदाजीवर षटकारासह त्याचे शतक पूर्ण केले. मात्र शतकानंतर त्याला प्रसिद्ध कृष्णानेच त्रिफळाचीत केले.

डी कॉकने ८९ चेंडूत ८ चौकार आणि ६ षटकारांसह १०६ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतर मात्र दक्षिण आफ्रिकेची धावगती मंदावली. ३९ व्या षटकात कुलदीपने या दोघांनीही बाद केले. ब्रेव्हिसने २९ चेंडूत २९ धावा केल्या, त्याचा झेल रोहितने घेतला. यान्सिनने १५ चेंडूत १७ धावा केल्या. त्याचा झेल रवींद्र जडेजाने घेतला.

कुलदीपने कॉर्बिन बॉशलाही टिकू दिलं नाही. त्याला ९ धावांवर स्वत:च्याच गोलंदाजीवर झेल घेत बाद केले. लुंगी एनगिडीलाही १ धावेवर कुलदीप यादवने पायचीत केले. त्यानंतर ओटनील बार्टमनला प्रसिद्धने ४८ व्या षटकात ३ धावेवर त्रिफळाचीत करत दक्षिण आफ्रिकेचा डाव संपवला. केशव महाराज २९ चेंडूच २० धावांवर नाबाद राहिला. दक्षिण आफ्रिकेने ४७.५ षटकात सर्वबाद २७० धावा केल्या.भारताकडून कुलदीप यादवने १० षटकात ४१ धावा खर्च करत ४ विकेट्स घेतल्या. प्रसिद्ध कृष्णाने ९.५ षटकात ६६ धावा खर्च करत ४ विकेट्स घेतल्या.

भारताने दक्षिण आफ्रिकेला २७० धावांच्या आत रोखत वनडे मालिकेतील तिसऱ्या सामन्यात विजयाची संधी निर्माण केली आहे.

## 'नवोदित मुंबई श्री'वर साजिदचे नाव



**| मुंबई | प्रतिनिधी |**

नवोदित मुंबई श्री'च्या निमित्ताने शास्त्रा नगर मैदान शरीरसौष्ठवपटू आणि क्रीडाप्रेमींच्या गर्दीने ओसंडून वाहात होते. स्पर्धा नवोदितांची असली तरी स्पर्धेला लाभलेला अभूतपूर्व प्रतिसाद बृहनमुंबई शरीरसौष्ठव संघटनेची वाढलेली खरी ताकद दाखवून गेला. अत्यंत चुरशीच्या लढतीत मनवोदित मुंबई 'श्री'चा मान विराज फिटनेसच्या साजिद मलिकने मिळवला. २३५ खेळाडूंचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत प्रत्येक वजनी गटात इतकी चुरस होती की, अव्वल पाच खेळाडू निवडताना जजेसना तीनदा पंपेरिजन करावी लागली.

### 'नवोदित मुंबई श्री' २०२५ चे गटवार विजेते

५५ किलो - १. रमण राठोड (बोवलेकर जिम),
६० किलो - १. धर्मराज जमादार (एम जे ५२ फिटनेस), ६५ किलो १. प्रतीक महाजन (विराज फिटनेस),
७० किलो - १. साजिद मलिक (विराज फिटनेस)
७५ किलो - १. हरीश साळुंखे (परब फिटनेस),
८० किलो - १. फ्रान्सिको फर्नांडिस (सावरकर जिम), ८० किलोवरील १. तुषार वाघ (एज फिटनेस).

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे निमंत्रित सामन्यांचे रायगड जिल्ह्यात आयोजन

**| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या अंतरजिल्हा व नामांकित क्रिकेट क्लब यांच्या मधील होणाऱ्या निमंत्रित दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील पंधरा सामन्यांचे आयोजन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील विविध मैदानावर ८ ते २१ डिसेंबर दरम्यान करण्यात येणार आहे. एमसीए इन्व्हिटेशन ट्रॉफी स्पर्धेतील १५ सामन्यांचे आयोजन रिलायन्स क्रिकेट मैदान नागोठणे, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण पेण, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स रसायनी पाताळगंगा, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण उलवे पनवेल ह्या मैदानांवर करण्यात येणार असून सामन्यांचे यशस्वी आयोजन व्हावे यासाठी आरडीसीएचे सर्व पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत असल्याची माहिती आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदिप नाईक यांनी प्रसार माध्यमांना दिली.

जिल्ह्यात सातत्याने एमसीएच्या मॅचेस होत असल्याचा आपल्याला आनंद आहे व त्यासाठी आपण एमसीएचे अध्यक्ष आ. रोहित पवार, कमलेश पिसाळ, सुशील शेवाळे, राजू काणे, अजिंक्य जोशी व सर्व पदाधिकारी, सदस्यांचे आभार मानत असल्याचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले.

स्पर्धेतील १५ दोन दिवसीय सामने रायगडमध्ये होणार असून ग्रुप 'ई' मध्ये हिंगोली, सातारा, बीड, वायएमसीए क्रिकेट क्लब, ट्रिनिटी क्रिकेट क्लब, साऊथ झोन अशा सहा संघांमध्ये साखळी फेरीतील सामने खेळले जाणार आहेत. रिलायन्स क्रिकेट मैदानावर गेल्या महिन्यात बीसीसीआय आयोजित कूच बिहार ट्रॉफी स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा हा एकोणीस वर्षाखालील मुलांचा चार दिवसीय सामना देखील आरडीसीएतर्फे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात सातत्याने बीसीसीआय व एमसीएच्या वरच्या स्तराच्या मॅचेस तसेच जिल्हा अंतर्गत होणाऱ्या विविध अकॅडमी व क्लबच्या मॅचेस होत असल्याने जिल्ह्यात लेदर बॉल क्रिकेटला पुन्हा एकदा नवसंजीवनी मिळताना दिसत आहे.

## वहाळ येथे ४० प्लस मास्टर चषक क्रिकेट स्पर्धा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

४० प्लस मास्टर चषक क्रिकेट क्लब वहळच्या वतीने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि.६) करण्यात आले होते. यावेळी महेंद्र घरत खेळाडूंना मार्गदर्श करताना म्हणाले, फोर्टीप्लस, फिफ्टी प्लसवाल्यांनो सबुरीने खेळा, वयाचाही विचार करा, जमेल तेवढेच धावा, तब्येत महत्त्वाचा सल्ला त्यांनी क्रिकेट खेळाडूंना दिला. दिगंबर स्मृती फोर्टीप्लस मास्टर्स क्रिकेट क्लब वहाळच्या वतीने दिवंगत रमण घरत मैदानावर शैलेश चिर्ले कर, मनोज दापोलकर, विजय घरत, मदन घरत, ज्ञानेश्वर पाटील, कपिल पाटील यांच्यासह फोर्टीप्लस वहाळ संघाने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. क्रिकेट स्पर्धेचे समालोचन मनोज म्हात्रे यांनी केले.

## मुंबईचा विजय

**मुंबई :** सय्यद मुश्ताक अली टी२० ट्रॉफी २०२५ मध्ये मुंबईने छत्तीसगढविरुद्ध ८ विकेट्सने विजय मिळवला. आयुष म्हात्रेने नाबाद ६९ धावा करत मुंबईला १२२ धावांचे लक्ष्य सहज पूर्ण करून दिले. अजिंक्य रहाणेने ४० धावांची खेळी करत म्हात्रेला साथ दिली. सय्यद मुश्ताक अली टी२० ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील सहाव्या फेरीचे सामने शनिवारी होत आहेत. या फेरीत मुंबईचा सामना छत्तीसगढविरुद्ध झाला. लखनौच्या एकाना स्टेडियमवर झालेल्या सामन्यात मुंबईने ८ विकेट्सने सहजसोपा विजय मिळवला. मुंबईसाठी १८ वर्षीय आयुष म्हात्रेने विजयात मोलाचे योगदान दिले. त्याला अजिंक्य रहाणेचीही साथ मिळाली. गोलंदाजीत मुंबईसाठी कर्णधार शार्दुल ठाकूर चमकला. मुंबईचा हा या स्पर्धेतील ६ सामन्यांतील पाचवा विजय आहे. त्यामुळे अ गटात मुंबईने आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे.

## त्रिशा-गायत्रीला सलग दुसरा किताब

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० वॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंना आनंद आणि निराशा अशा दोन्ही अनुभूतींना सामोरे जावे लागले, त्रिशा जॉनी आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीने प्रभावी कामगिरी करत सलग दुसरया वर्षी महिला दुहेरीचे विजेतेपद पटकावले, मात्र पुरुष एकेरीत भारताच्या किदाम्बी श्रीकांतची आठ वर्षापासूनची किताबाची प्रतीक्षा यंदाही संपली नाही, त्याला अखेर उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.



किदाम्बी श्रीकांतने २०१७ च्या फ्रेंच ओपननंतर कोणताही किताब जिंकलेला नाही. लखनौ येथील या अंतिम सामन्यातही तो विजयाच्या अगदी जवळ पोहचला होता, मात्र हॉंगकॉंगच्या जागतिक क्रमवारीत ५९ व्या स्थानी असलेल्या जेसन गुनावन याने ६७ मिनिटांच्या थरारक लढतीत श्रीकांतला १६-२१, २१-८, २०-२२ असे हरवून जेतेपदावर नाव कोरले.

पहिल्या गेममध्ये गुनावनने आक्रमक खेळ करत आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्ये मात्र श्रीकांत जबरदस्त लयीत दिसला आणि तब्बल १३ गेम पॉइंट घेत सामना १-१ असा केला. निर्णायक गेममध्ये श्रीकांतने ५-१ अशी सुरुवातीची आघाडी घेतली होती, पण गुनावनने उत्कृष्ट रिट्रीव्हल आणि जोरदार स्ट्रोक्सच्या बळावर सामना फिरवला. अखेरीस श्रीकांतचा शेवटचा शॉट रेषेबाहेर गेला आणि त्याला किताबाने हुलकावणी दिली.

दुसऱ्या गेममध्ये त्रिशा-गायत्री जोडीने ९-२ अशी मजबूत आघाडी घेत २१-१३ असा जिंकत सामना निर्णायक गेममध्ये नेला. तिसरया गेममध्ये काही चुका झाल्यामुळे फरक कमी झाला. तरीही त्रिशाचा झपाटयाचा नेट प्ले आणि गायत्रीचे घणाघाती स्मॅशेसमुळे भारतीय जोडीने सलग दुसऱ्या किताबाला गवसणी घालण्यात आली.

## फुटबॉल वर्ल्ड कपची गटवारी जाहीर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

फिफाने २०२६ च्या वर्ल्ड कप स्पर्धेसाठी शुक्रवारी गट जाहीर केले आहेत. सेनेगलसह फ्रान्स आणि नॉर्वे यांना 'ख'गटात स्थान देण्यात आले आहे. अर्जेंटिना आणि पोर्तुगाल यांच्यात क्वार्टर फायनल सामना होणार आहे. या निमित्ताने लिओनेल मेस्सी व ख्रिस्तियानो रोनाल्डो हे सुपरस्टार एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. अर्जेंटिना ऑस्ट्रिया आणि अल्जेरियासह गट 'ग' गटात आहे. पोर्तुगाल कोलंबिया आणि उझबेकिस्तानसह 'घ' गटात आहे.



२०२६ चा फिफा वर्ल्ड कप हा ४८ संघांचा असेल, जो इतिहासातील सर्वाधिक संघांचा सहभाग असलेला वर्ल्ड कप ठरेल. ही स्पर्धा ११ जून ते १९ जुलै २०२६ या कालावधीत अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जाईल. आतापर्यंत ४२ संघ विश्वचषकासाठी पात्र ठरले आहेत.

फिफा २०२६ वर्ल्ड कप स्पर्धे च गट मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, कोरिया प्रजासत्ताक, युईएफए प्ले-ऑफ ऊ विजेतागट इ: कॅनडा, युईएफए प्ले-ऑफ- विजेता, कतार, स्वित्झर्लंडगट ब्राझील, मोरोक्को, हैती, स्कॉटलंडगट अमेरिका, पॅराग्वे, ऑस्ट्रेलिया, युईएफए प्ले-ऑफ विजेता-गट ए: जर्मनी, कुराकाओ, कोट डी आयव्होअर, इक्वेडोर गट नेदरलँड्स, जपान, युईएफए प्ले-ऑफ इ विजेता, ट्युनिशियागट बेल्जियम, इजिप्त, इराण, न्यूझीलंड स्पेन, काबो व्हर्दे, सौदी अरेबिया, उरुग्वेगट फ्रान्स, सेनेगल, फिफा प्ले-ऑफ २ विजेता, नॉर्व्हेगट ग : अर्जेंटिना, अल्जेरिया, ऑस्ट्रिया, जॉर्डनगट असणार आहेत.

धाराशिव, ठाणे, पुणे, सांगलीची उपांत्यपूर्व फेरीत धडक | मुंबई-रत्नागिरीची थरारक लढत मुंबईच्या नावावर

# ५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**| अहिल्यानगर | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बुऱ्हाणनगर येथे सुरू झालेल्या ५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत उपउपांत्यपूर्व फेरीतील रोमहर्षक सामने पार पडले. उत्कृष्ट क्रीडाप्रदर्शनाच्या जोरावर कुमार व मुली गटातील प्रत्येकी आठ संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. शनिवारी सकाळच्या सत्रात उपांत्यपूर्व सामने पार पडले आहेत.



कुमार गटात धाराशिव-मुंबई, मुंबई उपनगर-पुणे, सोलापूर-ठाणे, सातारा-सांगली, तर मुली गटात धाराशिव-रत्नागिरी, नाशिक-ठाणे, सोलापूर-सातारा, पुणे-सांगली अशी दमदार आमने-सामने लढती रंगणार आहेत. सांगलीने एक डाव सहा गुणांनी विजय मिळवला. संकेत वाघमारे २.३० मि., पार्थ देवकाते २.३० मि. संरक्षण व ३ गुण, अथर्व पाटील ३.३० मि. संरक्षण व १ गुण, श्री दळवी २.१० मि. संरक्षण यांनी चमकदार कामगिरी केली. पालघरकडून प्रेम पाटीलने १.१० मि. संरक्षण व १ गुण केले आहे.

ठाण्याने बीडवर १ डाव २४ गुणांनी मात केली. ओंकार सावंत आणि सोहम जुंगारे यांनी संरक्षणात दमदार प्रदर्शन केले. सोलापूरने धुळेवर १ डाव ४३ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. अरमान शेख (४.५० मि.), रवी दरोगोंदा व अकबर शेख (२.५० मि.) सोलापूरचे नायक ठरले आहेत.

पुण्याने जालनावर १ डाव ८ गुणांनी विजय अपर्णा वर्धे (३.२० मि., २.४० मि.), श्वेता नवले (३.३० मि. व १ गुण) यांची चमकदार कामगिरी. जालनाकडून वैष्णवी मदने ४.०० मि. संरक्षण व २ गुण अशी संघर्षपूर्ण खेळी करत प्रेक्षकांची दाद मिळवली. सांगलीने परभणीवर १ डाव २६ गुणांनी मोठा विजय नोंदवला. सांगलीच्या धनश्री तामखडे (३.०० मि. व ३ गुण), सानिका चाफे (२.२० मि. व २ गुण) यांनी परभणीवर चढाई करत विजय मिळवला आहे.

सोलापूरचा मुंबईवर १ डाव ११ गुणांनी विजय, सोलापूरच्या कल्याणी लामकाने (५ मि.), स्नेहा लामकाने (४ मि.) तर मुंबईची कादंबरी तेरवणकर (२ मि.) यांची चमकदार कामगिरी केली. रत्नागिरी मुली संघाने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करताना अहिल्यानगर संघावर १ डाव २४ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. रत्नागिरी संघाकडून ऋषी चव्हाण ४.४० मी. संरक्षण व आक्रमणात २ गुण साक्षी लिंगायतने संरक्षणात ३.५० मी. आणि आक्रमणात ४ गुण मिळवले. आर्य दोर्लेकरने २.४० मी. संरक्षण करून आक्रमणात २ गुण मिळवले.

नाशिक उपांत्यपूर्व फेरीत दाखल. मुंबई उपनगरवर ११ गुणांनी विजय मिळवला. नाशिककडून निर्मला ४.४० मी. सुषमा चौधरी २.२० मी., रोहिणी भंवर २.०० संरक्षण केले. उपनगरकडून दिव्या गायकवाडने अष्टपैलू खेळ करत १.१० मी. संरक्षण आणि आक्रमणात ६ गुण संपादन केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)